सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

# सहकार सुगंध

ISBN 978-81-940842-0-4

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २१ • अंक ७-८ • ऑक्टो-नोव्हेंबर २०२५ (जोडअंक) • पृष्ठे ८० • किंमत : रु. १००/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

राष्ट्रसाधनेची संघशताब्दी!

|| बिना सहकार नहीं उद्धार ||












## सहकारातून समृद्धीकडे नेणारा प्रकाश!




स्नेहाचा सुगंध दरवळला, आनंदाचा सण आला.
विनंती आमची परमेश्वराला, सौख्य, समृद्धी लाभो तुम्हाला.
शुभ दिपावली
शुभेच्छुक
सौ. निलिमा बावणे
अध्यक्ष
सौ. सारिका पेंडसे
उपाध्यक्ष
संस्थेच्या सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी व कर्मचारी वृंद
तुमचे सोने करेल, तुमचे स्वप्न साकार!
• सुलभ प्रक्रिया
• जलद कर्ज वाटप
• किमान दस्तऐवज
योजना सर्व शाखेत सुरु
आजच जवळच्या शाखेत संपर्क करा
गोल्ड लोन
0.75%
व्याजदर प्रती माह
अधिक माहितीकरीता संपर्क 9822272947/9665936970
गॅरन्टी मासिक पेंशन योजना
कालावधी 5 वर्षांकरीता
व्याजदर 7.8%* सर्वांकरिता
• योजना सर्व शाखेत उपलब्ध • योजना सिमित कालावधीकरिता
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
DEPOSIT सुविधा
₹ 2350 कोटींच्या वर व्यवसाय
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
Authorised Rail Ticket Reservation Centre
फ्लाईट
क्रूज
हॉटेल
बस
ONLINE BOOKING FACILITY AVAILABLE AT ALL BRANCHES
7020218417
दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था!
31 वर्ष
मुख्य कार्यालय : प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.
फोन : 0712-2220716, 2524337, 2520303


सर्व सभासद, ग्राहक व हितचिंतक यांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
संदीप शेळके
अध्यक्ष- राजर्षी शाहू परिवार | संकल्पक- वन बुलडाणा मिशन
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकूण ६९ शाखेचा विस्तार
२. १००० कोटींचा व्यवसाय
३. १,५०,००० सभासद संख्या
४. 'शाहू पे हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ६० हजार महिलांना महिला बचत गट कर्ज वाटप.
६. 75 कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.
LOCKERS सुविधा
NEFT,RTGS सुविधा उपलब्ध
SMS अलर्ट
MOBILE बँकिंग
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
DOORSTEP बँकिंग
GOLD LOAN उपलब्ध
MSEDCL वीज बिल भरणा केंद्र
CORE बँकिंग
DEPOSITE सुविधा
NET बँकिंग
LOAN सुविधा
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनचा "सहकार गौरव" पुरस्कार प्राप्त संस्था
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
र.नं. ८१९
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. लि. बुलडाणा
सौ. मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. लि. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
9359941853

netwin
Ideas to Life

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!



- शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
- NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
- सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
- संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा

Certification

netwin
Ideas to Life

नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.

- AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
- तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
- आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरू करा
- बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
- स्मार्ट डॅशबोर्ड्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
- संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव

आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!

०२५३ ६६५ १५००

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

sales@netwinindia.in www.netwin.in


कोटीच्या कोटी उड्डाणे...
100,00,00,000
आम्ही रचला
नवा इतिहास
100
कोटींच्या ठेवींचे
लक्ष्य पूर्ण
संस्थेचे आपण सर्व ग्राहक,
भागधारक व हितचिंतक यांनी
दाखविलेल्या विश्वासाबद्दल
कोटी कोटी धन्यवाद...!
रजि.नं. एन.जी.पी./बी.एन.के./१६२/१९६९
१९६९ पासून
विश्वासाची उज्ज्वल परंपरा
विवेकानंद
नागरी सहकारी प्रत्यय संस्था, मर्या.
मुख्य कार्यालय : चिटणीस पार्कसमोर, रुईकर रोड, महाल, नागपूर-440032.
विवेक जुगादे - अध्यक्ष
महेश अंधारे - उपाध्यक्ष
संचालक गण - सर्वश्री : सुधीर दप्तरी, ईश्वर परचाकी, कल्याण दिवाण, श्रीकांत आगलावे,
मधू गौर, विवेक बापट, विवेक धाक्रस, डॉ. सौ. राधिका मुरकुटे, डॉ. सौ. माधुरी इंदुरकर,
दिपक बारड, राहूल वेलंकीवार, आनंद गोंधळेकर (सीईओ)


ISO 2001-2015
दीपावली
निमित्त मंगलमय शुभेच्छा!
अपेक्षा तुमची... साथ आमची
चरण स्पर्श
अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड
रेजिस्ट्रेशन क्र. NGP/RSR/CR/222/2021
संपर्क: 7768 848 375, 8554 990 166 Email: csuccss2021@gmail.com
मुख्यालय: छत्रपती शिवाजी महाराज चौक, शिव मंदिर जवळ, छिंदवाडा रोड, सावनेर, जिल्हा नागपूर -४४११०७


दीपावली
निमित्त मंगलमय शुभेच्छा!
वात्सल्य
महिला नागरी सहकारी पत संस्था मर्या, सावनेर
र. नं. १०४२/१५
मुख्यालय: सरकारी आय. टी. आय. जवळ, जुना नका, कळमेश्वर - सावनेर रोड, सावनेर, नागपूर



साथ विश्वासाची, वाट प्रगतीची!

# दीपावली

निमित्त मंगलमय शुभेच्छा!



दत्त चौक, यवतमाळ शाखा येथे किफायती दरामध्ये लॉकर सुविधा । सुलभ प्रक्रिया । जलद कर्ज वाटप । किमान दस्तऐवज

| मुदत ठेव दिवस | व्याजदर |
|---|---|
| ३० दिवस ते ९० दिवस | ७.००% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ८.००% |
| १८१ दिवस ते १ वष | १०.००% |
| १ वर्षाच्या वर ते २ वर्षांपर्यंत | ११.५०% |

- मासिक प्राप्ती योजना : रु. १ लाखावर दरमहा रु.९५०/- व्याज मिळवा
- खास व्यावसायीकांना चालु खात्यावर ४% व्याज
- आवर्त ठेव योजना उपलब्ध
- तात्काळ सुवर्ण तारण कर्ज उपलब्ध



अमित जयंत भिसे
अध्यक्ष

DigiMark 860 551 3331

* नियम व अटी लागू.

## ॥ जाणता राजा ॥

मल्टिस्टेट को.ऑप. क्रेडिट सोसा.लि. यवतमाळ

रजि. नं. MSCS/CR/752/2013 कार्यक्षेत्र : ● महाराष्ट्र ● मध्यप्रदेश

मुख्य कार्यालय: दत्त चौक यवतमाळ

संपर्क: +91 9860 470 700, 9822 904 642

आमच्या शाखा: आर्णी रोड, यवतमाळ · रवी नगर, अमरावती · बस स्टॅन्ड, नांदगाव खंडेश्वर · वडाळा आणि समशेरपूर, बस स्टॉप, अहिल्यानगर



सारस्वत बँक
सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
विश्वासाच्या नात्याची अविरत परंपरा...
आमचे सर्व ग्राहक सभासद व हितचिंतकांना
शुभ दीपावली
ही दीपावली आपणा सर्वांना सुखाची, समृद्धीची
आणि भरभराटीची जावो!
www.saraswatbank.com


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
आनंदे करुया
दीपावली साजरी,
सुखसमृद्धी नांदो
प्रत्येक घरी
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
www.tjsb.bank.in | : 022-48897210

आर्थिक सेवेसोबतच समाज सेवेचा ध्यास जपणारी.

# भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित नवरगाव

नोंदणी क्रमांक १२०१

प्रशासकीय कार्यालय: माधवकुञ्ज, गांधी चौक, नवरगाव.
ता. सिंदवाही, जि. चंद्रपूर (कार्यक्षेत्र-नागपूर विभाग) स्थापना - १८ जून १९९३
Website- www.bnspn.com Email ID - info@bnspn.co.in
Face Book ID - भाग्यश्री पतसंस्था मर्या. नवरगाव

## ३० सप्टेंबर २०२५ रोजी संस्थेची सांपत्तिक स्थिती

| | |
|---|---|
| ठेवी | २६५ कोटी ८० लाख |
| गुंतवणूक | १२१ कोटी ९४ लाख |
| कर्जे | २०० कोटी ७८ लाख |
| वसुल भागभांडवल | ४ कोटी १२ लाख |
| सी.आर.ए.आर. | २७.४७% |
| सी.आर.आर. | ९.४१% |
| निव्वळ एनपीए प्रमाण | ०% |

सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

## * संस्थेची वैशिष्ट्ये *

* आर्थिक सेवेसोबतच सामाजिक सेवेत सदैव अग्रेसर
* संस्थेच्या मालकीचे आधुनिक सोयींनी सुसज्ज व भव्य प्रशासकीय वास्तू.
* प्रशासकीय कार्यालयासह सर्व शाखा संगणकीकृत.
* संस्थेच्या सातही शाखेत एनईएफटी व आरटीजीएस



दत्ता ज. बहादुरे (सहसरव्यवस्थापक) गोविंद स. बिसेन (उपाध्यक्ष) किशोर शं. महालक्ष्मे (अध्यक्ष)

तथा समस्त संचालक मंडळ व समस्त कर्मचारी वृंद



# शुभ दीपावली

सर्व सन्माननीय सभासद,
ग्राहक व हितचिंतकांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

# जळगाव जनता सहकारी बँक लि., जळगाव

(शेड्यूल्ड बँक)

मुख्य कार्यालय : 'सेवा' 117/119, नवी पेठ, जळगाव- 425001.
(0257) 2223699 www.jjsbl.bank.in jjsbl_jal@jjsbl.co.in

*सब समाज को लिए साथ में आगे है बढते जाना।*

# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

ऑक्टो-नोव्हेंबर २०२५ (जोडअंक) (वर्ष २१, अंक ०७-०८)


# अनुक्रम


* राष्ट्र-साधनेची १०० वर्षे...! ........ १३
* जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनविण्यात सहकार क्षेत्राचा मोठा वाटा ........ १५
* सहकार भारतीच्या कार्याशी एफपीओना जोडण्याचा यशस्वी प्रयत्न ........ १६
* सहकारी संस्थांच्या निवडणुका पारदर्शक होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान उपयुक्त ........ १७
* शत नमन 'माधव चरण'में... ........ १८
* पंतप्रधान नरेंद्र मोदींना राजकारणात आणण्याची महत्त्वपूर्ण भूमिका ........ १९
* सहकारी ग्राहक भांडारांपुढील आव्हाने.. ........ २०
* देशातील साखर उद्योगाची आगामी वाटचाल ........ २१
* अभ्यासगटाच्या शिफारशींची अंमलबजावणी होण्यासाठी पुनर्विकास प्राधिकरण...... २२
* श्री साईकृपा सहकारी पतसंस्थेचा सहकार भूषण पुरस्काराने गौरव ........ २३
* दुग्ध व्यवसायासाठी तंत्रज्ञानयुक्त गोठ्यांची आवश्यकता ........ २४
* पूर्णवादी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना ७ टक्के लाभांश जाहीर........ २५
* नागरी सहकारी बँकांसाठी विलीनीकरण अनिवार्य? ........ २६
* सहकारी बँकांसाठी सोने तारण कर्ज वितरण ........ २८
* जागर बँकिंग साक्षरतेचा... ........ २९
* नागरी सहकारी बँकांसमोर अर्थव्यवस्थेची तीव्र स्पर्धा ........ ३१
* चिपळूण अर्बन बँकेला महाराष्ट्रातील 'सर्वोत्कृष्ट बँक' पुरस्कार प्रदान ........ ३२
* बाजार समितीची बदलती भूमिका : नियंत्रक ते सुविधादाता ........ ३३
* दावा न केलेल्या ठेवी, ठेवीदारांना परत करणाऱ्या बँकांना, आरबीआय प्रोत्साहन........ ४७
* धनादेश आणि त्याची नवी कार्यप्रणाली........ ४८
* शेतमाल निर्यात वाढीसाठी निर्यात सुविधा केंद्र सक्षम करा - पणन मंत्री रावल........ ४९
* देशाच्या विकासात सहकारी बँकांची भूमिका महत्त्वपूर्ण -मुख्यमंत्री भजनलाल शर्मा ....... ५०
* समाजातील शेवटच्या घटकाचा विकास समोर ठेवून सहकारी बँकांनी काम करावे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची अपेक्षा........ ५१


## दिवाळी अंक (जोडअंक)

**सहकार सुगंध मासिकाचा हा अंक ऑक्टोबर आणि नोव्हेंबर (जोडअंक) हा दिवाळी अंक म्हणून प्रकाशित होत आहे. याची जाहिरातदार, लेखक, प्रतिनिधी यांनी नोंद घ्यावी. यापुढील अंक डिसेंबर २०२५ मध्ये प्रकाशित होईल.- संपादक**


**'सहकार सुगंध'** हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक -** भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004. **Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni



**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/- फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**


**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# सहकारातून समृद्धीकडे नेणारा प्रकाश!

दिवाळी हा केवळ दिव्यांचा उत्सव नाही, तर तो प्रकाश, आनंद, एकोपा आणि नवसर्जनाचा उत्सव आहे. अंधारावर प्रकाशाचा, अन्यायावर सत्याचा आणि स्वार्थावर सामूहिकतेचा विजय – हीच या उत्सवाची ओळख आहे! दिवाळीत आपण सर्व काही उजळवतो. त्याचप्रमाणे सहकार चळवळ समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करते, त्याचे जीवनमान उजळवण्याचा प्रयत्न करते. दिवाळीत आपण कुटुंबासह आनंद साजरा करतो; सहकार आपल्याला समाजासह आनंद वाटण्याची प्रेरणा देतो. दोन्हींचा केंद्रबिंदू एकच आहे, तो म्हणजे आपण सगळे मिळूनच अंधारावर मात करुन सर्वांना प्रकाश देऊ या. दिवाळीचा दीप घर उजळवतो, सहकाराचा दीप समाज उजळवतो, असे या दिपोत्सवाच्या निमित्ताने म्हणावेसे वाटते.

सहकार म्हणजे एकत्र येऊन, विश्वासाच्या बळावर, परस्पर साहाय्याने विकासाचा मार्ग तयार करणे. ग्रामीण भागातील शेतकरी, कामगार, महिला अशा सर्वसामान्यांनी जेव्हा सहकाराच्या तत्त्वावर संस्था उभारल्या, तेव्हा त्या केवळ आर्थिक व्यवहारापुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत; तर त्या समाजकार्य, शिक्षण, स्वावलंबन आणि सामाजिक समरसतेच्या संस्था झाल्या. साखर, दूध, बँकिंग, वस्त्र, शेती, शिक्षण – प्रत्येक क्षेत्रात सहकाराने सामान्य माणसाला उभारी दिली आणि आर्थिक प्रवाहात सामील केले. हेच दिवाळीच्या तेजासारखे समाजजीवन उजळविणारे कार्य आहे. सहकार म्हणजे केवळ संस्था नव्हे, तर लोकशाहीतील सामाजिक अर्थशास्त्र आहे. एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक ही तत्त्वे या चळवळीची ओळख आहेत. नफा हा उद्देश नसून सदस्यांचा परस्पर विकास हेच ध्येयवाक्य! त्यामुळे सहकारी संस्था ही सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबन यांचा संगम आहे.

सन १९७८ मध्ये सहकार चळवळीच्या वृद्धि आणि शुद्धीसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रेरणेने सहकार भारती या स्वयंसेवी संघटनेचे कार्य सुरु झाले, जे आज संपूर्ण देशभर पसरले आहे. 'बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार हे ब्रीद घेवून गेली ४७ वर्षे सहकार भारती अविरतपणे कार्यरत आहे. रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षात यंदाची दिवाळी साजरी होत आहे. संघाच्या प्रेरणेने गेल्या १०० वर्षात विविध प्रकारच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच स्तरावर विविध संस्था, संघटना सुरु झाल्या. त्यातीलच एक म्हणजे सहकार चळवळीत काम करणारी सहकार भारती! संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू. गोळवलकर गुरुजींनी एक मूलमंत्र दिला, तो म्हणजे – मै नहीं, तु ही! याचाच अर्थ सहकारातील प्रत्येक सभासद, प्रत्येक कार्यकर्ता आणि प्रत्येक संस्था जेव्हा वैयक्तिक (मी) नाही, तर सामुहिक (आपण) या भावनेने काम करेल तेव्हा खऱ्या अर्थाने सहकारातून समृद्धी साकारतांना दिसेल.

भारत आज जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे आणि भारताचा जीडीपी ४ ट्रिलियन डॉलरच्या उंबरठ्यावर आहे. या वाढीच्या प्रवासात सहकार क्षेत्राचे योगदान निश्चितच मोठे आहे. आज देशात साडेआठ लाखांहून अधिक सहकारी संस्था कार्यरत असून, त्यांचे थेट किंवा अप्रत्यक्ष २५ कोटी सभासद आहेत. कृषी उत्पादन, साखर उद्योग, दुध व दुग्धजन्य उत्पादने, सूतगिरण्या, शेतमाल विपणन, सहकारी बँका आणि पतसंस्था या क्षेत्रांत सहकाराचा सुमारे २५-३०% इतका वाटा आहे. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू या राज्यांनी या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. देशातील एकूण साखर उत्पादनांपैकी सुमारे ६०% उत्पादन सहकारी साखर कारखान्यांतून होते. अमूल, इफ्को सारख्या ब्रँडने तर सहकाराची जागतिक ओळख निर्माण केली आहे. सहकार क्षेत्राने केवळ उत्पादनच नाही, तर समान वितरण, न्याय्य किंमती आणि ग्रामीण रोजगार निर्मितीसाठीही मोठे योगदान दिले आहे. 'आत्मनिर्भर भारत' साध्य करण्यासाठी केवळ मोठ्या उद्योगांचीच नाही, तर लघु व मध्यम घटकांचीही गरज आहे. ग्रामीण उद्योजकता, कृषी प्रक्रिया उद्योग, दुध व दुग्धजन्य व्यवसाय, ग्रामीण बँकिंग या सर्व क्षेत्रांमध्ये सहकार हा सर्वात महत्त्वपूर्ण घटक आहे.



आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात सहकार चळवळीपुढे आव्हाने आहेत तशाच संधी देखील अनेक आहेत. पारदर्शकता, डिजिटल रूपांतरण, तरुणांचा सहभाग आणि व्यावसायिक व्यवस्थापन – या चार स्तंभांवर नवीन सहकारी क्रांती उभी राहात आहे. दिवाळीप्रमाणेच सहकारालाही नव्या आव्हानांची संधी आहे. या प्रकाशपर्वात जर प्रत्येक सहकारी संस्थेने आत्मपरीक्षण करून नवा संकल्प केला, तर समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाचा दीप पुन्हा तेजोमय होईल.

सहकार सुगंधचे वाचक, जाहिरातदार, हितचिंतक आणि सहकार चळवळीतील सर्व कार्यकर्त्यांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा ! जय सहकार!

## संपादकीय...



# संघशताब्दी

# राष्ट्र-साधनेची १०० वर्षे...!

शंभर वर्षांपूर्वी विजयादशमीच्या अत्यंत पवित्र मुहूर्तावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली. जेथे राष्ट्रभावना वेळोवेळी त्या काळातील आव्हानांचा सामना करण्यासाठी नव-नव्या स्वरूपांमध्ये प्रकट होते त्या हजारो वर्षांपासून चालत आलेल्या परंपरेची ही पुनर्स्थापना होती. या युगात संघ त्याच अनादि राष्ट्रभावनेचा पुण्यावतार आहे. आपल्याला संघाच्या शताब्दी वर्षासारखा उज्ज्वल प्रसंग पाहायला मिळतो आहे हे आपल्या पिढीतील स्वयंसेवकांचे भाग्यच आहे. या प्रसंगी देशसेवेच्या निश्चयाला वाहून घेतलेल्या कोट्यवधी स्वयंसेवकांना शुभेच्छा देतो. तसेच संघाचे संस्थापक आणि आपणा सर्वांचे आदर्श असलेले परम पूजनीय डॉ. हेडगेवार यांच्या चरणी श्रद्धांजली अर्पण करतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या या शतकभराच्या गौरवपूर्ण प्रवासाची आठवण म्हणून भारत सरकारने विशेष टपाल तिकीट आणि नाणी देखील जारी केली आहेत.



**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

ज्या पद्धतीने विशाल नद्यांच्या किनाऱ्यांवर मानवी संस्कृतीची जोपासना होते, त्याच पद्धतीने संघाच्या आधाराने देखील शेकडो आयुष्ये फुलली आहेत. ज्याप्रमाणे एक नदी ज्या ज्या मार्गावरून वाहते त्या क्षेत्रांना स्वतःच्या पाण्याने समृद्ध करत जाते, त्याच पद्धतीने संघाने या देशातील प्रत्येक भागाला, समाजाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श केला आहे. जशी एक नदी अनेक प्रवाहांतून स्वतःचे रूप दाखवते, संघाची वाटचाल देखील तशीच आहे. संघाच्या वेगवेगळ्या संस्था सुद्धा जीवनाच्या प्रत्येक पैलूशी स्वतःला जोडून घेऊन देशाची सेवा करतात. आपल्या समाजातील शिक्षण, कृषी, समाज कल्याण, आदिवासी कल्याण आणि महिला सक्षमीकरण अशा अनेक क्षेत्रांमध्ये संघ अविरतपणे कार्य करीत आला आहे. विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक संस्थेचा उद्देश एकच आहे, भावना देखील एकच आहे आणि ती म्हणजे - देश सर्वप्रथम!

स्थापनेपासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देश घडवण्याचे प्रचंड उद्दिष्ट निश्चित करून वाटचाल केली आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संघाने व्यक्तिनिर्माणातून राष्ट्र उभारणीचा मार्ग निवडला आणि या मार्गावरून वाटचाल करण्यासाठी जी कामाची पद्धत निवडली ती म्हणजे नित्यनेमाने शाखा भरवणे. संघाच्या शाखेचे मैदान, ही अशी एक प्रेरणादायक भूमी आहे, जेथून प्रत्येक स्वयंसेवकाचा 'अहम्‌पासून वयम्'च्या दिशेने प्रवास सुरू होतो. संघाच्या या शाखा म्हणजे व्यक्तिमत्त्व घडविणाऱ्या यज्ञ वेदी आहेत. देश उभारणीचा महान उद्देश, व्यक्ती घडवण्याचा सुस्पष्ट मार्ग आणि शाखेसारखी अत्यंत सोपी, सजीव कार्यपद्धत हेच घटक संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा आधारस्तंभ बनले. याच स्तंभांवर पाय घट्ट रोवून संघाने लाखो स्वयंसेवक घडवले आणि आज हे स्वयंसेवक विविध क्षेत्रांमध्ये देशाला पुढे घेऊन जात आहेत.

संघ जेव्हापासून अस्तित्वात आला, संघासाठी देश हेच प्राधान्य राहिले आहे, त्यासाठी तुरुंगवासदेखील भोगला. स्वातंत्र्यलढ्यात संघाने असंख्य स्वातंत्र्यसैनिकांचे रक्षण केले आहे, त्यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून काम केले आहे. स्वातंत्र्यानंतरही, संघ राष्ट्रसाधनेत अखंड झटत राहिला. या प्रवासादरम्यान, संघाविरुद्ध कट कारस्थाने रचण्यात आली, संघाला नामशेष करण्याचे प्रयत्न करण्यात आले. ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व असलेल्या परम पूज्य श्रीगुरुजींना खोट्या खटल्यात अडकवण्यात आले. परंतु संघाच्या स्वयंसेवकांनी कधीही कटुता येऊ दिली नाही. कारण त्यांना माहीत आहे की आपण समाजापासून वेगळे नाही; समाज आपल्यापासूनच तर बनलेला आहे. समाजाशी एकरूपता आणि घटनात्मक संस्थांवरील विश्वास यामुळे संघाचे स्वयंसेवक प्रत्येक संकटात स्थितप्रज्ञ राहिले. समाजाप्रती संवेदनशील राहिले आहेत.

सुरुवातीपासूनच संघ देशभक्ती आणि सेवेचा पर्याय राहिला आहे. फाळणीच्या वेदनेमुळे लाखो कुटुंबे बेघर झाली तेव्हा स्वयंसेवकांनी निर्वासितांची सेवा केली. प्रत्येक आपत्तीमध्ये, संघाचे स्वयंसेवक आपल्या मर्यादित साधनसंपत्तीसह सर्वांत पुढे उभे राहिले. ही केवळ मदत नव्हती, तर ते राष्ट्राच्या आत्म्याला बळकटी देण्याचे कार्य होते. स्वतः त्रास सोसून इतरांचे दुःख निवारण करणे ही प्रत्येक स्वयंसेवकाची ओळख आहे. आजही, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी प्रत्येक ठिकाणी स्वयंसेवक सर्वांत आधी पोहचणाऱ्यांपैकी एक असतात.

आपल्या १०० वर्षांच्या या प्रवासात, संघाने समाजातील विविध

**पुढील पानावर...**



**मागील पानावरून...**

घटकांमध्ये आत्म-बोध जागवला, स्वाभिमान जागवला. संघाने देशातील दुर्गम भागातही काम केले आहे. संघ अनेक दशकांपासून आदिवासी परंपरा, आदिवासी रीतिरिवाज, आदिवासी मूल्यांचे जतन आणि संवर्धन करण्यात योगदान देत आहे. आपले कर्तव्य पार पाडत आहे. आज, सेवा भारती, विद्या भारती, एकल विद्यालय आणि वनवासी कल्याण आश्रम आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणाचे आधारस्तंभ म्हणून उदयाला आले आहेत. अनेक शतकांपासून समाजात रुजलेल्या कुप्रथा, श्रेष्ठ आणि कनिष्ठ भेदभाव, ज्या वाईट पद्धती आहेत, त्या हिंदू समाजासाठी खूप मोठे आव्हान आहेत. ही एक गंभीर चिंता आहे ज्यावर संघ निरंतर काम करत आहे.

डॉक्टर साहेबांपासून ते आजपर्यंत, संघाच्या प्रत्येक महान व्यक्तीने, प्रत्येक सरसंघचालकाने, भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढा दिला आहे. परम पूजनीय श्रीगुरुजींनी न हिंदू पतितो भवेत या भावनेला सातत्याने प्रोत्साहन दिले, पूजनीय बाळासाहेब देवरस म्हणायचे, 'जर अस्पृश्यता पाप नसेल, तर जगात कोणतेही पाप नाही! सरसंघचालक म्हणून काम पाहिलेले पूजनीय रज्जूभय्या आणि पूजनीय सुदर्शनजी यांनी देखील ही भावना पुढे नेली. विद्यमान सरसंघचालक आदरणीय डॉ. मोहनजी भागवत यांनीही समरसतेसाठी, समाजासमोर एक विहीर, एक मंदिर आणि एक स्मशानभूमीचे स्पष्ट ध्येय ठेवले आहे.



जेव्हा १०० वर्षांपूर्वी संघ अस्तित्वात आला तेव्हा त्या काळातील गरजा आणि संघर्ष वेगळे होते. परंतु आज १०० वर्षांनंतर भारत विकसित होण्यासाठी वाटचाल करत असतानाची, आजच्या काळातील आव्हाने वेगळी आहेत, संघर्ष वेगळे आहेत. इतर देशांवरील आर्थिक अवलंबित्व, आपली एकता तोडण्याची कटकारस्थाने, लोकसंख्याशास्त्रीय बदलाची कारस्थाने या आव्हानांचे आपले सरकार वेगाने निराकरण करत आहे. मला आनंद आहे की राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही या आव्हानांना तोंड देण्यासाठी एक ठोस पथदर्शी आराखडा बनवला आहे.

आत्मबोध, सामाजिक समरसता, कौटुंबिक प्रबोधन, नागरी शिष्टाचार आणि पर्यावरण हे पाच संकल्प अर्थात संघाचे पंच परिवर्तन हे देशासमोरील आव्हानांवर मात करण्यासाठी प्रत्येक स्वयंसेवकासाठी एक विशाल प्रेरणा आहेत. आत्मबोधाच्या भावनेचा उद्देश गुलामगिरीच्या मानसिकतेतून स्वतःला मुक्त करणे आणि स्वतः च्या वारशाचा अभिमान बाळगणे, स्वदेशीचा मूलभूत संकल्प पुढे नेणे आहे. सामाजिक समरसतेतून वंचितांना प्राधान्य देऊन सामाजिक न्याय स्थापित करणे ही प्रतिज्ञा आहे. घुसखोरांमुळे लोकसंख्याशास्त्रीय बदल झाल्याने आज आपल्या सामाजिक सौहार्दाला मोठे आव्हान भेडसावत आहे. यावर उपाय म्हणून देशानेही लोकसंख्याशास्त्रीय मोहिमेची घोषणा केली आहे.

कौटुंबिक प्रबोधनाच्या माध्यमातून आपण कुटुंब संस्कृती आणि मूल्ये देखील मजबूत केली पाहिजेत. नागरी शिष्टाचारांच्या माध्यमातून आपण प्रत्येक नागरिकामध्ये नागरी कर्तव्याची भावना जागृत केली पाहिजे. या सर्वांसोबतच आपण आपल्या पर्यावरणाचे रक्षण करून भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित केले पाहिजे. आपल्या या संकल्पांसह संघ आता पुढील शतकातील प्रवासाला सज्ज झाला आहे. २०४७ च्या विकसित भारतासाठी संघाचे प्रत्येक योगदान राष्ट्राला ऊर्जा आणि प्रेरणा देईल. पुन्हा एकदा, प्रत्येक स्वयंसेवकाला शुभेच्छा!

# जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनविण्यात सहकार क्षेत्राचा मोठा वाटा

## ❊ आंतरराष्ट्रीय सहकार वर्षासाठी व्यापक कृती आराखडा तयार
## ❊ सहकार धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणाने करणार

वर्ष २०२५ हे संयुक्त राष्ट्रसंघाकडून 'सहकार वर्ष' म्हणून जाहीर करण्यात आले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या सहकार क्षेत्राशी देशातली ३० कोटी जनता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या जोडली गेली आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वर्ष २०२७ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्थेला जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे ध्येय गाठण्यासाठी भारतातील सहकार क्षेत्राचा वाटा मोलाचा असणार आहे.

**❊ राष्ट्रीय सहकार धोरण –**

सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी केंद्र सरकारने टाकलेले महत्त्वाचे पाऊल म्हणजे 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५'. 'सहकारातून समृद्धीकडे' या योजनेनुसार सहकारी क्षेत्राच्या दिर्घकालीन विकासासाठी अनुकूल वातावरण निर्मिती करण्यासाठी 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' तयार करण्यात आले. सहकार धोरण निश्चित करताना केंद्र सरकारकडून भारतातल्या प्रत्येक गावात किमान एक सहकारी संस्था स्थापन करण्याचे उद्दिष्ट्य ठेवण्यात आले आहे. भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन सुमारे ४.१९ ट्रिलियन डॉलर्स आहे. यामध्ये सहकार क्षेत्राचा वाटाचा अंदाजे ३ ते ४ टक्के (१६७.६ बिलियन डॉलर्स) आहे. हा वाटा सुमारे तीन पट वाढवण्याचे लक्ष्य 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' च्या माध्यमातून ठेवण्यात आले आहे. हे ध्येय गाठण्यासाठी १० वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. सहकार धोरणाच्या माध्यमातून ५० कोटी नागरिकांना सहकार क्षेत्राशी विविध प्रकारे जोडण्याची केंद्र सरकारची योजना आहे. सहकार धोरण हे केंद्र सरकारने जाहीर केले असले तरी देशातल्या प्रत्येक राज्य सरकारला राज्याचे सहकार धोरण ३१ जानेवारी २०२६ पर्यंत तयार करणे अपेक्षित आहे.



**केंद्रीय सहकार राज्यमंत्री**
**मुरलीधर मोहोळ**

> **देशातील साखर क्षेत्राच्या विकासाची प्रक्रिया, विविध उपकर्म आणि योजना तसेच आंतरराष्ट्रीय सहकार वर्षातील उपक्रम याबाबत केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची विशेष मुलाखत...**

**❊ नागरिकांना सहकाराशी जोडण्याचे नियोजन –**

सहकार धोरण २०२५ नुसार जास्तीत जास्त नागरिकांना सहकार क्षेत्राशी जोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सहकार क्षेत्रात काम करण्यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज भविष्यात लागणार आहे. ही गरज ओळखून केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली 'त्रिभुवन सहकारी विद्यापीठ' स्थापन करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला. या विद्यापीठाच्या स्थापनेमुळे देशातील तरुणांना सहकाराच्या प्रत्येक टप्प्यावर शिक्षण आणि प्रशिक्षण उपलब्ध होणार आहे. सहकार क्षेत्रात करिअर करण्यासाठी तरुणांना या विद्यापीठामुळे प्रोत्साहन मिळणार आहे. या विद्यापीठात शिक्षण आणि प्रशिक्षणासोबतच संशोधनाचे महत्त्वाचे काम केले जाणार आहे. या विद्यापीठाच्या अंतर्गत देशाच्या विविध भागात शाळा स्थापन केल्या जाणार आहेत. या शाळांमध्ये दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सहकाराशी निगडीत विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणे शक्य होणार आहे.

**❊ सहकार क्षेत्रासाठी निधी –**

देशातल्या युवा पिढीला सहकार क्षेत्राशी जोडण्यासाठी केंद्रिय सहकार मंत्री अमित शहा यांच्याकडून नियोजनबद्ध पद्धतीने धोरणांची अंमलबजावणी केली जात आहे. सहकार क्षेत्राला यंदाच्या बजेटमध्ये ११९० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. 'पॅक्स'चे सशक्तीकरण, ग्रामीण बँकांचा विस्तार, सहकार विद्यापीठाची स्थापना, को-ऑपरेटीव्ह संस्थाच्या कारभारात पारदर्शकता या सुधारणा करुन तरुणांसाठी रोजगारनिर्मिती करण्यावर केंद्र सरकारकडून भर देण्यात येत आहे.

यासोबतच देशातील ७०,००० विविध कार्यकारी सोसायटीचे संगणकीकरण सुरु आहे. शहरी नागरी बँकांना सुविधा पुरवण्यासाठी अंब्रेला ऑर्गनायझेशनची स्थापना करण्यात आली आहे. सोबतच २ लाख नवीन पॅक्स स्थापन करून पाच वर्षात देशातील प्रत्येक पंचायतीत सहकारी संस्था उभी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना 'बीज से बाजार तक' अनेक सेवा देण्यासाठी तीन नवीन मल्टीस्टेट सोसायट्या कार्यरत आहेत. या निर्णयांच्या जोडीला २०२५ पर्यंत सहकारी संस्थाचे जाळे प्रत्येक गावात पोचवत ५० कोटी सदस्य संख्या करण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात आले आहे.

सहकार संस्थांशी संबंधित सदस्यांची संख्या ३० टक्क्यांनी वाढवणे, सहकारी बँकांना बळकटी देत त्यांची ग्राहक संख्या अडीच पट वाढवणे आणि प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील किमान एक व्यक्ती सहकारी संस्थेचा सदस्य असेल असे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या धोरणात्मक उपाययोजनांमुळे पुढच्या दहा वर्षात मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची गरज सहकार क्षेत्रात निर्माण होणार आहे. याचा सर्वांत मोठा लाभार्थी वर्ग हा देशातला युवा असणार आहे. पुढच्या काही वर्षात १७ लाख तरुणांना सहकार क्षेत्र आणि निगडीत संस्थामध्ये रोजगार मिळणार आहे. त्यामुळे तरुणांमध्ये सहकार क्षेत्राकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणार आहे.

केंद्र सरकारचे राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ आणि 'त्रिभुवन सहकारी यूनिवर्सिटीची स्थापना यातून पुण्यात असणाऱ्या वैकुंठभाई मेहता या संस्थेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. त्रिभुवन विश्वविद्यालयाच्या स्थापनेनंतर

**पुढील पानावर...**

एफपीओ शिखर परिषद

# सहकार भारतीच्या कार्याशी एफपीओना जोडण्याचा यशस्वी प्रयत्न




**नांदेड** – शेती क्षेत्रातील सहकार चळवळ मजबूत करण्याच्या उद्देशाने सहकार भारतीच्या महाराष्ट्र प्रदेश एफपीओ प्रकोष्ठातर्फे एफपीओ शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी 'नवशेती FPO' या मासिकाचे प्रकाशन करण्यात आले. शेती क्षेत्रातील तंत्रज्ञान, धोरणे आणि बाजारपेठेतील संधी यांचे समर्पक विश्लेषण व माहिती मासिकात देण्यात आली आहे.

सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री संजय पाचपोर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहप्रचारक (देवगिरी प्रांत) राजाभाऊ कोळपे, सहकार भारतीचे प्रांत संघटन मंत्री शरद जाधव, प्रदेश सचिव वर्षा कस्तुरकर, एफपीओ प्रकोष्ठ प्रमुख वृषल शिंदेसंघटन मंत्री प्रवीण गायकवाड, जिल्हा अध्यक्ष प्रभाकरराव महाजन, महानगर अध्यक्ष आर. डी. देशमुख तसेच जिल्हा संघटन प्रमुख प्रशांत तिर्थे आदींची उपस्थिती होती.

विधान परिषद सदस्य हेमंत पाटील आणि गोदावरी अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षा राजश्री पाटील उपस्थित राहून विचार मांडले. परिषद तीन सत्रात झाली पहिल्या सत्रात समुत्कर्ष राष्ट्रीय शेतकरी उत्पादक कंपनी फेडरेशनचे उद्घाटन करण्यात आले आणि नवशेती' मासिकाचे प्रकाशन झाले. दुसऱ्या सत्रात एफपीओंचे प्रतिनिधी – माधव तरकांडे (अमृतालयम FPC), संकेत सावजी (संयुगा ॲग्रो), रेणुका तोडकरी (चाकूर महिला FPC), अभिलाष लोमटे (एकता SLA) – यांनी यशोगाथा उपस्थितांसमोर मांडला.तर तिसऱ्या सत्रात कृषी विज्ञान केंद्र नंदुरबारचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. राजेंद्र दहातोंडे यांनी व्हॅल्यू चेन आणि 'व्हॅल्यू ॲडिशन' यावर मार्गदर्शन केले.

सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री पाचपोर यांनी शेतकरी उत्पादन कंपन्यांच्या भूमिकेवर भाष्य करताना सांगितले की, शेतमाल प्रक्रिया आणि शेतीवर आधारित उद्योग हा शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा कणा ठरेल. तसेच त्यांनी आगामी काळात जिल्हा आणि विभाग स्तरावर एफपीओ समिट घेण्याची घोषणाही केली, ज्यायोगे अधिकाधिक एफपीओना सहकार भारतीच्या कार्याशी जोडता येईल.

परिषदेच्या माध्यमातून सहकारी चळवळीला नवी दिशा देण्यासोबतच शेतकरी उत्पादन कंपन्यांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. राज्यभरातील २५ जिल्ह्यांतून प्रतिनिधी, शेतकरी उद्योजक, अभ्यासक सहभागी झाले होते.

---

मागील पानावरून...

## भारतीय अर्थव्यवस्थेला जगात ...

वैकुंठभाई मेहता ही संस्था या विश्वविद्यालयाचा महत्त्वाचा भाग असणार आहे. वैकुंठभाई मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ही संस्था सहकार क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ पुरवण्याचे काम गेली अनेक दशके करत आहे. केंद्र सरकारच्या धोरणामुळे या संस्थेच्या विस्तार होणार आहे आणि देशातल्या तरुणांसाठी सहकार क्षेत्रात करिअर घडवण्याची एक सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.

**✻ सोसायटीच्या कामकाजात पारदर्शकता –**

६ जुलै २०२१ मध्ये स्वतंत्र केंद्रीय सहकार मंत्रालयाची निर्मिती करण्यात आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या मार्गदर्शनाखाली पहिले केंद्रीय सहकार मंत्री अमितभाई शहा यांनी सहकार क्षेत्रातील अपारदर्शकता संपवण्यासाठी उपाययोजना करण्यास सुरुवात केली. देशात आजच्या घडीला १६०० मल्टि स्टेट कोऑपरेटीव्ह सोसायटी आणि ८,००,००० कोऑपरेटीव्ह सोसायटी आहेत. या सोसायटींच्या कारभार पारदर्शकता आणण्यासाठी, मल्टीस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्टमध्ये दुरुस्ती करण्यात आली. सोसायट्यांच्या कार्यालयांचे कॉम्प्यटरायझेशन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला सशक्त करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने 'नाबार्ड' या संस्थेतंर्गत सामाईक सेवा संस्था (Shared Service Entity SSE) स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. या संस्थेचे भांडवल १००० कोटी असल्याने ग्रामीण बँकांच्या कार्यक्षमतेत वाढ होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर कृषीकर्ज, अनुदान यासारख्या सेवा विनाविलंब मिळणार आहेत.



वर्ष २०२५ संयुक्त राष्ट्रांकडून 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष' (IYC) म्हणून घोषित केले आहे. देशाची राजधानी दिल्ली येथे जागतिक सहकारी परिषद (ICA) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या जागतिक परिषदेला जगातल्या १०६ देशांचे ३००० प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेमुळे सहकार क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतले महत्त्व आणि भारताचे योगदान हे जागतिक पातळीवर ठळक झाले. 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५' साजरे करण्यासाठी, मंत्रालयाने सहकार क्षेत्रातील सर्व भागधारकांच्या सहकार्याने 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५'साठी एक व्यापक वार्षिक कृती आराखडा तयार केला आहे. माननीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांना २४ जानेवारी २०२५ रोजी हा आराखडा प्रसिद्ध केला होता. देशभरात 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५' साजरे करताना सहकार क्षेत्राशी पूरक अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे गृह आणि सहकार मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सहकार मंत्र्यांच्या राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन हा राष्ट्रीय स्तरावरील एक महत्त्वाचा उपक्रम होता. याशिवाय, वॉकेथॉन, सायक्लोथॉन, 'स्वच्छता मे सहकार', सहकारी प्रदर्शने आणि युवा आणि महिला सहभाग कार्यक्रम यासारखे उपक्रम देशभर आयोजित करण्यात आले आहेत

भारत देशाला २०४७ मध्ये 'विकसित भारत' बनवण्याचे एक स्वप्न आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना दाखवले आहे. या स्वप्नपूर्तीच्या दिशेने वाटचाल करताना भारताला विकासाच्या वाटेवर नेण्यात सहकार खात्याची भूमिका ही निर्णायक असणार आहे. या सहकार खात्याचा केंद्रीय राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली यासाठी स्वत:ला नशिबवान समजतो. सहकार खात्यामध्ये जे काही ऐतिहासिक परिवर्तन होत आहे याचा साक्षीदार असल्याचा आनंद आहे.

**– मुलाखत – अभय कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार**

**मो.नं. – ९८८१० ९८१०६**

✻✻✻✻

# सहकारी संस्थांच्या निवडणुका पारदर्शक होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान उपयुक्त

## राज्य सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरण आयुक्त अनिल कवडे

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका अधिक पारदर्शक आणि त्यामध्ये अचूकता यावी, तसेच विश्वासार्हता वाढावी यासाठी सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. या प्रक्रियेमुळे सहकार चळवळीला बळकटी येण्यास मदत होणार आहे, असे राज्य सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरण आयुक्त अनिल कवडे यांनी सहकार सुगंध मासिकाला मुलाखत देताना संगितले.

**राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका, याबाबतचे नियोजन एकूण कार्यपद्धती आणि प्राधिकरणाचे कामकाज याबाबत सविस्तर विवेचन करणारी राज्य सहकारी संस्था प्राधिकरण अनिल कवडे यांची मुलाखत...**

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका, प्राधिकरणाची कार्यपद्धती, माहिती तंत्रज्ञानाचा वापर आदी विषयांबाबत आयुक्त कवडे यांनी माहिती सांगितली. ते म्हणाले, राज्याच्या विविध भागात सुमारे सव्वा दोन लाख संस्था असून त्यातील १ लाख ९ हजार संस्था प्राधिकरणाकडे आहेत. त्यातील ९० हजार ५०० संस्था निवडणुकीस पात्र आहेत. त्यातील ७९,२९० सहकारी संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे तर ४,०३४ संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरु आहे आणि ७५०० संस्थांच्या निवडणुका बाकी आहेत.



**अनिल कवडे**

**❊ डिजिटल मतदार यादी तयार करण्याचे काम सुरू –**

संस्थांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी हा मूळ भाग आहे असे नमूद करून ते म्हणाले, यादी योग्य असणे, निर्दोष असणे त्यामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. सध्याच्या पद्धतीमध्ये मतदार यादी सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येते. मात्र सभासदांना यादीबाबत माहिती नसते. त्यामुळे तक्रारीचे प्रमाण वाढते. यावर उपाय योजना म्हणजे प्राधिकरणाने डिजिटल मतदार यादी तयार करण्याचे काम सुरू केले आहे. याबाबत राज्यातील सहकारी संस्था, फेडरेशन, असोसिएशन प्रतिनिधी यांना माहिती सांगण्यात आली आहे. नजीकच्या काळात राज्यासाठी पायलट प्रोजेक्ट तयार करणार. यामुळे निवडणुकांबबत सदस्यांमध्ये विश्वासार्हता, पारर्शकता वाढावी आणि जनतेच्या मनात विश्वास वाढण्यास मदत होणार आहे.

**❊ निवडणूक नियोजनासाठी स्वतंत्र प्रणाली –**

सहकारी संस्थांच्या निवडणुका, उमेदवारांचा खर्च, त्यावरील नियंत्रणे, बंधने आणि निवडणूक खर्च योग्य प्रकारे व्हावा अशा सूचना प्राधिकरणाच्या वतीने देण्यात आली आहेत. असे नमूद करून ते म्हणाले, निवडणुकांच्या नंतर महिनाभरत निवडणूक खर्च देणे अपेक्षित आहे. उपलब्ध माहितीची छाननी करणे आणि संस्थेने जमा केलेल्या निधीतून खर्च वजा जाता उर्वरीत निधी संस्थेला देणे अथवा कमी पडणारा निधी संस्थेकडून जमा करणे याबाबत प्रणाली तयार करण्यात आली आहे.

या प्रणालीचा उपयोग संस्थेच्या आर्थिक नियोजनासाठी उपयुक्त ठरणार आहे. राज्यातील सहकारी संस्थांचा विचार करता निवडणुकीच्या सर्व टप्प्याचे प्रक्रियेचे खर्च, पर्यवेक्षण प्रभावीपणे होण्यासाठी प्रणालीचा वापर केला जाणार आहे. यामुळे राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीबाबत अद्ययावत माहिती उपलब्ध होणार आहे. तालुका आणि जिल्हा स्तरावर याचा प्रभावीपणे उपयोग होणार आहे.

**❊ स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना –**

महाराष्ट्र हे सहकार क्षेत्रात कार्यरत असणारे देशातील एक अग्रगण्य राज्य आहे असे स्पष्ट करून ते म्हणाले, सहकारी संस्थांच्या निवडणुका त्यावरील नियंत्रण, निवडणुकीचे वेळापत्रक कार्यवाही, त्यासाठीची पद्धती, याबाबत तत्त्वे निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये राज्यात सहकारी संस्थांचे जाळे व्यापक करणे, लोकशाही पद्धतीने निवडणुका घेणे, ९७व्या घटना दुरुस्तीनुसार संस्थांच्या निवडणुका नियमितपणाने घेणे, सदस्य नियुक्त संचालक मंडळ येणे, यासाठी राज्य सहकारी संस्था निवडणूक प्राधिकरण सन २०१३ मध्ये तयार करण्यात आले.

या माध्यमातून राज्यातील एक लाखापेक्षा अधिक संस्थामध्ये समन्वय निर्माण करणे, यासाठी प्राधिकरण कार्यरत आहे. तसेच संस्थांच्या निवडणुका वेळेवर आणि नियोजनपूर्वक होण्यासाठी प्राधिकरण काम करीत आहे ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुका होतात त्यामध्ये गृहनिर्माण सहकारी संस्थांचा समावेश नाही तर हे काम निबंधक यांच्या वतीने करण्यात येते. सहकारी संस्था निवडणुकीच्या समन्वयासाठी जिल्हा स्तर, जिल्हा उपनिबंधक यंत्रणा आणि जिल्हा निवडणूक अधिकारी जाहीर करण्यात येतात.

**❊ सहकारी संस्थांसाठी एकूण चार गट –**

मुदत संपणाऱ्या संस्थांची माहिती संकलित करणे तसेच संचालक मंडळाची मुदत संपण्यापूर्वी निवडणूक प्रक्रिया सुरु करणे, तसेच पात्र सदस्यांची यादी तालुका आणि जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांना देण्यात येते, त्यावर हरकती मागविणे, अंतिम मतदार यादी तयार करणे, निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करणे, त्यानंतर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करणे आदी कामे करण्यात येतात.

सहकारी संस्थांसाठी एकूण चार गट आहेत. संस्थेचे कार्यक्षेत्र विचारात घेऊन तयार करण्यात आले आहेत. अ, ब, क, ड असे चार गट असून अ आणि ब गटातील संस्थांसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी आणि क, ड गटासाठी तालुका निवडणूक अधिकारी काम करतात. निवडणुकीच्या कालावधीतील खर्च, प्रचार, आचार संहिता याबाबत प्राधिकरणाने सूचना दिल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

**– मुलाखत – विनायक कुलकर्णी**

*****



# शत नमन 'माधव चरण'में...

साधारणपणाने सन १९६६-६७ चा काळ असेल. त्यावेळी औरंगाबादमधल्या (सध्याचे संभाजीनगर) कुंभारवाडा नामक गल्लीत राहत होतो. सर्वसामान्य कनिष्ठ मध्यमवर्गीयांची ती गल्ली म्हणजे आमच्यासाठी स्वर्ग होता. तिथं बहुतेक घरं बैठी किवा एक-दोन मजल्यांची होती, पण प्रत्येक घरासमोर प्रशस्त ओटे होते. आमच्यासाठी ते ओटे म्हणजे जणू स्टेडियम भोवतीचा स्टँड असायचा. कारण त्या ओट्यांसमोरच्या रस्त्यांवर आमची क्रीडांगणे बहरलेली असायची. भोवरे, विटीदांडू, डबा ऐसपैस (हो, ऐसपैसच!), गोट्या, हे बिनपैशांचे खेळ पोटात कावळे कोकलायला लागेपर्यंत किंवा घरातून खणखणीत 'बोलावणे' येईपर्यंत तिथंच रेंगाळायचो. सगळं भान विसरून. पण एक दिवस अघटित घडलं.

पांढरे स्वच्छ धोतर आणि झब्बा परिधान केलेली तीन माणसं गल्लीच्या एका टोकाकडून आली. मी रस्त्यात मांडलेल्या गोट्यांवर नेम धरून गोटी मारणारच होतो, पण त्या तिघातला एक त्या 'कत्त्या'वर (गोट्या मांडलेला चौकोन) पाय ठेवून उभा राहिला. काही कळेचना. मिष्किल हसून आमच्याकडे बघत तो म्हणाला, 'इथं घाणीत काय खेळताय? मैदानावर चला' आमच्यापैकी बहुतेकांनी पळ काढला होता. मीही कसाबसा निसटलो. दुसऱ्या दिवशी पुन्हा तीच तीन माणसं. त्यातला एक मिशावाला खूपच करारी. पण गोट्यांवर पाय ठेवणारा मात्र खूपच मधाळ हसणारा. हा प्रकार अधूनमधून अनेक दिवस चालू होता. मग कसं, कोण जाणे, पण एक दिवस जाऊन तर बघू असा विचार मनात आला. जवळच असलेल्या हनुमान शाखेत गेलो आणि मग तिथेच रमलो.



**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक माधवराव कुलकर्णी यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या संघविषयक कार्याविषयीचा आढावा घेणारा ज्येष्ठ पत्रकार भगवान दातार यांचा विशेष लेख...**

आमचा डाव मोडणारी ती व्यक्ती होती संघाचे शहर प्रचारक माधवराव कुलकर्णी. खूप मोठा डाव मांडण्याचं संघाचं स्वप्न मनात धरून ते मुंबईसारख्या शहरातून (चेंबूर) औरंगाबादला आले होते. मीच नाही तर अशा कितीतरी मुलांशी त्यांची दोस्ती होती. मला आठवतं, आमच्या शाखेच्या कोपऱ्यावर कितीतरी लहान मुलं त्यांची वाट बघत घुटमळत असायची आणि माधवराव आले की, त्यांच्या अवतीभवती घोळका करून शाखेकडे कूच करायची. त्यातले एक - दोघेजण तर त्यांच्या दोन्ही हातांना लटकलेले असायचे.

माधवराव पहिल्यांदा भेटले ते असे. नंतर त्यांनी काय गारूड केले माहीत नाही, पण तेव्हा मनावर ठसलेले माधवराव आजही तिथून हललेले नाहीत. पण परमेश्वराने त्यांना आपल्यातून ओढून नेलं, पण माझ्यासारख्या अनेकांच्या मनातून ओढून नेणं त्या परमेश्वरालाही जमणार नाही.

माधवरावांच्या बरोबरचे करारी चेहरा व भरदार मिशा असलेले दत्ताजी भाले विभाग प्रचारक होते. इतिहासातल्या दत्ताजी शिंदेंची आठवण यावी असं त्यांचं व्यक्तिमत्त्व होतं. आणीबाणीत भूमिगत असतांनाच त्यांचं निधन झालं. तिसरे होते ते मधुकरराव जोशी. अत्यंत सोज्वळ चेहरा कमालीचा मधुर आवाज लाभलेले. शाखेतल्या बाल-शिशूंशी माधवरावांची जेवढी दोस्ती तेवढाच तरुण आणि मातब्बर वृद्धांशी त्यांचा दमदार स्नेह होता. मग पाहता पाहता संघ कार्यकर्त्यांचं एक मोहोळच माधवरावांनी उभं केलं. रामभाऊ गावंडे, रावसाहेब दांडगे, रावसाहेब दानवे, हरिभाऊ बागडे, हिंमत गवळी, दयाराम बसैय्ये, सुरेश हिरे, विजय खनाळे, अनिल भालेराव, आबासाहेब देशपांडे, प्रकाश कुलकर्णी, पांडुरंग सोट, सुखदेव नवले, निवृत्ती करडे, शांतू राणा, रमण धंदुके, सुधीर दातार, जयंत अभ्यंकर, संजय मायदेव, सुधीर विद्वांस, रमेश सुपेकर, भगवान निवपूरकर, सुरेश बावसकर, बलराम एरमे, गिराश कांदळगावकर, निशीकांत सद्गुले, जगन्नाथ गुळवे असे एकाहून एक ताकदीचे कितीतरी कार्यकर्ते माधवरावांच्या भोवती जमले. या सगळ्यांची घरं संघाशी जोडली गेली. किंबहुना या प्रत्येकाला माधवरावांनी उभं केलं. त्यांच्या मनात संघ रुजवला. विचारांना धार लावली कृतीला दिशा दिली. संघाचं काम शहरात दिसायला लागलं. त्याकाळात शहरात १७-१८ सायंशाखा लागत होत्या. एकेका शाखेवर किमान १०० स्वयंसेवक असायचे.

वसंतराव भागवतांनी प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, धरमचंद चोरडिया, जयसिंग गायकवाड, मधू चव्हाण, माधव ठाकूर, किरीट सोमय्या अशी तरुण पिढी उभी करत जनसंघ राज्यात घरोघर पोहोचवला. त्याचंच एक वेगळं रूप माधवरावांमध्ये पहायला मिळालं. माधवरावांच्या क्षमतेच्या दृष्टीने औरंगाबाद छोटं होतं. संघाने त्यांना पुण्याला आणलं. पुण्यातलं कामही त्यांनी बळकट केलं. संघाने त्यांना गुजराथमध्ये नेलं. तिथं ते 'मधुभाई' झाले. नंतर ते संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीत गेले. अखिल भारतीय बौद्धिक प्रमुख झाले. लखनौ त्यांचं केंद्र होतं. नंतर ते हैदराबाद झालं. शेवटच्या काळात ते संभाजीनगरलाच स्थायीक झाले. तिथंच त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

माधवरावांच्या सहवासातल्या सगळ्या जुन्या कार्यकर्त्यांनी गटागटाने त्यांना भेटायचं अशी योजना ठरली. त्यावेळी त्यांची भेट झाली होती. चार पाच दिवस सलग कार्यकर्ते वेगवेगळ्या गटात त्यांना भेटत होते. अनेकजण परगावहून मुद्दाम आले होते. अनेकांनी प्रगतीची नवनवी क्षितीजं काबीज केली होती. पण माधवरावांविषयीचा आदरभाव प्रत्येकाच्या मनात कायम होता. आपला 'बहरलेला संसार' पाहून माधवरावांना नक्कीच कृतकृत्य वाटलं असेल. पुण्यातही ते घरी एकदा मुक्कामाला आले होते. माझ्या स्वभावाप्रमाणे कुठल्यातरी मुद्यावर त्यांच्याशी वाद घालत होतो. 'वाद चांगला घातला म्हणजे आपला मुद्दा बरोबर असं होत नाही' असं म्हणत त्यांनी माझे कान टोचले. पुढच्याच क्षणी दिलखुलास हसत त्यांनी वाद संपवला.

औरंगाबादच्या एका शिबिरात माधवराव मेसजवळ भेटले होते. 'घरी भात करतात तेव्हा किती तांदूळ लागतो? असं त्यांनी सहजच विचारलं. मी म्हटलं, 'वाटीभर'. ते म्हणाले, 'मग इथं पाचशे लोकांसाठी भात करायचाय तर किती तांदूळ लागेल, याचा कधी विचार केलायस का? मोठ्या स्केलवर कसं काम करायचं याचा सहजच दिलेला तो पहिला धडा होता. औरंगाबादलाच एका कार्यक्रमात प्रमख वक्ते अचानक आले नाहीत. आम्ही काळजीत होतो. पण काही घडलेच नाही, अशा अविर्भावात माधवराव बोलायला उभे राहिले आणि तासाभाराच्या बौद्धिकात त्यांनी स्वच्छ आणि

**पुढील पानावर...**

# पंतप्रधान नरेंद्र मोदींना राजकारणात आणण्याची महत्त्वपूर्ण भूमिका

# रा.स्व.संघाचे ज्येष्ठ प्रचारक मधुभाई कुलकर्णी यांचे वृद्धापकाळाने निधन

**छत्रपती संभाजीनगर –** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक मधुभाई (माधव विनायक) कुलकर्णी (वय ८८) यांचे येथे वृद्धापकाळाने निधन झाले. रा.स्व.संघाचे अखिल भारतीय बौद्धिक प्रमुख म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम पाहिले होते.



दि. १५ मे १९३८ मध्ये कोल्हापूर येथे जन्मलेल्या मधुभाईंचे शालेय शिक्षण चिकोडी, जिल्हा बेळगाव येथे झाले. १९५४ मध्ये कोल्हापूर विद्यापीठ हायस्कूलमधून त्यांनी मॅट्रिक पूर्ण केली. पुढे १९५८ मध्ये रुपारेल कॉलेज, येथून बी.ए. पदवी प्राप्त केली. काही काळ त्यांनी मुंबई सेल्स टॅक्स खात्यात नोकरी केली. त्यानंतर १९६०-६१ मध्ये सोलापूरच्या दयानंद शैक्षणिक महाविद्यालयातून बी.एड. पूर्ण केले.

शालेय जीवनापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी मधुभाई जोडले गेले होते. सन १९६२ मध्ये ते संघाचे प्रचारक म्हणून कार्यरत झाले. तालुका प्रचारक, जिल्हा प्रचारक, विभाग प्रचारक, पुणे महानगर प्रचारक, गुजरात प्रांत प्रचारक, पश्चिम क्षेत्र प्रचारक, अखिल भारतीय बौद्धिक प्रमुख (केंद्र, भाग्यनगर) अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या. सन २०१५ पर्यंत ते संघाच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य होते. त्यानंतर दायित्त्वमुक्त ज्येष्ठ प्रचारक म्हणून ते संभाजीनगर येथे कार्यरत राहिले.

पुण्यात तळजाई येथे महाराष्ट्राचे संघाचे शिबिर यशस्वीरीत्या झाले. त्यामध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. तरुण स्वयंसेवकांसाठी त्यांनी लिहिलेले 'अथातो संघजिज्ञासा' हे पुस्तक अनेक भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. अखेरच्या क्षणापर्यंत शाखा, प्रवास, संवाद यात त्यांचा सक्रिय सहभाग कायम राहिला. त्यांच्या निधनामुळे संघ परिवारासह समाज जीवनात पोकळी निर्माण झाली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री, सहकार मंत्री अमित शहा यांनी मधुभाईंच्या तब्येतीची आस्थापूर्वक फोनद्वारे विचारपूस केली. काही दिवसांपूर्वी सरसंघचालक डॉ. मोहन भागवत त्यांना रुग्णालयात भेटून गेले होते.

## शत नमन 'माधव चरण'में...

सोप्या शब्दात संघ मांडला. त्यांच्या चिंतनाची खोली त्यावेळी समजली.

औरंगाबादला सन १९६७ मध्ये पूजनीय श्री गुरुजींची सभा होती. सभा उधळून लावण्याचा चंग समाजवादी व कम्युनिस्टांनी बांधला होता. सभेवर संकट घोंघावत होतं. आमच्याच शाखेच्या मैदानावर असलेली ती सभा निर्विघ्नपणे पार पडली. एक गोष्ट नंतर ध्यानात आली. सभेपूर्वी 'त्या मैदानावरचा दगड न् दगड उचलून एका खड्ड्यात टाका' असं सांगितलं गेलं होतं. हा कंटाळवाणा कार्यक्रम ८-१० दिवस चालला होता. कारण कळत नव्हतं. नंतर समजलं की समजा सभेत गडबड करायची कुणाला दुर्बुद्धी झालीच तरी त्याला मैदानावर दगडच काय एक साधा खडाही मिळू नये, असं ते नियोजन होतं. ही दूरदृष्टी माधवरावांची होती. मोठ्या नियोजनात बारीक सारीक गोष्टही किती महत्त्वाची असते, ते माधवरावांनी शिकवलं.

माधवरावांची उंची अशा छोट्या छोट्या गोष्टीतून कळत होती. माधवराव गेल्याच्या बातमीने धक्काच बसला. कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यु ही विश्रांती' असंच त्यांचं जीवन होतं. त्यांना आता थोडी विश्रांती द्यावी, असं नियतीनेच ठरवलं असावं. पण अजूनही मन ते मानायला तयार होत नाही. वाटतं. केव्हाही फोन वाजेल. 'पुण्यात आलोय. जमलं तर या वेळेला मोतीबागेत ये' असा माधवरावांचा आवाज येईल.

'माधवराव, जमलं तर का? तुम्ही म्हणाल तेंव्हा येतो,' असं मी म्हणेन.

त्यावर 'तू काय बाबा पत्रकार! तुझी वेळ सांभाळणं महत्वाचं' असं माधवराव म्हणतील... आणि पुढच्या दिलखुलास हसण्यात संवाद विरुन जाईल, असंच अजूनही वाटतंय. 'शत नमन माधव चरण मे' दुसरं काय करु शकतो?

**– भगवान दातार. जेष्ठ पत्रकार**
**मो.नं. – ९०१११ ३६९००**


**दि आजरा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.**
(मल्टि-स्टेट)
हेड ऑफीस - ३९३ बी, मेन रोड, आजरा ता. आजरा, जि. कोल्हापूर. फोन- ०२३२३-२४६१२२
: 8087779337 Email : ajarabank@ajarabank.com Website : www.ajarabank.com
Follow us on :

**ठेवी ₹ 1000,00,00,000 चा टप्पा पूर्ण**
**रू. एक हजार कोटी**

**आजरा बँक म्हणजे विश्वास!**
**सर्वोत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जिल्हा स्तरावरील सलग चार वेळा पुरस्कार**

जेष्ठ नागरीक 8% कालावधी 24 महिने
वैयक्तीक ठेव योजना 7.75% कालावधी 24 महिने


घर खरेदी/घरबांधणी 10%


वाहन खरेदी 10%


सोने तारण 10.50%

**31 मार्च 2025 ची आर्थिक स्थिती**
ठेवी 1025.69 कोटी
कर्जे 655.83 कोटी
गुंतवणूक 447.63 कोटी

*** बँकेच्या विविध शासकीय अनुदान कर्ज योजना व सुविधा ***
- प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना
- प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना
- प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना
- अण्णासाहेब पाटील कर्ज योजना
- एटीएम सुविधा
- मोबाईल बँकिंग सुविधा
- लॉकर सुविधा
- व्हॉट्सअॅप बँकिंग सुविधा
- साऊंड बॉक्स व क्यूआर कोड सुविधा

* अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधा व लाभ मिळवा.

# सहकारी ग्राहक भांडारांपुढील आव्हाने..

सहकारी चळवळीने देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे योगदान दिले आहे. भारतामध्ये सहकारी चळवळीचा उगम होऊन अनेक वर्षे लोटली. पण सहकारी चळवळ खऱ्या अर्थाने रुजली ती महाराष्ट्रातच. महाराष्ट्राखेरीज इतर राज्यात सहकारी चळवळ फक्त नावाला आणि कागदावरच दिसते. महाराष्ट्राच्या खेडोपाडी मात्र ही चळवळ अधिक फोफावलेली आढळते.

**❊ सहकार चळवळ ग्रामीण भागात विस्तारली –**

आज महाराष्ट्रात शहरी व निमशहरी भागात, तालुक्याच्या ठिकाणी साखर कारखाने, सहकारी बँका, पतसंस्था, ग्राहक सहकारी संस्था, प्रक्रिया संस्था, दूध उत्पादक संस्था, सूत गिरण्या आदी सहकारी संस्थांचे जाळे पसरलेले आहे. याचे कारण महाराष्ट्राला लाभलेले दिग्गज नेते यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, वसंतराव नाईक, तात्यासाहेब कोरे, विष्णू आण्णा पाटील, रत्नाप्पा कुंभार, विखेपाटील अशा मोठ्या व मातब्बर नेत्यांनी सहकाराचा वृक्ष रुजवला, वाढवला आणि मोठा केला. डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता या नेत्यांनी सहकारी चळवळीला विचारांचे खतपाणी घातले.



**सूर्यकांत पाठक**
**९४२२० १६८९५**

ही चळवळ ग्रामीण भागात चांगलीच विस्तारली. ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध झाला. जीवनमान उंचावण्यास मदत झाली. काही प्रमाणात बेकारी कमी झाली आणि देशाच्या अर्थव्यवस्थेस हातभार लागला. सहकारी चळवळीच्या योगदानाची महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करावी लागेल एवढे बहुमूल्य कार्य या चळवळीचे आहे. सहकारी साखर कारखाने, बँका, नागरी व ग्रामीण पतसंस्था यांच्या जोडीनेच ग्राहक सहकारी संस्थांनी महत्त्वाची कामगिरी केली आहे.

**❊ ग्राहक भांडारे राज्यात कार्यरत –**

ग्राहक पेठ, भारती बझार, वारणा बझार, श्रीराम बझार अशी काही ग्राहक भांडारे आज महाराष्ट्रात कार्यरत आहेत. तथापि एक महत्त्वपूर्ण बाब या ठिकाणी लक्षात घेतली पाहिजे की, सहकारी चळवळीच्या सर्व घटकांमध्ये ग्राहक संस्था हा घटक दुर्बल घटक आहे. इतर घटकांच्या उलाढालीच्या व नफ्याच्या तुलनेत ग्राहक सहकारी संस्थांची उलाढाल व मिळणारा नफा अत्यल्प आहे. त्या अर्थाने ग्राहक सहकारी संस्थांमध्ये जसे अंगभूत सामर्थ्य आहे तसेच अंगभूत मर्यादाही आहेत. त्यामुळे या संस्थांची वाढ व विकास काहीसा खुंटलेला आहे. त्यातच देशाच्या मुक्त आर्थिक धोरणाचा फार मोठा फटका ग्राहक संस्थांना बसला आहे. उदारीकरणाच्या धोरणाने जगातल्या विकसित देशांना भारतीय बाजारपेठ खुली झाली आहे. मोठे मोठे देशी व विदेशी मॉल्स भारताच्या महत्त्वाच्या शहरांत सुरू होत आहेत. भांडवलदार व बहुराष्ट्रीय भांडवलदारांना देशातील सुमारे ४० कोटी मध्यमवर्गीयांची बाजारपेठ खुणावू लागली आहे. एवढी लोकसंख्या जगाच्या नकाशावर असलेल्या कित्येक देशांचीसुद्धा नाही हे मॉल्स व सुपरमार्केट्स आधुनिक तंत्रज्ञान, अलिशान जीवनशैलीला लागणाऱ्या वस्तू आणि इतर सर्व काही रिटेलिंगमध्ये आणीत आहेत. परिणामी सहकारी पद्धतीच्या दुकानांपुढे आव्हान उभे राहिले आहे.



आज राज्यात सुमारे १५० होलसेल सहकारी ग्राहक भांडारे व सुमारे ३५०० प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारे नोंदणीकृत असून मात्र त्यापैकी काहीच व्यवस्थित चालू आहेत असे समजते.

**❊ नवीन आर्थिक धोरणाचा परिणाम ?**

नव्या आर्थिक धोरणाच्या अंगीकारामुळे खासगी क्षेत्र व बहुराष्ट्रीय कंपन्या रिटेलिंग उद्योगात शिरकाव करीत आहेत. यामुळे सहकारी संस्थांना धोका निर्माण झाला आहे. या कंपन्या आर्थिकदृष्ट्या सुदृढ असल्याने त्यांच्या मालाची व सेवांची ते मोठ्या प्रमाणात जाहिरात करू शकतात तसेच त्यांच्या ब्रॅण्डखाली मालाची विक्री करता त्यांच्या तुलनेत ग्राहक सहकारी संस्थांना असा खर्च करणे परवडणारे नाही.

आणि म्हणूनच ग्राहक सहकारी संस्थांना आपल्या अस्तित्वासाठी आपल्या कार्यपद्धतीत बदल करून ग्राहकांना अधिक चांगली सेवा व मालाचा उच्च दर्जा प्राप्त करून दिला पाहिजे. यापुढील काळात छोट्या संस्था काळाच्या ओघात टिकतील याची खात्री देता येत नाही. ग्राहक संस्थांना आपापसात सतत संपर्क व विचारांची देवाण घेवाण करावी लागेल.

**❊ आर्थिक सक्षमीकरणास हातभार –**

याबरोबरच यापुढील काळात एकत्रित खरेदी करण्याच्या मार्ग अवलंबून बड्या भांडवलदारांवर अंकुश ठेवता येईल व त्यायोगे खर्चावर नियंत्रण आणता येईल. तसेच एकत्र येऊन शासनावर दबाव निर्माण करावा लागेल.

**❊ जागतिक स्पर्धेला सामोरे जाता येईल –**

सहकारी तत्त्वप्रणालीतील सहावे तत्त्व सहकारातील सहयोग या संदर्भात अधिक महत्त्वाचे आहे. नागरी सहकारी बँका, ग्रामीण पतसंस्था व जिल्हा बँका नागरी सहकारी बँका, ग्रामीण पतसंस्था व जिल्हा बँका यांनी या तत्त्वाच्या आधारावर सहकारातील दुर्बल घटक ग्राहक संस्थांना कमी व्याजदराने पतपुरवठा केला तर या संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल.

जागतिकीकरणाला स्थानिकीकरण हा योग्य पर्याय होईल. ग्रामीण भागातील उत्पादकांच्या मालाला ग्राहक सहकारी भांडारातून बाजारपेठ उपलब्ध करून घ्यावी लागेल. या पद्धतीने मार्गक्रमण केल्यास जागतिक स्पर्धेला तोंड देता येईल.

**– सूर्यकांत पाठक**
**कार्यकारी संचालक, ग्राहक पेठ**
**मो.नं. – ९४२२० १६८९५**

*****

# देशातील साखर उद्योगाची आगामी वाटचाल



देशभरातील एकूण ५३४ कारखान्यांपैकी जेमतेम १८ कारखान्यांचा गाळप हंगाम (special season) सुरू असून यंदाच्या गाळप हंगामाची सांगता सप्टेंबर अखेर पूर्ण होईल. तेव्हा एकूण नवे साखर उत्पादन २६१ लाख टन होईल आणि त्याशिवाय ३२ लाख टन साखरेचा वापर इथेनॉल निर्मितीकडे वळवण्यात येईल. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या वर्षी ५८ लाख टन साखर निर्मिती कमी राहिल्याने सध्या साखर बाजार थोडा तेजीत आहे. अर्थात आजचा साखरेचा दर हा सरासरी साखर उत्पादन खर्चापेक्षा कमीच आहे.

ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या नव्या गाळप हंगामातून देशभरात तयार होणारे नवे साखर उत्पादन ३५० लाख टन अपेक्षित आहे, जे यंदाच्या २६१ लाख टनापेक्षा ८९ लाख टनाने जास्त असणार आहे. अर्थात त्यातून किती साखर इथेनॉलकडे वळवली जाईल, त्यावरच पुढील साखर बाजार कसा राहिल, हे अवलंबून असणार आहे.

**✻ साखरेच्या खपावर परिणाम ?**



**प्रकाश नाईकनवरे**

अलीकडच्या काळात देशातील स्थानिक साखरेचा खप कमी होताना दिसत आहे. नवीन पिढी आरोग्याबाबत अधिक जागरूक झाल्याने तसेच साखरेच्या एकूण खपामध्ये जवळपास ६५ टक्के वाटा असणाऱ्या औद्योगिक ग्राहकाचा साखर खरेदीतील आखडता हात लक्षात घेता देशातील एकूण साखर खप, जो पूर्वी २९० ते २९५ लाख टन असायचा तो यंदाच्या वर्षी २८० लाख टनांपर्यंतच सीमित झाला आहे. ही एक चिंतेची बाब आहे.

यंदाच्या गाळप हंगामाचे वैशिष्ट्य म्हणजे हंगाम जेमतेम १०० दिवसांच्या आतच आटोपता घ्यावा लागलेला आहे. ठोकताळ्याप्रमाणे कारखाना किमान १६० दिवस चालला पाहिजे, तरच जमा-खर्चाचे गणित जुळू शकते. कुठलाही कारखाना पूर्ण काळ चालण्यासाठी कच्च्या मालाची उपलब्धता आणि त्याचा सुरळीत पुरवठा या बाबी अत्यंत जरुरीच्या आहेत.

**✻ ऊस क्षेत्र वाढणे अशक्य –** देशपातळीवरील ५५ लाख हेक्टर क्षेत्र नजिकच्या भविष्यात फारसे वाढेल अशी शक्यता नाही. त्यामुळे आहे त्या क्षेत्रातून उत्पादकता वाढवून सर्व कारखान्यांना पुरेसा ऊस पुरवठा कायमस्वरूपी भविष्यात होणे निकडीचे आहे. त्यासाठी वसंतदादा साखर संशोधन संस्थेने बारामतीच्या ॲग्रीकल्चर ट्रस्टसोबत कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाबाबत collaboration केले आहे. त्याद्वारे ४० टक्के उत्पादकतेत वाढ आणि ३०% खर्चात बचत अशी दुहेरी जादू होणार आहे.

दुसरी एक चिंतनीय बाब म्हणजे ज्या साखर उद्योगासाठी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी इथेनॉल योजना आणण्यात आली, त्या साखर उद्योगाकडून केवळ ३२ टक्के इथेनॉल घेतले आहे. उर्वरित ६८ टक्के इथेनॉल धान्यापासून तयार करून घेण्यात येत आहे. आणि या धान्य इथेनॉलचा खरेदी दर सर्वात जास्त रु. ७१.८६ प्रति लिटर असा ठेवला आहे. मात्र साखर उद्योगातून तयार होणाऱ्या इथेनॉलच्या दरात गेल्या अडीच वर्षांत कोणतीही वाढ झालेली नाही. इथेनॉल प्रकल्पांमध्ये कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. त्यामुळे आपल्या इथेनॉलच्या दरात वाढ होणे आणि Allocation धान्य-इथेनॉलच्या प्रमाणात होणे आणि आमच्या इथेनॉलची उचल प्राधान्यतेने होणे अत्यंत निकडीचे आहे. त्यातच काही लोकांकडून इथेनॉल योजनेबाबत गैरसमज पसरवण्याची मोहीम राबविण्यात आली. मात्र त्याला केंद्र शासनाकडून सडेतोड उत्तर देण्यात आले आणि कालच्या ९ तारखेला सर्वोच्च न्यायालयाने देखील इथेनॉल विरोधातील याचिका खारीज केली आहे, त्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

**✻ साखर उद्योगाचा रोड मॅप तयार –** राष्ट्रीय सहकारी साखर महासंघ यांनी देशातील साखर उद्योगाच्या पुढील १० वर्षांच्या वाटचालीवर एक सविस्तर रोड मॅप तयार केलेला आहे आणि तो देशाचे गृह व सहकार मंत्री अमित शहा यांना सादर करण्यात आला आहे. देशातील उस, साखर, इथेनॉल या विषयांवर अंतिम निर्णय घेणाऱ्या केंद्रिय मंत्री गटाचे प्रमुख अमित शहा आहेत. या मंत्री गटात केंद्रिय वित्त मंत्री, कृषी मंत्री, अन्न मंत्री पेट्रोलियम मंत्री आणि व्यापार मंत्री यांचा समावेश असतो.

महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील साखर उद्योग एका निर्णायक वळणावर आलेला आहे. एकीकडे वाढलेली गाळप क्षमता आणि दुसरीकडे कमी होत असलेला गाळप हंगामाचा कालावधी यांचा मेळ घालण्यासाठी पर्याप्त ऊसाची उपलब्धता होणे आव्हानात्मक आहे. त्यासाठीच आपल्या सर्वच कारखान्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा अवलंब केला पाहिजे. गावोगावी मेळावे घेण्यात आले पाहिजे. या तंत्रज्ञानाचा अवलंब केल्याने मर्यादित क्षेत्रातून वाढीव ऊस उत्पादन कमी खर्चात मिळण्याची शाश्वती आहे.

**✻ साखरेच्या किमान विक्री दराबाबत धोरण हवे –** केंद्रशासनाने जून २०१८ मध्ये घेतलेल्या एका ऐतिहासिक निर्णयामुळे कारखाना स्तरावरून विक्री होणाऱ्या साखरेचा किमान विक्री दर बांधून मिळाला आणि त्यामुळे साखर उद्योगाला नवसंजीवनी मिळाली आहे. मात्र या किमान विक्री दरात (MSP) वेळोवेळी आढावा घेऊन जी वाढ अपेक्षित होती, ती पूर्ण होत नाही. मध्यंतरी राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाने देशभरातील उद्योगाशी निगडित सर्व घटकांना एकत्र आणून विचार विनिमयानंतर उत्पादन खर्चाच्या आधारावर साखरेचा (MSP) रु.४२ प्रति किलो करण्याचे निवेदन केंद्रशासनाला सादर केले होते. त्यावर अजून निर्णय प्रलंबित आहे. तोपर्यंतच्या काळात सध्या प्रचलित असलेल्या रु.३०००/- प्रति क्विंटल या दराला (MSP) आणावी असे आवाहन करतो. यामुळे शेतकऱ्यांना समाधानकारक ऊस दर मिळू शकेल, साखर उद्योगाची आर्थिक घडी बसू शकेल आणि ग्राहकांच्या पचनी पडलेला हा दर सर्वमान्य होऊ शकेल, असा विश्वास आहे.

**– प्रकाश नाईकनवरे**
**व्यवस्थापकीय संचालक**
**राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ, नवी दिल्ली**
**मो.नं. – ९२०५३ ७७५५४** ✻✻✻✻✻

# अभ्यासगटाच्या शिफारशींची अंमलबजावणी होण्यासाठी पुनर्विकास प्राधिकरण स्थापन होणार



संयुक्त राष्ट्राच्या महासभेने २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केल्यानंतर २५ नोव्हेंबर २०२४ ते ३० नोव्हेंबर २०२४ मध्ये नवी दिल्ली येथे जागतिक सहकारी परिषद आणि महासभा आयोजित करण्यात आली होती. या महा-अधिवेशनात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणारे अनेक कार्यकर्ते, नेते अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिषदेत जानेवारी २०२५ पासून सुरू होणारे वर्ष हे संपूर्ण भारतभर सर्व सहकारी संस्थांनी साजरी करावी असा ठराव एकमताने संमत करण्यात आला. सहकारातून एक चांगले जग निर्माण करू या घोषवाक्यप्रमाणे चांगले जग निर्माण करण्यासाठी काम करणे आवश्यक आहे. यासाठी भारतातील विविध प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांनी एकत्रितपणे मोठ्या प्रमाणावर चर्चासभा मिळावे परिसंवाद प्रदर्शने यांच्या आयोजन करण्याच्या ठराव एकमताने संमत करण्यात आला. या परिषदेला आमच्या महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यामुळे यात प्रत्यक्ष सहभाग घेता आला. तसेच गृहनिर्माण संस्था व अपार्टमेंट्सचा या २०२५ आंतरराष्ट्रीय वर्षात कशाप्रकारे सहभाग असेल व काय काय गोष्टी आम्ही करू शकतो, इतर देशात काय चालू आहे याचा आढावा घेता आला.



**सुहास पटवर्धन**
**९४२२० ०४७०१**

*** २०२५ या आंतरराष्ट्रीय वर्षाची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.**

१. सरकार आणि सहकारी संस्थांसाठी सक्षम व प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण करणे

२. सहकारी संस्थांनी जनजागृती नवीन नेतृत्व निर्माण करणे व सहकार्य दृढ करणे

३. शैक्षणिक संस्था व विकास संस्थांनी सहकार्य शिक्षण क्षमता वृद्धी व आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना देणे

४. जनतेत सहकारी तत्त्वज्ञानाची जाणीव वाढवणे व सहकारी उपक्रमांना पाठिंबा मिळवणे

महाराष्ट्रात सुमारे १,२६,५०० गृहनिर्माण संस्था आणि २,००,००० अपार्टमेंट्स आहेत. आमच्या मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, नाशिक, इत्यादी सर्व महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाने या राज्यभर ठीक-ठिकाणी सभासदांसाठी मेळावे, परिसंवाद आयोजित केले आहेत.

महाराष्ट्रात या वर्षात राज्य सरकारने सहकार, महसूल इ. महत्त्वाची खाती ऑनलाईन करण्यास सुरुवात केल्याने त्याचा संस्थांच्या सभासदांना फायदा मिळाला सुरुवात झाली आहे.

सामान्य नागरिकांना आपले नोंदणीकृत दस्त, करारनामे, सातबारा, प्रॉपर्टी कार्ड, मोजणी नकाशे मिळण्यासाठी यापूर्वी असंख्य वेळा हेलपाटे मारावे लागत होते. वेळ, पैसे आणि ऊर्जा खर्च करावी लागत होती. ती आता वाचणार आहे. महाराष्ट्रातील सर्व दस्तऐवजांचे स्कॅनिंग झाले आहे. आता शासन ते सर्व दस्त नागरिकांनी घेऊन जावे यासाठी जाहिराती देऊ लागले आहे. आपल्या महासंघाने भारतातील पहिले AI वर आधारित सहकार संवाद हे ऑनलाईन पोर्टल सर्व नागरिक, सभासदांसाठी उपलब्ध करून दिले आहे. त्यामध्ये सहकार विभागाची सर्व परिपत्रके, राज्यातील सहकार कार्यालयांची नावे, पत्ते, संपर्क क्रमांक उपलब्ध करून दिला आहे. तक्रारी सोडवण्याबरोबरच २५० पेक्षा कमी सभासद असणाऱ्या गृहनिर्माण संस्थांची ई-प्रवर्गातील निवडणूक नियमावली प्रक्रिया, त्यांचे प्रशिक्षण ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करून दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज अभियानाअंतर्गत सेवा पंधरवडा शासनाच्या विविध कार्यालयाने विविध सेवा कालबद्ध रीतीने नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन केले आहे. महाराष्ट्र हे तर भारतातील सर्वात प्रगतीशील राज्य आहे. सहकाराची महाराष्ट्रातील परंपरा फार मोठी आहे. डेक्कन जिमखाना पारशी, सारस्वत सोसायटी अशा शंभर वर्षे झालेल्या गृहनिर्माण संस्था महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रात माननीय कै. डॉक्टर धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, वसंतदादा पाटील, शरद पवार, उल्हास पवार, विद्याधर अनास्कर यांचेप्रमाणे अनेक नेते सहकारातून येऊन त्यांनी देशा-विदेशात आदर्श निर्माण केलेला आहे.

महाराष्ट्रात सुमारे २,८०,००० नोंदणीकृत संस्था आहेत. सहकारी गृहनिर्माण संस्था, मजूर संस्था, ग्राहक, उत्पादक, बँक, पतसंस्था, साखर कारखाने इ. प्रकारच्या सहकारी संस्था आहेत. त्यात गृहनिर्माण संस्था संख्येने सगळ्यात जास्त असून इतकी वर्षे त्या सगळ्यात दुर्लक्षित होत्या. परंतु आमच्या महासंघामुळे आणि सभासदांनी जागरूकता दाखवल्यामुळे शासनाने अनेक प्रलंबित प्रश्न सोडवण्यास सुरुवात केली आहे. पूर्वी सहकार हा वेगळा विभाग नव्हता. तो कृषी खात्याच्या अखत्यारीत होता. केंद्रीय गृहमंत्री सहकार अमित शहा यांचे नेतृत्वाखाली ८ जुलै २०२१ रोजी केंद्र सरकारने वेगळा स्वतंत्र विभाग स्थापन केला आहे. या मंत्रालयाचा उद्देश सहकारातून समृद्धी आणणे हा आहे. देशातील सहकार चळवळ बळकट करण्यासाठी या खात्याची निर्मिती झाली आहे. पुण्यातील खासदार मुरलीधर मोहोळ यांना केंद्रीय राज्यमंत्री म्हणून संधी मिळाली आहे.

**पुढील पानावर...**

# श्री साईकृपा सहकारी पतसंस्थेचा सहकार भूषण पुरस्काराने गौरव

**जुन्नर –** जुन्नर तालुका पतसंस्था महासंघाच्या वतीने श्री साईकृपा सहकारी पतसंस्थेला सहकार भूषण पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले आहे.

५१ ते १०० कोटी ठेवी असणाऱ्या गटात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. राज्याचे अपर निबंधक श्रीकृष्ण वाडेकर, गजेंद्र देशमुख, महासंघ अध्यक्ष अमित बेनके व्यासपीठावर होते. पतसंस्था अध्यक्ष सदाशिव बोरचटे, उपाध्यक्ष सावकार पिंगट आदी पदाधिकारी उपस्थित होते. पतसंस्थेच्या यशाबद्दल खातेदार तसेच हितचिंतक यांनी पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

# सहकार भारती संस्थापक स्व. लक्ष्मणराव इनामदार यांना अभिवादन

**नंदुरबार –** सहकार भारतीचे संस्थापक स्व. लक्ष्मणराव इनामदार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा सहकार भारतीच्या कार्यकारिणी सदस्यांनी इनामदार यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय पतपेढीचे अध्यक्ष नानाभाऊ माळी यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सहकार भारती कार्यकारिणी सदस्य, तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. जिल्हा संघटन मंत्री महादु हिरणवाळे यांनी प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले.

# अभ्यासगटाच्या शिफारशींची अंमलबजावणी...

राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार सचिव प्रवीण दराडे, आयुक्त दीपक तावरे व सहकारातील इतर ज्येष्ठ अधिकारी यांना सहकाराविषयी प्रेम आहे. समस्यांची जाण आहे. यामुळे सरकार आता गतिमान झाले आहे. महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, ज्यांनी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट यांनी जमीन व इमारत मालकीची होण्यासाठी मानीव अभिहस्तांतरण विधेयक एप्रिल २००७ मध्ये मंजूर केले आणि त्याच्या अधिसूचना २०१० मध्ये करण्यात आली. दुर्दैवाने महाराष्ट्रातील फक्त ५०%-५५% संस्थांनी याचा फायदा घेतला आहे.

महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघाच्या २०२५ आंतरराष्ट्रीय व सहकार वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या महा-अधिवेशनास मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस, केंद्रीय सहकार मंत्री मुरलीधर मोहोळ, प्रवीण दरेकर, बाळासाहेब अनास्कर, सहकारातील ज्येष्ठ अधिकारी, आमदार, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. या महा-अधिवेशनात शासनाकडे मागण्या मांडल्या होत्या.

महासंघाच्या पाठपुराव्यामुळे ऑनलाईन पद्धतीने मुंबई आणि पुणे येथे सुनावणी सुरू झाली आहे. संस्थांची नोंदणी थकबाकी १५४ ब सुनावणी, दिवसाचा बोर्ड इत्यादी लवकरच ऑनलाईन पद्धतीने चालू होणार आहे. शासनाने २०१९ साठी काढलेल्या संस्थांच्या पुनर्विकास करण्यासाठी काढलेल्या परिपत्रकात एक खिडकी योजना, TDR मध्ये सवलत १०% जास्तीचा FSI व्याजात सवलत, रस्ते सवलत, स्टॅम्प ड्युटी, टॅक्समध्ये सवलत आणि अतिरिक्त सुलभ आणि वेळेत कर्जपुरवठा हे फक्त कागदावर होते. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसात १०० कार्यक्रम गतिमान करण्यासाठी प्रवीण दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. त्यांनी जिल्हा आणि राज्य महासंघाबरोबर तसेच इतर अनेक जणांशी चर्चा करून १४ जुलै २०२५ रोजी अभ्यासगटाचा अहवाल सादर केला आहे. तो संबंधित विविध खाती, सहकार, वित्त, हौसिंग, नगर विकास इत्यादी खात्याकडे पाठवण्यात आला.

त्यावर या खात्यांचे मंत्री, अधिकारी यांच्याबरोबर चर्चा होऊन महाराष्ट्र शासन लवकरच एकत्रित सर्व खात्यांसाठी परिपत्रक काढून योग्य त्या सूचना देणार आहेत. सदर अभ्यासगटाने सादर केलेल्या शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी राज्यातील स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरण स्थापन करण्यास मुख्यमंत्री यांनी मान्यता देऊन या प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून आमदार प्रवीण दरेकर विधानसभा परिषद सदस्य, अध्यक्ष, मुंबै बँक, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांना नियुक्त करून त्यांना मंत्री दर्जा देण्यास विशेष बाब म्हणून नेमणूक केली आहे. या स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाद्वारे राज्यातील गृहनिर्माण संस्था अपार्टमेंटस यांना सर्व प्रकारचे सहकार्य मिळण्यासाठी या आंतरराष्ट्रीय वर्षानिमित्ताने सुरुवात झाली आहे.

हे प्राधिकरण वास्तुविशारद, विकसक, वकील प्रकल्प सल्लागार, सनदी लेखपाल यांचे पॅनल निर्माण करून ते ऑनलाईन प्रत्यक्ष उपलब्ध करून देणार आहे. सध्या कर्ज पुरवठ्यासाठी मर्यादित बँक, संस्था उपलब्ध आहेत. देश-विदेशातील वित्तीय संस्था, नॅशनल बँक, LIC, HDFC, ICICI या अनेक वर्षे गृहबांधणीसाठी कर्ज पुरवठा करत आहेत. त्या स्वयं/समूह पुनर्विकासासाठी वेळेवर अल्पदरात उपलब्ध करून देतील याची मला खात्री आहे.

राज्यात ई-रजिस्ट्रेशन प्रणालीमुळे नोंदणी प्रक्रिया पारदर्शक सुरक्षित आणि सोयीस्कर झाली असून गेल्या पाच वर्षात ३१,७८५ दस्तांची नोंदणी करण्यात आली आहे. केंद्र राज्य सरकारची स्थानिक



स्वराज्य संस्थांची सर्व खाती ऑनलाइन झाली असून २०२५ या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात अनेक प्रलंबित असलेली सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट कंडोमियमची खरेदी खत किंवा किंवा मानवी हस्तांतरण लगेच होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कसेल त्याची जमीन या न्यायाने कुळ-कायदा महसूल खात्यात आवश्यकता सुधारणा करून धाडसी निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे ज्या संस्थांना बारा वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यांची नावे सातबारा किंवा प्रॉपर्टी कार्डवर ताबडतोब लावावीत आणि ज्या जमीन मालक किंवा विकसक यांची काही संस्थांच्या सभासदांकडून पैसे येणे बाकी असेल तर तेवढीच प्रकरणे फास्ट ट्रॅक, द्रुतगती न्यायालय, लवाद इत्यादीद्वारे सोडवता येतील.

महासंघाच्या सर्व मागण्या १५४ ब नियमावली, जिल्हा आणि राज्य महासंघाच्या अधिसूचित करणे, सर्व प्रक्रिया ऑनलाईन करणे हे या २०२५ आंतरराष्ट्रीय वर्षात तीन महिन्यांत हे सरकार करेल, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यास महासंघ कटिबद्ध आहे.

**– सुहास पटवर्धन**
**अध्यक्ष, राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ, पुणे**

*****

# दुग्ध व्यवसायासाठी तंत्रज्ञानयुक्त गोठ्यांची आवश्यकता



डॉ. विवेक क्षीरसागर
९९७०० ६६७८६

दुग्ध व्यवसाय हा भरभराटीला जात नाही, त्याच्यातून लोकांना समाधान मिळत नाही. यामधून व्यावसायिक का बाहेर पडतात आणि त्या उद्योगाला उज्वल असं भवितव्य नाही. या सगळ्याचा विचार करताना वाहन व्यवसाय या व्यवसायाशी तुलना करू, शासन आणि सर्वांनी लक्ष दिलं तर दूध क्षेत्राला ऊर्जितावस्था येण्यात कोणत्याही प्रकारची अडचण नाही.

• **विविध बाबींचा विचार आवश्यक** – १) प्रत्येक दिवशी, वर्तमानपत्रांमध्ये वाहनांच्या जाहिराती येत असतात. त्यामुळे समाजात तरुण वर्गापासून वयस्कर लोकांपर्यंत एक प्रकारची प्रतिमा केली आहे, आपण त्याच्या मागे आहोत.

२) वाहनांच्या अनेक कंपन्या आहेत, अनेक मॉडेल्स आहेत, त्याच्यामध्ये वेगवेगळे प्रकार आहेत. काही वाहने पेट्रोलवर तर काही डिझेलवर, काही सीएनजीवर, काही एलपीजीवर आणि आता हायड्रोजनचा वापर करणार आहोत. काही प्रवासी वाहने आहेत, अशा प्रकारच्या मोठ्या जाहिराती दूध व्यवसायाच्या दिसत नाहीत की, ज्यामुळे लक्षात येईल की दूध धंद्यामध्ये किंवा पशुसंवर्धनाच्या काही गोष्टींमध्ये किती प्रकारच्या प्राण्यांचे संगोपन करू शकतो, किती ठिकाणी दुधाची उपलब्धता होऊ शकते आणि त्या गाई आणि म्हशींच्यामध्येसुद्धा अनेक प्रकारचे वेगवेगळ्या प्रकारच्या जाती आहेत. त्यांचाही उपयोग कशा पद्धतीने करता येईल, अशा प्रकारचा मार्गदर्शनही घडताना दिसत नाही.

३) या संपूर्ण प्रक्रियेमध्ये पाहिलं तर वाहनांना वेगवेगळ्या बँकांकडून किंवा वेगवेगळ्या संस्थांकडून अर्थसाहाय्य कमीत कमी मुद्दल देऊन कर्ज उपलब्ध करता येतं आणि ते कर्जसुद्धा त्या वाहनालाच तारण ठेवून करता येतं आणि त्यामुळे सर्वसामान्य माणसालासुद्धा हजार –दोन हजार भरले तरी लाखाची मोटर सायकल सहजगत्या विकत घेता येते. ती विकत घेताना त्याचं रजिस्ट्रेशन असतं, नंबर असतो, इन्शुरन्स असतो. त्याच्याबद्दलची सगळी माहिती ही दिली जाते. त्याला लायसन्स मिळतं, ही व्यवस्था पशुसंवर्धनामध्ये दिसत नाही. आज जनावर घ्यायचं म्हटलं तर बँका कर्ज देत नाहीत, कर्ज दिलं तर ते इतकं किचकट पद्धतीने दिले जातं किंवा शेतकऱ्यांची जी गरज आहे ती न बघता त्याला दुसरंच दिलं जातं आणि अशा प्रकारच्या गोष्टींच्यामुळे टॅगिंग होत नाही. त्यामुळे रजिस्ट्रेशन होत नाही. कुठेही कंट्रोलिंग ऑथोरिटी नाही. त्यांचा इन्शुरन्स हा वर्षा–वर्षाचा असतो, तोसुद्धा कोणी करत नाही. केलं तर त्यात फक्त बँक कर्जाच्या पोटी फक्त केला जातो. सिस्टिमेटिकली कशा होतील हे पहावं लागेल.

४) वाहन व्यवसायामध्ये एक देखभाल आणि दुरुस्तीची साखळी आहे. जागोजागी व त्याची गॅरेजेस दिसतात. जे विकणारे लोक आहेत,



त्या कंपन्यांचे पण ऑथराईज सर्विस सेंटर असतात. त्या ठिकाणी वाहनाचा अगदी पिकअप करण्यापासून परत आपल्या दरवाजापर्यंत सोडण्याची सगळी तयारी असते. त्याचबरोबर ज्याला एखाद्याला वाहनाची खूप गरज आहे तर त्यावेळेस त्याला रिप्लेसमेंट वाहन पण दुसरं दिलं जातं. या प्रकारची सोय जनावराच्या दुग्ध व्यवसायामध्ये दिसत नाही. जनावर आजारी पडलं तर त्याच्यासाठी डॉक्टर्स मिळत नाहीत. डॉक्टर्स मिळाले तर त्यांच्या सुट्ट्या काही वेळेस असतात. त्या जनावराचे हाल होतात त्याला वेळेवर ट्रीटमेंट मिळत नाही. अशा वेळेस जो तोटा आहे, हा त्या दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या माथी मारला जातो.

५) वाहने घेतली आणि असं वाटलं की, या वाहनांचा आता विक्री करावी किंवा परत रि–सेल करावा तर त्या लगेच त्या पद्धतीच्या वेगवेगळ्या संस्था, दुकान आहे तिच्या ठिकाणी ती गाडी विकू शकतो किंवा नवीन गाडी घेऊ शकतो. सगळ्यात मोठा जो फायदा आहे हा ते मॉडेल्स एक्स्चेंज पण करू शकतो. ही सेवा सुविधा दुग्धव्यवसायात दिसत नाही. कारण जर वाटलं, उद्या गाईच्या धंद्यावरून म्हशीकडे जावं किंवा म्हशीवरून शेळ्यांच्याकडे जावं तर अशा प्रकारच्या सेवा सुविधा आपल्याकडे नाहीत. वेगवेगळ्या प्रकारचं त्या शेतकऱ्याला व्यवस्थित भाव हा दूर जनावर खरेदी करताना त्या विक्री करताना मिळत नाही. रोज हजारो कोटी त्याच्यावरती खर्च होत असतात. दुग्ध व्यवसायासाठी इतक्या मोठ्या प्रकारची गुंतवणूक होताना दिसत नाही. त्यामुळे त्या जनावरांच्या, दुग्ध व्यवसायासाठी सेवा सुविधा करण्याची गरज आहे आणि या प्रकारची जर गुंतवणूक झाली तर दुधाच्या नद्या व्हायला वेळ लागणार नाही.

• **अद्ययावत गोठे असायला हवेत** – जनावरांना चांगल्या प्रकारचे गोठे तयार करणं हीसुद्धा आपली गरज आहे आणि जिथं जनावरांना पिण्यासारखं पाणी उपलब्ध नाहीये पण चांगल्या प्रकारचे पाणीसुद्धा देता येण्यासारखी परिस्थिती निर्माण केली पाहिजे. व्यवसायासाठी करतोय त्या जर दुग्ध व्यवसायासाठी देशापुढचे जे अनेक प्रश्न आहेत. महिलांना रोजगारीचा प्रश्न आहे, त्यांना त्यांच्या सबलीकरणाचा प्रश्न आहे, हे सगळे प्रश्न; मानसिक रोगावरती पण जनावर मानसिक ताण तणाव कमी करण्याचा प्रश्न असेल सर्व दूध व्यवसायास नाही पण टोटल पशुसंवर्धन व्यवसायाला चांगले दिवस येण्यासाठी या गोष्टींचा वापर करावा लागेल एवढंच सांगावंसं वाटतंय.

दुग्ध व्यवसाय व वाहन व्यवसाय यांची तुलना करण्यामागचा दृष्टिकोन हा होता की, आज दुग्ध व्यवसाय हा जागतिक पातळीवरती विचार केला तर प्रतिमाणशी दुधाची उपलब्धता हे अमेरिका व इस्त्रायल सारख्या देशांमध्ये जवळपास ती १२ लीटर एवढी असताना भारताची मात्र ती ३०० मिली आसपासच आहे. महाराष्ट्र हा दूध उत्पादनात जरी देशात सातवा क्रमांकावरती असला तरी प्रतिमाणशी दूध उपलब्धतेमध्ये मात्र किंवा दुधाचा वापर करण्यामध्ये मात्र तो देशांमध्ये सतराव्या क्रमांकावर आहे. त्यातच महाराष्ट्राचा विचार करता आज २०० मिलीच्या आसपास दुधाच्या वापर होतोय परंतु सरासरी हा वापर लक्षात घेतला तरी ग्रामीण पातळीवरती मात्र हा वापर १०० मिलीपेक्षासुद्धा कमी आहे. मग त्यामुळे लोकांना कॅल्शियमसारखी जी गोष्ट आहे की, जी दुधामध्ये उपलब्ध होऊ शकते. ती न मिळाल्यामुळे अनेक ठिकाणी कुपोषणाचे धोके निर्माण झालेले आहेत. भारतामध्ये पंजाब आणि हरियाणा जिथे ८०० मिली प्रतिमाणशी दुधाची उपलब्धता आहे.

• **महाराष्ट्राला प्रगतीसाठी मोठी संधी** – महाराष्ट्राने जर पंजाबबरोबर तुलना करायचं म्हटलं तर आपल्याला जवळपास चौपट प्रगती करावी लागेल

पुढील पानावर...

# पूर्णवादी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना ७ टक्के लाभांश जाहीर

**बीड** – पूर्णवादी नागरिक सहकारी बँकेची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. सुभाष जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. अरुण निरंतर यांचे उपस्थित होते. बँक सदस्यांना ७ टक्के लाभांश सभेमध्ये जाहीर करण्यात आला.

सभेच्या नोटीसचे वाचन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश कुलकर्णी यांनी केले. बँकेचा सन २४-२५ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफा तोटा पत्रकाचे वाचन केले. बँकेचे अध्यक्ष डॉ. जोशी यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करून बँकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा सभेसमोर मांडला.

बँकेने ४१व्या वर्षात पदार्पण केले असून मार्च २५ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु.८९७.१३ कोटी तर कर्जे रु.५३७.४४ कोटीची असून बँकेचा एकूण व्यवसाय हा रु.१४३४ कोटी झाला आहे. अहवाल वर्षात बँकेस ८ कोटी ७५ लाख इतका निव्वळ नफा झाला आहे.

नेट एनपीएचे प्रमाण ०.६० इतके आहे बँकेचा सीआरएआर १३.८७ टक्के इतका आहे. येत्या आर्थिक वर्षासाठी ठेवीचे उद्दिष्ट रू.१२०० कोटी व कर्जे रू.८०० कोटी ठेवले असून भविष्यात बँकेला शेड्युल्ड दर्जा मिळवून देण्याचा निर्धार केला आहे या उद्देशाने व्यवसाय वृद्धीसाठी मागील वर्षभरात बँकेच्या ११ शाखांमध्ये ग्राहक मेळावे आयोजित केले गेले.

ग्राहकांना कमी व्याजदरामध्ये कर्ज कसे उपलब्ध करून देता येईल, यासाठी बँकेने विविध कर्ज योजना सुरू केल्या आहेत. त्याचप्रमाणे मागील आर्थिक वर्षात जालना व अंबाजोगाई येथील बँकेच्या शाखा नवीन प्रशस्त व सोयीच्या जागेत स्थलांतरित केल्या असून कडा, आष्टी व परभणी या शाखांच्या स्थलांतरासाठी सुद्धा रिझर्व बँकेची परवानगी मिळाली आहे. लवकरच तीन शाखा नवीन जागेत स्थलांतरित होतील.

शालांत परीक्षेत मिळवलेल्या यशाबद्दल विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. सूत्रसंचलन संचालक जगदीश शिरापुरकर यांनी आभार संचालक डॉ. विवेक पालवनकर यानी मानले.

## राज्य सहकारी संघाचा शिक्षण निधी पूर्ववत करणार – मुख्यमंत्री

**मुंबई** – राज्य सहकारी संघाचा शिक्षण निधी पूर्ववत करण्याबरोबर विविध समस्यांची सोडवणूक करण्यावर भर देण्यात येणार आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन विविध समस्यांबाबत चर्चा केली आणि संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात यावे अशी मागणी केली. तसेच विविध समस्यांचे एक निवेदन दिले.

राज्य सहकारी संघाची निवडणूक नुकतीच झाली त्यानंतर नूतन अध्यक्ष दरेकर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन विविध समस्यांची मांडणी केली.

त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी संयुक्त बैठक बोलवण्यात येईल, असे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे सहकारी संघाच्या विविध मागण्यांबाबत गांभीर्याने विचार करण्यात येणार असल्याचे सांगितले.

## दुग्ध व्यवसाय व वाहन व्यवसाय...

आणि जर उद्या आपण जर जागतिक पातळीवरती इस्त्रायल अमेरिकेसारख्या देशाच्या तुलनेत जर प्रगती करायची म्हटलं तर आपल्याला सहापट प्रगती करावी लागेल. त्यामुळे तसे दूध व्यवसायाला खूप मोठा वाव आहे.

परंतु दूध उत्पादनाबरोबर त्याची उपलब्धता, त्याची गुणवत्ता वेगवेगळे उपपदार्थ करणे आणि ते सर्वसामान्य माणसाला सोयीस्कररीत्या उपलब्ध करून देणं, ही जी मार्केटिंगची साखळी आहे. ही अत्यंत काळजीपूर्वक उपलब्ध करून दिल्यानंतर असं लक्षात येईल की महाराष्ट्र काय पण भारतालासुद्धा जागतिक पातळीवरती विचार करावा लागेल. भारतालासुद्धा चौपट यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. नुसतं भारत हा दूध उत्पादनात एक नंबर आहे, तसंच लोकसंख्येच्या बाबतीतसुद्धा एक नंबर आहे, हे विसरून चालणार नाही.

भारतामध्येसुद्धा दूध व्यवसायाला हे अत्यंत मोठ्या प्रकारचा वाव आहे. दूध व्यवसायामुळे १०१ टक्के आपल्याला बेरोजगारी कुपोषित मुले किंवा स्त्रिया यांचा संपूर्ण निर्मूलन करता येईल. दूध हा सात्त्विक पदार्थ असल्यामुळे त्याचे अधिकाधिक सेवन जर करू शकलो तर साहजिकच मानसिकता चांगली होणार आहे. दूध व्यवसायावर ज्या पद्धतीने बाकीच्यांनी आक्रमण केले आहे, ज्यामध्ये गायरानांच्या जागी वेगवेगळ्या प्रकारच्या इमारती उभ्या केल्या. वाहन व्यवसायाने घोडे+टांगे+बैल या यांची जी काही काम होती, ती संपवलेली आहेत. शेतीमध्ये सगळीकडे ट्रॅक्टर दिसतात पण बैल दिसत नाहीत. म्हणून प्रदूषण आणि या सगळ्याचा विचार केला तर भारत हा शेतीप्रधान देश आहे व भारत शेतीप्रधान देशांमध्ये जगात एक नंबर आहे, हे विसरून चालणार नाही.

**– डॉ. विवेक क्षीरसागर, सेवानिवृत्त व्यवस्थापकीय संचालक, कात्रज डेअरी, पुणे ❊❊❊❊**


कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

Payment Getway link

भारतात कुठेही निश्चित अंक मिळण्यासाठी मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४

फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290

E-mail : sampadak@vyaparimitra.com

# नागरी सहकारी बँकांसाठी विलीनीकरण अनिवार्य?

नुकतीच एक बातमी ऐकिवात आली. भारत सरकार सध्या ज्या १२ सरकारी बँका आहेत, त्यांचे अजून एक विलीनीकरण अमलात आणून देशात फक्त ३ सरकारी बँक्स अस्तित्वात ठेवण्याच्या विचारात आहे.



**रघुनंदन भागवत**
**७२०३९०२९८९**

जुलै १९६९ मध्ये देशातील प्रमुख १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यावर 'राष्ट्रीयीकृत बँक' हे एक नवीन वर्गीकरण भारतात तयार झाले. त्यापूर्वी सन १९५६ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया कायद्यानुसार पूर्वीच्या इम्पीरियल बँकेचे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये रूपांतर होऊन पहिली सरकारी बँक भारतात स्थापन झाली होती. स्टेट बँकेच्या इतर सहयोगी बँका स्टेट बँकेच्या उपकंपन्या (subsidiaries) होत्या. सन १९८० मध्ये देशातील अजून ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण होऊन राष्ट्रीयीकृत बँकांची संख्या २० झाली.

कालांतराने सन १९९१-९२च्या खुल्या आर्थिक धोरणामुळे 'नवीन खासगी बँक' हा नवीन प्रवर्ग तयार झाला. सरकारी बँकांना तीव्र स्पर्धा निर्माण झाली. स्पर्धेला तोंड देण्यासाठी सरकारी बँका आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याची गरज भासू लागली. त्यातूनच सरकारी बँकांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. प्रक्रियेचा परिपाक म्हणून सरकारी बँकांचे विलीनीकरण करण्याचा कालबद्ध कार्यक्रम राबवण्यात आला. त्यामुळे सरकारी बँकांची संख्या २० वरून सध्या १२ इतकी झाली आहे. स्टेट बँकेच्या सहयोगी बँका स्टेट बँकेत विलीन करण्यात आल्या.

आता १२ राष्ट्रीयीकृत बँकांचे आपापसात विलीनीकरण करून ती संख्या ३ वर आणण्याचा सरकारचा विचार दिसतो आहे. थोडक्यात सरकारला भारतीय बँका 'टू बिग टू फॉल' असाव्यात असे वाटत असावे.

एकीकडे सरकारी बँकांची संख्या मर्यादित ठेवण्याचे धोरण राबवत असताना, भारत सरकारने भारतातील सहकार क्षेत्रातील बँकांना मात्र हात लावला नाही. त्याचा परिणाम म्हणजे भारताच्या कानाकोपऱ्यात सहकारी बँकांचे जाळे निर्माण झाले. १९ ऑगस्ट २०२५ च्या रिझर्व बँकेच्या परिपत्रकानुसार भारतात आजघडीला १४५७ नागरी सहकारी बँका आहेत. ३४ राज्य सहकारी बँका आहेत तर ३५१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत आणि एक औद्योगिक सहकारी बँक आहे. गेल्या काही वर्षात नागरी सहकारी बँका बुडण्याच्या घटना वाढीस लागल्यावर रिझर्व बँकेला खडबडून जाग आली. या सहकारी बँका रिझर्व बँकेच्या नियंत्रणाखाली आणण्यासाठी पावले उचलली जाऊ लागली. तोपर्यंत सहकारी बँका त्या त्या राज्यातील सहकार खाते व रिझर्व बँक यांच्या संयुक्त नियंत्रणाखाली कार्यरत होत्या आणि अजूनही आहेत.

सहकारी बँका समाजातील विविध वर्गांच्या गरजा भागवत असल्याने आर्थिक क्षेत्रातील त्यांचे महत्त्व व योगदान नजरेआड करून चालणार नाही याची जाणीव नाबार्ड व रिझर्व बँकेला आहे. त्याच वेळी अनेक सहकारी बँका गैरकारभार अथवा थकित कर्जे वा आर्थिक बेशिस्तीमुळे बंद पडल्यामुळे सामान्य माणसाने पै पै करून साठवलेल्या पैशातून बँकेत ठेवलेल्या ठेवी बुडाल्या हे वास्तव नाकारण्यात अर्थ नाही. या वास्तवामुळेच रिझर्व बँकेला सर्व सहकारी बँकांना मध्यवर्ती बँकेच्या थेट नियंत्रणाखाली (supervision) आणण्याची निकड भासू लागली.

सहकारी बँकांचा पसारा प्रचंड असल्याने रिझर्व बँक सावधतेने पावले उचलत आहे. टप्प्याटप्प्याने सहकारी बँकांना आपल्या थेट नियंत्रणाखाली आणत आहे. जे नियम व्यापारी (commercial) बँकांना लागू आहेत तेच नियम सहकारी बँकांनाही जारी करण्याची प्रक्रिया वेगात चालू झाली आहे. सहकारी बँक वर्तुळात त्यामुळे बदलाचे वारे वाहू लागले आहेत.

हे बदल स्वीकारणे आणि आत्मसात करणे सहकारी बँकांना अवघड जाणार आहे. कारण असंख्य बँका या लहान आहेत. शाखांची संख्या जेमतेम दोन आकडी असणाऱ्या अनेक बँका आहेत, ज्यांचा धंदाही त्यामुळे मर्यादित आहे. अशा बँकांना नवीन बदलांना सामोरे जाताना अनेक मर्यादांचा/अडचणींचा सामना करावा लागत आहे/लागणार आहे. रिझर्व बँक सहकारी बँकांच्या अंगभूत मर्यादांचे भान न ठेवता 'सब घोडे बारा टक्के' स्वरूपाचे धोरण राबवत असल्याचे अनेक धुरीणांचे मत आहे. या ओझ्याखाली दबून जाऊन काही सहकारी बँका भविष्यात 'माना टाकण्याची' भीती वाटणे निरर्थक नाही. म्हणजेच 'रोगापेक्षा इलाज भयंकर' अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. मग या रोगाला इलाज काय? सद्य स्थितीत प्रादेशिक स्तरावरील छोट्या सहकारी बँकांचे आपापसात विलीनीकरण करून प्रदेश /राज्य पातळीवर एक सक्षम सहकारी युनिट/बँक अस्तित्वात आणणे हाच एक उपाय/इलाज सुचतो. तशीही सहकार क्षेत्रात विलीनीकरणाची प्रक्रिया चालू आहे, पण ती धोरणात्मक नाही, तर ऐच्छिक आहे. एखाद्या छोट्या सहकारी बँकेवर आरबीआयने निर्बंध घातले तर एखादी मोठी बँक पुढे येते आणि जर व्हाएबल वाटले तर विलीनीकरणाचा प्रस्ताव रिझर्व बँकेला सादर केला जातो. आरबीआयच्या मान्यतेनंतर विलीनीकरण अमलात येते.

दुसरा प्रकार म्हणजे दोन सहकारी बँका परस्पर संमतीने विलीन होतात.

आता गरज आहे ती धोरणात्मक विलीनीकरणाची. यात रिझर्व बँक महत्त्वाची भूमिका बजावेल. प्रत्येक राज्यातील सर्वात मोठी सहकारी बँक रिझर्व बँकेने ठरवावी आणि त्या राज्यातील इतर सहकारी बँकांना त्या बँकेत विलीन होण्याचे निर्देश द्यावेत. म्हणजे अत्यंत पद्धतशीर व ऑब्जेक्टिव्ह पद्धतीने विलीनीकरणाची प्रक्रिया देश पातळीवर सुरू करता येईल. वरील धोरण नागरी सहकारी बँकांसाठी अंमलात आणता येईल. जिल्हा मध्यवर्ती बँकांसाठी स्वतंत्र धोरण ठरवावे लागेल.

विलीनीकरणामुळे सहकारी बँकांना खालील फायदे मिळू शकतील.

**१) आर्थिक सुदृढता –** 'एकी हेच बळ' या उक्तीप्रमाणे नवीन अस्तित्वात आलेली बँक बळकट आर्थिक पायावर भक्कम उभी राहू शकेल. प्रत्येक राज्यात जी बँक त्यातल्या त्यात मोठी असेल (भांडवल, शाखा विस्तार, बॅलन्स शीट साईज इत्यादी निकषावर) त्या बँकेत राज्यातील इतर सर्व छोट्या सहकारी बँकांचे विलीनीकरण केल्यास आर्थिक निकषावर सक्षम अशी एक राज्यव्यापी सहकारी बँक अस्तित्वात येईल.

**२) धोका पचवण्याची क्षमता वाढेल –** भक्कम आर्थिक पायामुळे या बँकेची धोका पचवण्याची ताकद (शॉक ॲब्सॉर्बिंग कपॅसिटी) अधिक असेल.

**३) किफायतशीर परिचालन –** अनेक छोट्या बँकांनी एकाच गोष्टीवर स्वतंत्रपणे खर्च करण्यापेक्षा एका मोठ्या बँकेला त्याच गोष्टीवर केंद्रीय खर्च करणे अधिक किफायतशीर ठरते. (Scale of economy due to size)

**४) व्यावसायिक/कुशल मनुष्यबळाची उपलब्धता –** बँकांमधील अनेक कामे आता तंत्रज्ञान आधारित झाली आहेत. त्यामुळे कुशल/प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता भासते. असे मनुष्यबळ आपल्याकडे खेचण्यासाठी आकर्षक मोबदला/सुविधा देण्याची ऐपत छोट्या सहकारी बँकांकडे अभावानेच असते. मोठी बँक असे तंत्रज्ञ कर्मचारी/अधिकारी

**पुढील पानावर...**

## नागरी सहकारी बँकांसाठी विलीनीकरण अनिवार्य?

नेमण्याची /राखण्याची क्षमता बाळगून असते. खासगी बँकांतील वेठबिगारी सदृश कार्यपद्धतीला विटलेले तरुण, तंत्रस्नेही अधिकारी/कर्मचारी आनंदाने सहकार क्षेत्रात काम करायला तयार होतील.

**५) व्यावसायिक व्यवस्थापन** – छोट्या सहकारी बँका आर्थिक स्रोतांच्या अभावामुळे व्यावसायिक तज्ज्ञाच्या ज्ञानाचा फायदा घेऊ शकत नाहीत. तसेच बऱ्याच अशा बँका विविध व्यावसायिक चालवतात, ज्यांना बँकिंगचा गंध नसतो. आता रिझर्व बँकेने तज्ज्ञ व्यवस्थापन मंडळ प्रत्येक बँकेला अनिवार्य केले आहे. मोठी बँक अशा मंडळासाठी तज्ज्ञ लोकांना सहज निमंत्रित करू शकते कारण त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची क्षमता असते.



**६) रिझर्व्ह बँकेचे परिणामकारक नियंत्रण** – असंख्य छोट्या बँकांवर नियंत्रण ठेवणे रिझर्व्ह बँकेच्या आवाक्याबाहेर जाते. विलीनीकरणामुळे सहकारी बँकांची संख्या कमी होईल आणि रिझर्व बँकेला परिणामकरक नियंत्रण ठेवणे शक्य होईल.

**७) कर्मचाऱ्यांचा फायदा** – छोटी सहकारी बँक कर्मचाऱ्यांना इतर बँकांसारखे वेतन व इतर सुविधा देऊ शकत नाहीत. एक विलीनीकृत बँक कर्मचाऱ्यांसाठी आकर्षक वेतन प्रणाली राबवू शकते. तसेच कर्मचाऱ्यांना प्रश्न सोडवून घेण्यासाठी एकाच व्यवस्थापनाशी वाटाघाटी (negotiations) करणे सोयीस्कर ठरते.

**८) ग्राहक सेवेत सुधारणा** – विलीनीकृत बँक स्पर्धात्मक वातावरणात सर्वोत्तम तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकते त्यामुळे ग्राहक सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी आपोआप मदत होते.

**९) स्पर्धेला तोंड देणे** – छोट्या नागरी सहकारी बँकांना राष्ट्रीकृत बँका, खासगी बँका, नॉन बँकिंग फायनान्स कंपन्या यांना स्पर्धात्मक वातावरणात तोंड देणे कर्म कठीण जाते. एक मोठी सहकारी बँक निर्माण झाली तर ती बँकिंग क्षेत्रातील तीव्र स्पर्धेला समर्थपणे सामोरी जाऊ शकेल.

**१०) परावलंबित्त्व कमी होईल** – लहान नागरी सहकारी बँका क्लिअरिंग, आरटीजीएस, ड्राफ्ट्स वगैरे सुविधांसाठी दुसऱ्या बँकावर अवलंबून असतात, त्याचे चार्जेस भरावे लागतात. विलीनीकृत नवीन एन्टीटी मात्र या सुविधा स्वत:च्या बलावर देऊ शकेल.

**११) कायदेशीर बाबींची पूर्तता** – विलीनकृत बँक विविध कायदेशीर बाबींची पूर्तता परिणामकारक करू शकेल. उदा: पर्याप्त भांडवल पूर्ततेचा निकष, कॅश रिझर्व्ह रेशो, अनुत्पादक कर्जाची मर्यादा, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वाचे अनुपालन इत्यादी.

**१२) विन-विन परिस्थिती** – विलीनीकरणामुळे लहान बँकांना जसे फायदे होतात तसे मोठ्या बँकेलासुद्धा व्यवसायवृद्धीचा, शाखाविस्ताराचा, ग्राहकांची संख्या वाढण्याचा फायदा होतो.

**१३) ग्राहकांचा विश्वास** – सध्या अनेक छोट्या सहकारी बँका अवसायानात गेल्यामुळे ग्राहकांचा सहकारी बँकावरचा विश्वास डळमळीत झाला आहे. एखाद्या बँकेला रिझर्व बँकेने काही त्रुटीमुळे दंड ठोठावला तरी त्या बँकेचे अस्तित्व धोक्यात येते की काय अशी परिस्थिती निर्माण होते. विलीनीकरणामुळे, सहकारी बँकिंगवरील ग्राहकांचा विश्वास पुन्हा संपादित करण्यास मदत होईल, हा विलीनीकरणाचा सर्वात मोठा फायदा ठरेल.

**– रघुनंदन भागवत**
**निवृत्त महाव्यवस्थापक, आयडीबीआय बँक**
**मो. नं. – ७२०३९ ०२९८९**

*****

**सिंधुदुर्ग नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ**

नोंदणी क्र. टीएनए/युएलआर/आरएसआर/सीआर/३७५/सन १९८९-९०
ए-विंग वर्धमान नगर, शिवाजी नगर रोड, वडवली विभाग, अंबरनाथ (पूर्व)
मो. नं. – ९३२५५ ९१७८५

* ३६ वर्षांची यशस्वी वाटचाल
* सतत ऑडिट 'अ' वर्ग
* केंद्रीय कार्यालय सह अंबरनाथ, बदलापूर, उल्हासनगर, वांगणी, दिवा येथे शाखा

**सांपत्तिक स्थिती (३१.०३.२०२५) अखेर**

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भागभांडवल | ६.२५ कोटी | राखीव इतर निधी | १० कोटी |
| ठेवी | १३५ कोटी | स्वनिधी | १५ कोटी |
| कर्जे | ९५ कोटी | एकत्रित व्यवसाय | २३० कोटी |
| गुंतवणूक | ५९ कोटी | खेळते भांडवल | २१७ कोटी |
| लाभांश | ११% | एकत्रित नफा | १.८८ कोटी |

**२०० कोटी व्यवसायाची पूर्तता**
**२५० कोटींच्या व्यवसायाकडे वाटचाल**

* कोअर बँकींग सुविधेसह पतपेढीच्या सर्व शाखा संगणकीकृत खातेदारांना कोणत्याही शाखेत व्यवहार करण्याची सुविधा.
* एसएमएस बँकींग, आरटीजीएस, एनईएफटी सुविधा, चेक क्लिअरींग सुविधा उपलब्ध.
* सभासद / ग्राहकांसाठी लॉकर सुविधा विना भाडे तत्त्वावर उपलब्ध.

**पतपेढीचे अध्यक्ष - मा. श्री. जी. एम. पाटील व संचालक मंडळ यांचे तर्फे**
**सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!**

**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे**

स्थापना ४ सप्टेंबर १९१७
मुख्य कार्यालय – ४ ब, बी.जे.रोड, पुणे – ४११ ००१
फोन नं. : ०२० २६३०४१०० www.pdccbank.com

**१०७ वर्षांचा गौरवशाली इतिहास असणारी देशातील अग्रगण्य जिल्हा बँक**

**बँकेच्या विविध कर्ज योजना**
* शेतीपूरक कारणासाठी अ. मु. कर्ज
* वाहन कर्ज
* सोनेतारण कर्ज
* शेतीकर्ज – शासकीय अनुदानित कर्ज योजना – १०.५०%
* व्यावसायिक कॅश क्रेडिट
* ग्राहक उपयोगी वस्तू कर्ज
* औद्योगिक कर्ज
* गृह कर्ज

**बँकेच्या अत्याधुनिक सुविधा**
* एनी ब्रँच बँकींग
* आरटीजीएस
* एनईएफटी
* मोबाईल बँकींग
* यूपीआय सुविधा
* ई-कॉमर्स
* लॉकर सुविधा उपलब्ध

किफायतशीर व्याजदर * जलद कर्ज पुरवठा * सुलभ कर्ज प्रक्रिया

**बँकेची आर्थिक स्थिती ३१/०३/२०२५ अखेर**
* ठेवी – १४७६६.८४ कोटी
* कर्जे – १२०५९.०३ कोटी
* एकूण व्यवसाय –२६८२५.८७ कोटी

**आकर्षक व्याजदर**
दि. २३/०६/२०२५ पासून ठेवीवरील व्याजदरात वाढ २ वर्षांकरिता ७.००% (ज्येष्ठ नागरिकांना अधिक १% व्याजदर)

**विद्यमान संचालक मंडळ**
मा.प्रा.डॉ. दिगंबर गणपत दुर्गाडे – अध्यक्ष
मा. सुनील काशिनाथ चांदेरे – उपाध्यक्ष
मा. अनिरुद्ध यशवंत देसाई – मुख्य कार्यकारी अधिकारी

अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा.

# सहकारी बँकांसाठी सोने तारण कर्ज वितरण

## व्यवसायवाढ, आव्हाने व भविष्यकालीन दिशा

भारतीय संस्कृतीत सोने हे केवळ सौंदर्याचे किंवा सामाजिक प्रतिष्ठेचे प्रतीक नसून, आर्थिक सुरक्षिततेचा आधार मानले जाते. विशेषतः ग्रामीण भागात महिलांच्या हातात असलेले घरगुती सोनं हे संकटकाळात उपयोगी पडणारे मौल्यवान साधन आहे. या पार्श्वभूमीवर, सोने तारण कर्ज हे सहकारी बँकांसाठी व्यवसायवाढीचे एक प्रभावी व विश्वासार्ह माध्यम ठरू शकते.

केपीएमजीच्या अहवालानुसार, भारताचा जागतिक सोन्याच्या मागणीत वाटा सुमारे २३ टक्के आहे. त्यातील बहुतांश मागणी ग्रामीण भागातून येते. २०१५ मध्ये सुवर्ण कर्ज बाजार १७७४ अब्ज होता, जो २०२२ मध्ये ४६१७ अब्जपर्यंत पोहोचला – याचा वार्षिक वाढ दर (CAGR) सुमारे १३.४ टक्के आहे. ही वाढ महाराष्ट्रातील सहकारी बँकांसाठी सुवर्णसंधी ठरते.





**श्रीकांत जाधव**
९८९०५९७०९५

● **सुवर्ण कर्ज क्षेत्रातील सध्याची स्थिती** – भारतातील सुवर्ण कर्ज वितरणाचे क्षेत्र दोन भागांत विभागले गेले आहे:

✻ **संगठित क्षेत्र ३५ टक्के** – बँका, लघु वित्त संस्था, निधी कंपन्या

✻ **असंगठित क्षेत्र ६५ टक्के** – सावकार, पांढरपेशा

एनबीएफसी हे संगठित क्षेत्रात आघाडीवर असून त्यांची प्रक्रिया जलद, ग्राहक सेवा उत्कृष्ट आणि मूल्यांकन अचूक असते. बँका मुख्यतः Priority Sector Lending (PSL) चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सोने तारण कर्ज वापरतात. सहकारी बँकांनी या दोन्ही क्षेत्रांमधील अंतर भरून काढण्यासाठी धोरणात्मक पावले उचलणे आवश्यक आहे.

● **उद्योगाचा प्रवास – एक दृष्टिक्षेप –**

२००८ – २०१२: सोन्याच्या दरवाढीमुळे सुवर्ण कर्ज क्षेत्रात झपाट्याने वाढ

२०१२– २०१३: RBI ने Loan-to-Value (LTV) मर्यादा घालून झडङ दर्जा काढून टाकला.

२०१३– २०१४: सोन्याच्या दरात घसरण, एनपीए वाढ

२०१४ च्या पुढे: डिजिटल स्वीकारामुळे पुनरुज्जीवन

२०१६ – २०१९ नोटाबंदी व एनबीएफसी संकटामुळे डिजिटल मॉडेल्सचा उदय

● **सहकारी बँकांसमोरील प्रमुख आव्हाने** – सोन्याच्या दरातील चढ-उतारामुळे LTV व NPA वर परिणाम

NBFCs मध्ये तरलता संकट, उच्च निधी उभारणी खर्च

✻ फिनटेक्स, मायक्रोफायनान्स व अनिर्धारित कर्ज उत्पादने यांची वाढती स्पर्धा

✻ शाखा पातळीवरील सुरक्षा, कर्मचारी व्यवस्थापन व इन्फ्रास्ट्रक्चर खर्च

✻ २०,००० रोख मर्यादा, TDS, प्रस्तावित सोन्याच्या मर्यादा यांसारखी धोरणात्मक बंधने

✻ खोट्या सोन्याचा धोका – शुद्धता चाचणीसाठी तंत्रज्ञान आवश्यक

✻ शाखांमध्ये चोरी, दरोडे – विमा व सुरक्षा खर्च वाढ

● **भविष्यातील दिशा – सहकारी बँकांसाठी संधी**

**१ डिजिटल सुवर्ण कर्ज मॉडेल** – ऑनलाईन अर्ज, डोअरस्टेप सेवा आणि फिजिटल (फिजिकल + डिजिटल) अनुभव देणारे मॉडेल स्वीकारल्यास प्रक्रिया सुलभ व पारदर्शक होईल. फिनटेक भागीदारीद्वारे कार्यक्षमता वाढवता येईल.

२. **भौगोलिक विस्तार** – ग्रामीण भागात बँका, पतसंस्था विस्तार नसलेला प्रदेश, सधन, गरजू शेतकरी, शैक्षणिक, विदेशी प्रवास खर्च, वैयक्तिक गरजा इत्यादी बाबतीत सुवर्ण कर्जासाठी 'संभाव्य' क्षेत्र मानले जातात. महाराष्ट्रात कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि आदिवासी भागात सेवा पोहोचवण्याचे नियोजन केल्यास सामाजिक प्रभाव आणि व्यवसाय दोन्ही वाढतील.

३. **उत्पादन विविधीकरण** – मायक्रोफायनान्स, गृहकर्ज, एसएमइ वाहन कर्ज यासारख्या विविध उत्पादने सुरू करून सोन्यावर अवलंबित्व कमी करता येईल.

४. **सहकार्य व नेटवर्किंग** – निधी कंपन्या व लघु वित्त संस्थांशी भागीदारी, तसेच डिजिटल डीएसए नेटवर्कद्वारे पोहोच वाढवणे हे उपयुक्त ठरेल.

● **धोरणात्मक शिफारसी** – सोन्याच्या शुद्धतेसाठी XRF मशीन, अख आधारित मूल्यांकन, कर्ज वितरण संपूर्ण सोने तारण कर्ज वितरण *TM मशीन प्रणालीचा वापर

✻ ग्राहक सेवा, डिजिटल प्रक्रिया व सुरक्षा प्रोटोकॉलसाठी कर्मचारी प्रशिक्षण

✻ CCTV, विमा संरक्षण, डिजिटल लॉकर सुविधा

✻ महिलांसाठी विशेष योजना, सण-उत्सव काळात सवलती, स्थानिक भाषेत प्रचार

सोने तारण कर्ज हे केवळ आर्थिक व्यवहार नाही, तर सदस्यांच्या गरजांना वेळेवर उत्तर देणारे, त्यांच्या संकटकाळात साथ देणारे आणि बँकेच्या विश्वासार्हतेला बळकटी देणारे माध्यम आहे. सहकारी बँकांनी पारंपरिक मूल्ये जपत, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत, सुवर्ण कर्ज वितरणाच्या माध्यमातून व्यवसाय वाढीचा नवा अध्याय लिहावा.

ही दिशा केवळ आर्थिक प्रगतीची नसून, सामाजिक समावेश, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण भागातील आर्थिक स्थैर्य निर्माण करणारी आहे. महाराष्ट्रातील सहकारी बँकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेतला, तर 'विकसित भारत' २०४७ च्या दिशेने ठोस पाऊल टाकले जाईल.

**– श्रीकांत जाधव**
**सरव्यवस्थापक महेश सहकारी बँक**

*****

# जागर बँकिंग साक्षरतेचा...

बँकिंग हा आपला जीवनाचा अविभाज्य भाग बनला असून, कोणताही व्यवहार हा बँकेच्या मदतीशिवाय होत नाही. आता केवळ आर्थिक नव्हे तर बँकिंग साक्षरता अनिवार्य आहे.

साक्षरता म्हणजे प्रभावीपणे संवाद साधण्यासाठी आणि जगाला समजून घेण्यासाठी वाचण्याची, लिहिण्याची, बोलण्याची आणि ऐकण्याची क्षमता. या पारंपारिक व्याख्यांव्यतिरिक्त, आता डिजिटल साक्षरता, आर्थिक साक्षरता आणि माहिती साक्षरता अशा अनेक प्रकारच्या साक्षरता बरोबरच बँकिंग साक्षरतेच देखील समावेश होतो.

आज समाजात बँकिंग साक्षरता रुजवण्याची खरच आवश्यकता आहे. आर्थिक साक्षरता आणि डिजिटल साक्षरता म्हणजे परिपूर्ण बँकिंग साक्षरता नाही. आजच्या 'क्लिक तंत्र' युगात बोटाच्या एका तालावर ज्ञानाचा महासागर उपलब्ध होत असताना तसेच आम्ही उच्च दर्जाचे शिक्षित आणि व्यवहार ज्ञानी असताना आज समाजात. रोज कोठेना कोठेतरी बँकिंग आर्थिक व्यवहारातून फसवणूकीच्या बातम्या येत आहेत.



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

बँकिंग साक्षरता म्हणजे बँकिंग उत्पादने, सेवा आणि प्रक्रिया यांची माहिती घेऊन स्वतःच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य निर्णय घेणे होय. पूर्वीचे बँकिंग पारंपारिक आणि मर्यादित स्वरूपाचे होते. बँकिंग सेवा या बँकेच्या शाखा इमारतीमध्येच म्हणजेच चार भिंतीच्या आत आणि बँकेच्या व्यवसायाच्या वेळेतच त्याच्या समक्ष उपस्थितीत दिल्या जात होत्या.

सन १९९० नंतर खऱ्या अर्थाने डिजिटल बँकिंगकडे वाटचाल सुरुवात झाली. बँकेत समक्ष न जाताच ऑनलाइन बँकिंग सुरु झाले. कोरोनामध्ये ही बाब अनिवार्य झाल्याने आता सवयीने ती अपरिहार्य झाली आहे. सद्यस्थितीत पारंपरिक भौतिक बँकिंग संपुष्टात येत असून ऑन लाईन बँकिंगचे युग सुरु झाले आहे.

आर्थिक व डिजिटल साक्षरता आणि बँकिंग साक्षरता या बाबी एकमेकावर जरी अवलंबून असल्या तरी आर्थिक व डिजिटल साक्षरतेमुळे बँकिंग साक्षरता येतेच असे नाही. पूर्वी 'अक्षर ओळख' किंवा डिजिटल व्यवहार माहिती नसल्याने फसवणूक होत होती. मात्र आता या दोन्ही गोष्टी माहिती असूनही बँकिंग व्यवहारात अनेकांची फसवणूक होत आहे. अनेक ठिकाणी जी गोष्ट व्यावहारिक दृष्टीने परवडणारी नाही असे असताना देखील एका मोहाच्या क्षणी अनेक माणसे फसत आहेत. हाच मोहाचा क्षण टाळण्यासाठी बँकिंग साक्षरता आवश्यक आहे.

सर्वसामान्य व्यक्तीला बँकेचे नियम व संकल्पना माहिती नसतात. केवळ पैसे ठेवणे आणि पैसे काढणे एवढाच व्यवहार माहिती असतो. परंतु इतर अनेक तांत्रिक बाबींची माहिती नसल्याने खुपदा फसवणूक होते. उदा. के.वाय.सी.अपडेशन बाबतीत असणारी प्रक्रिया व नियम माहित नसल्याने आजपर्यंत अनेकांची फसवणूक झाली आहे. मुदत ठेव गुंतवणूक आणि कर्ज व्याजदर तसेच बँकेची आर्थिक स्थिती नीटशी न समजल्यामुळे देखील फसवणूक होते. ठेवीदारांचे संरक्षण व कर्जदाराची फसवणूक टाळणे यासाठी रिझर्व बँकेने अनेक पावले उचलली आहेत.

कोणत्याही बँकेने नेमकी कोणती, किती व कशामध्ये जोखीम घेतली असून त्या जोखमेची तीव्रता किती आहे, याबद्दलची किमान माहिती सामान्य गुंतवणूकदारांना व्हावी या उद्देशाने दि. ३०.०८.२०२१ रोजी रिझर्व बँकेने सर्वच बँकांना त्यांच्या वार्षिक अहवालामध्ये कोणकोणत्या गोष्टी प्रकट व प्रसिद्ध करणे अत्यंत आवश्यक आहे, याचा विस्तृत तपशील दिलेला आहे. ही बाब निश्चितच गुंतवणूकदारांना कोणतीही गुंतवणूक करण्यापूर्वी सावध करणारी आहे. एवढेच नव्हे तर गुंतवणूक केल्यानंतर देखील आपल्या गुंतवणुकीची जोखीम पाहण्यासाठी प्रतिवर्षी प्रकट व प्रसिद्ध होणारी माहिती उपयुक्त ठरते.

कर्जाच्या बाबतीत देखील रिझर्व्ह बँकेने कोणतेही कर्ज घेण्यापूर्वी प्रत्येक बँकेने कर्ज मागणी करणाऱ्या व्यक्तीला 'केएफ' स्टेटमेंट, म्हणजेच 'की फॅक्ट स्टेटमेंट' देणे अनिवार्य केले आहे. यामुळे कर्ज घेणाऱ्या व्यक्तीला सुरवातीलाच कर्जाच्या सर्व महत्त्वाच्या अटी आणि शर्ती म्हणजेच कर्जाची रक्कम, व्याजदर, शुल्क आणि परतफेडीचे वेळापत्रक याची सारांश रूपात व सोप्या भाषेत माहिती झाल्याने कर्जदारांना कर्ज घेण्यापूर्वी निर्णय घेता येतो. आज अनेक ठेवीदार किंवा कर्जदार यांना या गोष्टींची माहिती नाही. बँकांनी याची व्यापक प्रसिद्धी करावी असेही रिझर्व बँकेचे बंधन असले तरी तसे बँकांकडून व्यापक प्रयत्न होताना दिसत नाहीत. तसेच बँक खातेदारदेखील या बाबतीत जागरूक नाहीत.

पूर्वी कर्जासाठी दाही दिशा प्रयत्न करावे लागत होते. आता कर्ज मिळणे हे खूप सुलभ झाले असून घरबसल्या डिजिटल लँडिंग म्हणजे तंत्रज्ञानाचा (जसे की इंटरनेट आणि मोबाईल ॲप्स) वापर करून कर्ज घेता येते. या प्रक्रियेत कमीत कमी प्रत्यक्ष संपर्क व संवादासह मोठ्या प्रमाणावर डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केला जातो, जेणेकरून कर्जाची प्रक्रिया सुलभ आणि जलद होते. डिजिटल लेंडिंगसाठी प्ले स्टोअरवरून डिजिटल कर्ज देणाऱ्या कंपनीचे किंवा बँकेचे ॲप डाऊनलोड करावे लागते. ॲपद्वारे तुम्ही कर्जासाठी अर्ज करू शकता. यात वैयक्तिक माहिती, पत्ता, जन्मतारीख, व्यवसाय, उत्पन्न, आणि इतर आवश्यक माहिती भरावी लागते.

केवायसी पडताळणीसाठी पॅन, आधार कार्ड आणि इतर अनुषंगिक कागदपत्रे अपलोड करावी लागतात. सर्व कागदपत्रांची पडताळल्यानंतर कर्जाची ऑफर मिळते. कर्जाची ऑफर स्वीकृती नंतर डिजिटल पद्धतीने तुमचे कर्ज मंजूर होते आणि रक्कम तुमच्या खात्यात जमा केली जाते. डिजिटल लँडिंगमुळे वेळेची बचत होत असली तरी यामध्ये कर्ज देणारी कंपनी किंवा संस्था भारतीय रिझर्व्ह बँकेने नियंत्रित केलेली नसेल तर फसवणुकीची शक्यता असते. एवढेच नव्हे तर प्रत्यक्षात बँकेत जाऊन देखील कर्जाच्या वेळी अनेक कागदपत्रांवर निरक्षरासारखे न वाचताच सह्या केल्यानेदेखील आपली फसवणूक होऊ शकते.

आज परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. मनुष्य तंत्रज्ञानाच्या आहारी गेला आहे. समाजामध्ये सर्वच स्तरावर डिजिटल स्वीकृती वाढत असून, तरूणाईचे डिजिटल बँकिंग सेवा स्वीकृतीमध्ये प्रमाण जास्त आहे. वृद्ध आणि डिजिटल साक्षरता नसलेल्या अशा ग्राहक वर्गांसाठी मात्र डिजिटल सेवांच्या समावेशकतेबद्दल अडचणी असून आज याच लोकांचे फसण्याचे प्रमाण अधिक आहे. यापुढे तंत्रज्ञानावर आधारित बँकिंग ही ग्राहकांची नव्हे तर बँकांचीदेखील अपरिहार्यता राहणार आहे. रिझर्व्ह बँकदेखील ग्राहक जागृतीसाठी अनेक माधमातून प्रयत्न करीत आहे. रिझर्व्ह बँक तसेच विविध बँकांच्या अशा प्रयत्नाला ग्राहकांनी देखील सकारात्मक प्रतिसाद देणे गरजेचे आहे.

ठेव विमा योजनेमध्ये बँक आर्थिक अडचणीत आली तरच सध्या

पुढील पानावर...

मागील पानावरून...

रुपये पाच लाख विमा संरक्षण आहे. मात्र आपल्या चुकीने बँकेतील पैसे गेले तर त्याला कोणतेच विमा कवच नाही ही जाणीव ग्राहकांनी सतत मनामध्ये ठेवूनच डिजिटल व्यवहार केले पाहिजेत.

आज आपण डिजिटल युगात आहोत. एक आभासी दुनियेत आपण व्यवहार करतो. अशा वेळी जास्त आर्थिक जागरूकता आणि साक्षरता आवश्यक आहे. 'एटीएम'मधून पैसे काढणे, डेबिट/ क्रेडिट कार्ड व्यवहार, गूगल पेसारखे व्यवहार वा अन्य बाबींबाबत खूपच सतर्कता आवश्यक आहे. अशा व्यवहारांना देशाच्या सीमारेषांचे बंधन नाही. गावातील माणसाने फसवले तर त्याला समोर जाऊन जाब विचारता येत असे. इथे कोणाला जाब विचारणार? सर्वच अदृश्य स्वरूपात आहे. या गोष्टीचे शिक्षण व माहिती घेण्याची ग्राहकांनी देखील आता मानसिकता विकसित करणे आवश्यक आहे. यामध्ये बँकांनीदेखील या सेवा उपलब्ध करून देताना त्याचा वापर कसा करायचा याचे कागदोपत्री किंवा जाहिरातीमधून प्रशिक्षण देण्याबरोबर प्रात्यक्षिक स्वरूपात देखील माहिती व प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

भारतातील डिजिटल फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असून, सन २०२४ मध्ये ३६ लाख नोंदवलेल्या प्रकरणांमध्ये अंदाजे २२,८४५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची आकडेवारी आहे. इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटर हे सिटिझन फायनान्शियल सायबर फ्रॉड रिपोर्टिंग अँड मॅनेजमेंट सिस्टम (CFCFRMS) सारख्या उपक्रमांद्वारे सक्रियपणे यावर उपाय करत असले तरी आपण देखील तेवढीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. यामध्ये आपल्याकडूनच आपली संवेदनशील माहिती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे घेऊन आपणास फसवले जाते. फसवणूक करणारे बनावट कायदेशीर अडचणी टाळण्यासाठी भीती निर्माण करण्यासाठी आणि पीडितांना आपल्या बँक खात्यातून पैसे हस्तांतरित करण्यास भाग पाडतात. एखादी लिंक ओपन करायला लावून किंवा ओ.टी.पी. घेऊन आपल्या बँक खात्यांमध्ये प्रवेश मिळवून आपले पैसे चोरतात. यासाठी आपणच सावध आणि सतर्क राहून अनोळखी नंबरवरून येणारे कॉल किंवा मेसेज, विशेषतः एखादी बनावट लिंक ओ.टी.पी. किंवा वेबसाईटपासून सावध राहणे आपल्या हातात आहे. आपल्याकडे बँकेचा संपर्क क्रमांक असल्यास बँकेशी आपणच तातडीने संपर्क साधून किंवा बँक जवळ असल्यास प्रत्यक्ष बँकेत जाऊन याची खातरजमा करणे आवश्यक असते.

आज डिजिटल पेमेंटसाठी अनेक साधने असून रोज नवनवीन साधने येत आहेत. चेक / डिमांड ड्राफ्ट आता कालबाह्य होत असून आता मोबाईल/ नेट बँकिंग, यू.पी.आय.सारखी साधने व्यवहारात रुळली आहेत. प्रत्येक साधन वापरताना त्याची सुरक्षा कशात आहे याची माहिती बँकेकडून प्रत्येक ग्राहकाने करून घेणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. उदा. काही वेळेला ऑनलाईन खरेदीसाठी वेबसाइटचा वापर करावा लागतो. अशा वेळी मुळातच आपण व्यवहार करताना वापरत असणारी वेब साईट सुरक्षित आहे की नाही हे पाहणे आवश्यक आहे. वेबसाइटचे युनिव्हर्सल रिसोर्स लोकेशन (यु.आर.एल.) तपासल्यानंतर जर http ऐवजी https ने सुरू होत असेल तर ते सुरक्षित वेबसाइटचे एक लक्षण आहे. https मधील s चा अर्थ ही साइट सुरक्षित सॉकेट लेयर (SSL) प्रमाणपत्राद्वारे संरक्षित आहे असे समजावे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या ब्राउझरमधील अॅड्रेस बॉक्सजवळ लॉक किंवा कुलुपाचे चिन्ह हे देखील सुरक्षित वेबसाइटचे अजून एक लक्षण आहे. या दोन्ही बाबींची खात्री केल्यानंतरच त्या वेबसाईट वरून व्यवहार करणे किंवा माहिती घेणे सुरक्षित होईल. अन्यथा नुसत्या http:// ने सुरू होणाऱ्या व कुलूप किंवा लॉकचे चिन्ह नसणाऱ्या कोणत्याही वेबसाइटवर व्यवहार केला तर आपली नक्कीच फसवणूक होईल. अशा बारीक सारीक बाबींची माहिती बँकेने आपल्या ग्राहकांना देणे व ग्राहकांनी देखील ती समजून घेणे ही काळाची गरज आहे.

सन २०२३-२४ अखेर सात आणि त्यावरील वयाच्या लोकांसाठी भारताचा साक्षरता दर ८०.९% होता. सन २०२३-२४ च्या वार्षिक अहवालानुसार, भारतातील प्रौढांसाठी एकूण आर्थिक साक्षरता दर सुमारे २७% आहे, असे एनसीएफईने (नॅशनल सेंटर फॉर फायनान्शियल एज्युकेशन (NCFE)) म्हटले आहे, तर राष्ट्रीय आर्थिक शिक्षण धोरणाने सन २०२०-२५ च्या अहवालात ३५% आर्थिक साक्षरता दर नमूद केला होता. यामध्ये बँकिंग साक्षरतेचे प्रमाण कोठेच नमूद नाही. आर्थिक साक्षरता आणि बँकिंग साक्षरता या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत.

'जागर' हा संस्कृत भाषेतील 'जग' या शब्दापासून आला आहे, ज्याचा अर्थ 'जागणे' असा आहे. जागर म्हणजे एखाद्याला सुप्त अवस्थेतून जागे करणे असा होतो. आज एकूणच बँकिंग क्षेत्रातील वाढती जोखीम आणि फसवणूक टाळण्यासाठी बँकेने त्यांच्या ग्राहकांना सुप्त अवस्थेतून जागे करून बँकिंग साक्षरता समजून देण्याची वेळ आली आहे. आपल्या पैशांची सुरक्षितता आपणच करण्यासाठी प्रत्येकानेच केवळ आर्थिक नव्हे तर बँकिंग साक्षर होऊन सतत अद्ययावत राहण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे देखील आवश्यक आहे. आजच्या आर्थिक जगात बँकिंग साक्षरतेला पर्याय नसून आपल्या पैशाची सुरक्षितता करण्यासाठी बँक आणि ग्राहक या दोघांनीही केवळ आर्थिक नव्हे तर बँकिंग साक्षरतेचा जागर करण्याची वेळ आली आहे.

**- गणेश रामचंद्र निमकर, पुणे.**
**बँकिंग सल्लागार मोबाईल - ९८२२५ ६८५५०**
**बी. कॉम, जी. डीसीडए, सी.ए.आय.आय.बी.**
**ई मेल** -nimkarganeshgmail.com ****

# टीजेएसबी बँकेला महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशनचा पुरस्कार प्रदान




**ठाणे** - येथील टीजेएसबी बँकेला महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशनच्या वतीने द्वितीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले आहे. पांच हजार कोटीपेक्षा अधिक ठेवी श्रेणीसाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बँक उपाध्यक्ष वैभव सिंघवी व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल आरेकर, सरव्यवस्थापक विनायक गोरे यांनी पुरस्कार स्वीकारला. सहकार क्षेत्र राष्ट्रीय संघटना अध्यक्ष ज्योतिंद्रभाई मेहता, राज्य सहकारी संघ अध्यक्ष प्रवीण दरेकर, अजय ब्रम्हेचा, उपाध्यक्ष वैशाली आवाडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# नागरी सहकारी बँकांसमोर अर्थव्यवस्थेची तीव्र स्पर्धा

देशातील बँकिंग व्यवसायामध्ये नागरी सहकारी बँकांचे स्थान त्यांच्या तळगाळातील लहान खातेदारांमुळे अग्रस्थानी आहे. या बँकांना दीडशे वर्षांपेक्षा अधिक काळाचा उत्तम इतिहास आहे. बँकिंग व्यवसायातील सर्व प्रकारची स्थित्यंतरे बँकांनी अनुभवली आहेत. देशातील बँकिंग व्यवस्थेमध्ये सध्याच्या काळात असलेली तीव्र स्पर्धा गृहीत धरूनही या बँका प्रगतीपथावर आहेत. ही बाब रिझर्व बँक ऑफ इंडियाने देखील जाहीरपणे मान्य केली आहे.



**डॉ. अभय मंडलिक**
९४०३० ८०७२५

देशातील बँकिंग व्यवसायामध्ये एकाच वेळी अनेक प्रकारच्या बँका कार्यरत आहेत. बँकांच्या मालकी प्रकाराप्रमाणे, तसेच विशेषीकृत बँका, सेवेच्या दृष्टीने वेगवेगळ्या बँका देशाच्या बँकिंग पटलावर कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त बँकेतर वित्त कंपन्या, फिनोटेक कंपन्या, निधी कंपन्या, खासगी सावकार आणि पतसंस्था या सर्वांसोबत नागरी सहकारी बँकांना स्पर्धा करून व्यवसाय मिळावावा लागतो. या विविध क्षेत्रांकडून नागरी सहकारी बँकांना असलेल्या स्पर्धेबद्दल आढावा घेण्याचा प्रयत्न आहे.

❊ **नागरी सहकारी बँकांचे स्पर्धक –** १) स्टेट बँक ऑफ इंडिया २) राष्ट्रीयीकृत बँका ३) खाजगी बँका ४) परदेशी बँका ५) प्रादेशिक ग्रामीण बँका (RRB) ६) पेमेंट बँका ७) स्मॉल फायनान्स बँका ८) मोठ्या नागरी सहकारी बँका ९) बँकेतर वित्त कंपन्या (NBFCs) १०) फिनोटेक कंपन्या (Fino Tech Cos) ११) निधी कंपन्या १२) खासगी सावकार आणि १३) पतसंस्था.

सरकारी मालकीच्या बँकांपैकी स्टेट बँक ऑफ इंडियाचा शाखा विस्तार देशभरात सर्वत्र आहे. ग्रामीण, निमशहरी भागातही बँकेच्या शाखा आहेत. या बँकेच्या शाखाधिकाऱ्यांना कर्ज मंजुरीचे व्यापक अधिकार असतात. त्यामुळे खातेदारांना लवकर कर्ज मिळण्याची सोय मिळते. शासकीय कर्ज योजनांची अंमलबजावणी करणे, या बँकांना बंधनकारक असते.

देशात एकेकाळी २० राष्ट्रीयीकृत बँका होत्या. वित्त मंत्रालयाच्या धोरणानुसार या बँकांतून विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आणि आता ही संख्या ११ झाली आहे. विलीनीकरणाच्या दरम्यान या बँकांनी शाखा बंद करण्याचे टाळलेले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात या बँकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात आहे. या बँकांच्या शाखाधिकाऱ्यांना कर्ज मंजुरीचे व्यापक अधिकार असतात. अग्रक्रम क्षेत्र, दुर्बल घटकांना कर्ज देणे या बँकांना बंधनकारक असल्यामुळे नागरी सहकारी बँकांना या बँकांची स्पर्धा जाणवते. देशभरात खासगी बँकांचा शाखा विस्तार मोठ्या प्रमाणावर आहे. यात १९९० पूर्वीच्या जुन्या खासगी बँका आणि १९९० नंतरच्या नव्याने अस्तित्वात आलेल्या खासगी बँका यांचा समावेश आहे. बहुतांशी खासगी बँकांनी आता ग्रामीण भागावर आपले लक्ष केंद्रित केलेले असल्यामुळे ग्रामीण आणि निमशहरी भागात हळुहळू त्यांचा शाखा विस्तार वाढत आहे. आक्रमक पद्धतीने व्यवसाय करणे, हे या बँकांचे वैशिष्ट्य आहे. घरपोच सेवा, परवडणारा व्याज दर हे यांचे वैशिष्ट्य आहे. या बँकांच्या कार्यपद्धतीमध्ये व्यवसाय विस्तारासाठी अन्य बँकांची चांगली खाती स्वतःकडे घेणे हे अंतर्भूत आहे.




नागरी सहकारी बँकांच्या चांगल्या खातेदारांवर या बँकांचे बारकाईने लक्ष असते. कर्जाचा व्याजदर, वाढीव कर्ज मर्यादा, अन्य सवलती अशी प्रलोभने खातेदारांना दाखवून अन्य बँकांचा व्यवसाय स्वतःकडे घेणे, या बँकांची सर्वसामान्य कार्यपद्धती आहे. या बँकांची नागरी सहकारी बँकांना सर्वात जास्त स्पर्धा आहे. प्रादेशिक ग्रामीण बँका, ग्रामीण भागातील खातेदारांच्या सोयीसाठी अस्तित्वात आल्या. राष्ट्रीयीकृत बँकांच्या स्पॉन्सरशिपखाली या बँकांनी मोठ्या प्रमाणावर व्यवसाय विस्तार केला. एकेकाळी ८० पेक्षा अधिक प्रादेशिक ग्रामीण बँक देशभरात कार्यरत होत्या. अलीकडच्या नव्या धोरणाप्रमाणे प्रत्येक राज्याला एक याप्रमाणे या बँकांचे परस्परात विलीनीकरण करण्यात आले असून सध्या या बँकांची संख्या २८ इतकी झाली आहे. या बँका ग्रामीण आणि निमशहरी भागामध्ये नागरी सहकारी बँकांच्या स्पर्धक आहेत. स्मॉल फायनान्स बँका या बँकिंग व्यवसायातील तुलनेने नव्या बँका आहेत. त्यांचा जन्म लहान कर्जदारांची गरज भागवण्यासाठीच झालेला आहे. रिझर्व बँक या बँकांकडे सकारात्मक पद्धतीने बघत असून यांना प्रोत्साहन देण्याचे रिझर्व बँकेचे धोरण आहे. या बँकांना एकूण कर्जापैकी ७५ टक्के कर्ज अग्रक्रम क्षेत्राला देणे बंधनकारक आहे आणि ५० टक्के कर्ज २५ लाख रुपयांच्या आतील देणेही बंधनकारक आहे. या बँकांच्या कार्यपद्धतीमुळे बँका नागरी सहकारी बँकांच्या सर्वात मोठ्या स्पर्धक आहेत. बँकांच्या शाखाधिकाऱ्यांना कर्ज मंजुरीचे व्यापक अधिकार असतात.

ज्या बँकांची मुख्यालये परदेशात आहेत आणि रिझर्व बँकेने ज्यांना भारतात व्यवसाय करण्याची परवानगी दिली आहे अशा बँकांना परदेशी बँका असे म्हटले जाते. परदेशी बँका यांचे अस्तित्व एकेकाळी राज्यांच्या राजधान्या किंवा मेट्रोपॉलिटीन शहरात पुरते मर्यादित होते. व्यवसाय वाढीच्या दृष्टीने या बँकाही बी आणि सी प्रकारच्या शहरांमध्ये शाखा विस्तार करीत आहेत. या बँकांचा कर्मचारी वर्ग भारतीय असल्यामुळे आक्रमक मार्केटिंग करून व्यवसाय वृद्धीचा त्यांचा प्रयत्न असतो बी आणि सी गटातील शहरांमध्ये तसेच मेट्रोपॉलिटन शहरांमध्ये या बँका नागरी सहकारी बँकांच्या स्पर्धक आहेत.

मोठ्या नागरी सहकारी बँका यांचा व्यवसाय सर्वसाधारणपणे दहा हजार कोटींच्या पुढे आहे. या बँका लहान नागरी सहकारी बँकांशी स्पर्धा करतात असा अनुभव आहे. बँकेतर वित्त कंपन्या यांनी स्वतःची बाजारपेठ तयार केलेली असून दुचाकी, तीन चाकी वाहने, लहान मालवाहतुकीचे ट्रक्स, कार, मोठे ट्रक्स, जेसीबी या सोबतच फ्रिज, टीव्ही, एअर कंडिशनर या ग्राहक उपयोगी असलेल्या वस्तूंसाठी सुलभ अटींवर या संस्था कर्ज देतात. या संस्थांचे प्रतिनिधी डीलर्सच्या शोरूम मध्येच बसतात.त्यांना कर्ज मंजुरीचे व्यापक अधिकार असतात. नागरी सहकारी बँकांना या संस्थांची मोठी स्पर्धा आहे. एकेकाळी नागरी सहकारी बँका दुचाकी, तीन चाकी वाहने किंवा ग्राहक उपयोगी वस्तूंसाठी सुलभपणे कर्ज देत असत. या संस्थांनी आक्रमक मार्केटिंग करून ही बाजारपेठ हळुहळू स्वतःकडे ओढून घेतली आहे. फिनोटेक कंपन्या हे आर्थिक क्षेत्रातील नवे दालन असून बँकिंग सेवेपैकी काही सेवा या

**पुढील पानावर...**

# चिपळूण अर्बन बँकेला महाराष्ट्रातील 'सर्वोत्कृष्ट बँक' पुरस्कार प्रदान



**चिपळूण** – दि. चिपळूण अर्बन को-ऑप. बँकेस महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशनतर्फे सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता ३०० कोटी ते ५०० कोटी ठेवी असलेल्या बँका गटात चिपळूण बँकेला प्रथम क्रमांकाचा मानाचा पुरस्कार जाहीर झाला होता.

नाशिक येथे 'पुरस्कार प्रदानफ कार्यक्रमात राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष प्रविण दरेकर व फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष मोहन शेठ मिरगल, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष सतीश खेडेकर, तज्ज्ञ संचालक दिलीप दळी, संचालक प्रशांत शिरगांवकर, समीर जानवलकर, मिलिंद कापडी, रत्नदीप देवळेकर, समीर टाकळे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तुषार सूर्यवंशी उपस्थित होते. बँकेस मिळालेला हा पुरस्कार रत्नागिरी जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली असून बँकेच्या कार्यक्षमतेला राज्यस्तरीय मान्यता मिळाल्याचा गौरव स्थानिक स्तरावर व्यक्त केला जात आहे.

## लाला अर्बन बँकेच्या वतीने सदस्यांना १० टक्के लाभांश

**नारायणगाव, पुणे** – येथील लाला अर्बन बँकेच्या वतीने सदस्यांना १० टक्के लाभांश देण्याचा निर्णय बँकेच्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. बँकेचे संस्थापक स्व. किसनराव बाणखेले यांच्या नावाने प्रदान करण्यात येणारा पुरस्कार बँक अध्यक्ष देवेंद्र शहा यांना प्रदान करण्यात आला. बँकेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, खातेदार उपस्थित होते.

## राज्य पतसंस्था फेडरेशन संचालकपदी अनिल पाटील

**कोल्हापूर** – राज्य पतसंस्था फेडरेशनच्या संचालकपदी अनिल पाटील यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. येथील वसंतराव चौगुले नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष म्हणून सध्या ते कार्यरत आहेत. फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांच्या हस्ते पाटील यांना नुकतेच नियुक्ती पत्र देण्यात आले. पालकमंत्री प्रकाश आबिटकर व पदाधिकारी उपस्थित होते.

## स्वच्छता सेवा उपक्रमाच्या यशस्वीततेसाठी शासकीय कर्मचाऱ्यांचा उस्फूर्त सहभाग

**पुणे** – विविध सहकारी संस्थामध्ये तपासणीच्या कार्यात सदैव अग्रभागी असणारी व्यक्तिमत्वे येथील तळजाई मंदिर परिसरात स्वच्छतेसाठी सरसावली आणि काही तासात सारा परिसर स्वच्छ झाला. येथील जिल्हा विशेष लेखापरीक्षक कार्यालयाच्या वतीने स्वच्छता सेवा उपक्रम यशस्वी पणाने राबविण्यात आला.

केंद्र सरकारच्या वतीने १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा उपक्रम राबविण्यात आला. त्याचा एक भाग म्हणून सार्वजनिक जागांची देखभाल, शिबिराचे आयोजन, हरित उत्सव, साजरे करणे आदींचा समावेश आहे, सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी याबाबतचे पत्र जारी केले आहे. जिल्हा विशेष लेखा परीक्षक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अभियान राबविण्यात आले. यामध्ये पुरुष आणि महिला कर्मचारी सहभागी झाले.

## नागरी सहकारी बँकांसमोर...

कंपन्या आक्रमकपणे देतात. फिनोटेक कंपन्या अनेक बाबतीत नागरिक सहकारी बँकांच्या स्पर्धक आहेत. पेमेंट बँका या ठेवींच्या बाबतीत नागरी सहकारी बँकांच्या स्पर्धक आहेत. या बँकांना अलीकडेच दोन लाख रुपये पर्यंतच्या ठेवी स्वीकारण्यासाठी रिझर्व बँकेने मान्यता दिलेली आहे.

याव्यतिरिक्त कंपनी कायद्यानुसार नोंदणी झालेल्या निधी कंपन्या, पतसंस्था ठेवींवर अधिक व्याजदर देऊन बँकांशी स्पर्धा करतात. अर्थातच ठेवींचा विमा ही सवलत त्या देऊ शकत नसल्यामुळे सुरक्षिततेचा प्रश्न असतो. तथापि ज्यादा व्याजदरामुळे ठेवींचा प्रवाह त्यांच्याकडे जातो, ही महाराष्ट्रातली तरी वस्तुस्थिती आहे.

✻ **स्पर्धेला सामोरे जाणे** – आर्थिक क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या संस्था पूर्वीपासून कार्यरत असून नव्याने त्यामध्ये फिनोटेक कंपन्यांसारख्या नव्या संस्थांची भर पडत आहे. रिझर्व बँकेचे त्यांना प्रोत्साहन असल्यामुळे ही स्पर्धा अपरिहार्य आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. बँकांशी स्पर्धा करत असताना ग्राहक सेवा या महत्त्वाच्या घटकाकडे काळजीपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. कर्जाच्या प्रॉडक्टची परिपूर्ण माहिती काउंटरवरील कर्मचाऱ्याला असणे आवश्यक आहे. यासोबतच अन्य स्पर्धकांच्या तुलनेत आपण काय वेगळे देऊ शकतो हेही त्यांना सांगता आले पाहिजे. व्याज आकारणीचे हिशोब, छुपे खर्च, वसुलीची पठाणी पद्धत यावर त्यांना भाष्य करता आले पाहिजे. खातेदारांना आपल्या बँकेकडून कर्ज घेणे कसे सोयीचे आहे हे पटवून सांगता आले पाहिजे. ठराविक मर्यादेपर्यंत शाखांना किंवा अधिकाऱ्यांना कर्ज मंजुरीचे अधिकार देणे हे अत्यंत आवश्यक आहे. नागरी सहकारी बँका अजूनही कर्ज प्रकरण मुख्य कार्यालयाकडून मंजुरीची अपेक्षा ठेवतात, हे चित्र बदलले पाहिजे.

प्रशिक्षणाने हे सहजपणे करता येईल. बँकिंगमध्ये झपाट्याने बदल होत आहेत. या बदलाला सामोरे जात असताना स्पर्धकांइतके आक्रमक होण्याची गरज आहे. तसेच कर्जाचे सर्व प्रॉडक्ट आपल्याकडे असतील ही काळजी घेणेही आवश्यक आहे. यासाठी संचालक मंडळ पातळीवर योग्य तो निर्णय घेऊन प्रॉडक्ट, कर्ज मंजुरीचे अधिकार यावर गांभीर्याने विचार केल्यास या स्पर्धेला सहज तोंड देता येईल. नवा व्यवसाय मिळू शकेल यातून बँकेची लाभप्रदता निश्चित वाढू शकेल.

**– डॉ. अभय मंडलिक.**

**लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.**

✻✻✻✻✻

# बाजार समितीची बदलती भूमिका : नियंत्रक ते सुविधादाता

महाराष्ट्र राज्यात ३०७ कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. राज्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समित्यांसाठी दोन स्तरीय यंत्रणा कार्यरत आहे. यामध्ये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम, १९६३ ची अंमलबजावणी म्हणजेच नियमनाचे कामकाज हे पणन संचालनालया तर्फे करण्यात येते. पणन संचालकांच्या अधिनस्त सहकार विभागातील विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक आणि सहाय्यक निबंध हे नियमनाची जबाबदारी बाजार समितीच्या मदतीने पार पाडत असतात. विकासासंदर्भातील कामकाजासाठी कायद्यातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची स्थापना करण्यात आली असून आठ विभागीय कार्यालयांच्या मदतीने कृषी पणन मंडळ कृषी पणन विकासाचे कामकाज करीत आहे. यामध्ये



भास्कर पाटील
९४२३० ०४७९६

* बाजार समितीचे अर्थसंकल्प मंजुरी, * शेतमाल तारण योजना अंमलबजावणी, * बाजार समित्यांना विकास कामांसाठी कर्जपुरवठा, * प्रशिक्षण- हॉर्टिकल्चर एक्सपोर्ट ट्रेनिंग कोर्स, कृषी उत्पन्न बाजार समिती पदाधिकारी /अधिकारी प्रशिक्षण * कृषी माल निर्यातीसाठी सुविधांची उभारणी, * राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था स्थापना, * इ-नाम अंमलबजावणी, * बाजार समित्यांमध्ये संगणकीकरण, * दैनंदिनी, कॅलेंडर आणि कृषी पणन मित्र मासिक प्रकाशन, * विविध योजना अंमलबजावणी - आंतरराज्य शेतमाल व्यापार रस्ते वाहतूक अनुदान - फळे व धान्य महोत्सव अनुदान - कृषी माल निर्यातीकरिता समुद्रमार्गे वाहतूक अनुदान - भौगोलिक मानांकन प्राप्त कृषी उत्पादनाकरिता अर्थसहाय्य इत्यादी बाबींचा यामध्ये समावेश आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम, १९६३ अंतर्गत स्थापन झालेली आणि कोणत्याही सोयी सुविधा नसताना संपूर्णपणे सोयी सुविधांच्या निर्मितीसाठी आणि कृषी मालाच्या विक्री व्यवस्थापनासाठी स्थापन झालेली संस्था.

कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापने मागील उद्देश- योग्य बाजारभाव, योग्य वजन आणि पैशांची शेतकऱ्यास हमी. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व नियमन) अधिनियम, १९६३ अंतर्गत कलम (२९) २ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या कर्तव्याबाबत उल्लेख केलेला आहे.

**• बाजार समित्यांची कर्तव्ये–**

* बाजार आवार * परवाने देणे, नूतनीकरण करणे, नूतनीकरण नाकारणे, निलंबन, रद्द करणे * बाजार सुस्थितीत ठेवणे * सुविधा उभारणी * कृषी मालाचा लिलाव करणे * शेतकऱ्यांच्या मालाच्या रकमेची हमी * किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी किमतीत शेतमाल विक्रीस प्रतिबंध * बाजार माहिती प्रसार * प्राणी, गुरे, ढोरे, पक्षी आवक व स्वास्थ्य कामे * नियमन फायदे, व्यवहार पद्धती, सुविधा यांना प्रसिद्धी * विवाद समझोता तरतूद * १२ (१) परवानग्या * निवडणूक व्यवस्था * कर्ज, अर्थसहाय्य, आर्थिक मदत मिळणे * अर्थसंकल्प, पुरवणी अर्थसंकल्प, पुनर्विनियोजन अर्थसंकल्प मंजुरी * वजन, मापे प्रमाणित करणे, उपलब्ध करून देणे * परवानाधारकांची लेखा पुस्तके व इतर दस्तऐवज तपासणी * अधिकारी कर्मचारी नियुक्ती * स्टाफला वेतन, रजा, निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी, इत्यादी रकमा देणे * साठवण व वखार विषयक सुविधा देणे

**• इतर सुविधा –** जमीन संपादन, कंपाऊंड, गेट, लिलावगृह, इलेक्ट्रॉनिक वजन काटे, भुईकाटे, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, गोदाम, रस्ते, सुरक्षा, शेतकरी निवास, हमाल भवन, अल्पोपहार आणि जेवणासाठी हॉटेल, इत्यादी कर्तव्य / जबाबदाऱ्या बाजार समितीवर टाकण्यात आलेल्या आहेत.

कृषी पणन कायद्यातील बदलांमुळे बाजार समित्यांसोबत मोठ्या प्रमाणात स्पर्धा होणारच आहे. आणि ती आता अनिवार्य आहे. परंतु बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना सोयी सुविधा देताना स्पर्धेमध्ये आपण कोठे आहोत याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

**• सुविधा सेवा कोणासाठी–**

कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळावा, त्यांच्या मालाचे वजन योग्य व्हावे आणि त्यांच्या मालाच्या होणाऱ्या रकमेची हमी शेतकऱ्यास असावी यासाठी आणि शेतकऱ्यांच्या मालाच्या विक्रीसाठी आवश्यक सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी झाली असली तरी निर्माण होणाऱ्या सुविधांचा वापर करणारे तसेच विक्री व्यवस्थेत समाविष्ट घटक म्हणजेच आडते, व्यापारी, म्हणजेच खरेदीदार, हमाल, मापाडी, बाजार समितीचे अधिकारी / कर्मचारी यांनाही सुविधांमुळे काम करण्यास मदत होते.

**• बाजार समितीमध्ये उपलब्ध होणाऱ्या सुविधांच्या उभारणी आणि निर्मितीमध्ये संलग्न सेवा पुरवठादार कोण ?**

* पाणीपुरवठा- ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका, कॅन्टोन्मेंट बोर्ड * वाहतूक, सुरक्षा व्यवस्था- पोलीस * रस्ता- स्थानिक स्वराज्य संस्था किंवा शासन * विद्युत पुरवठा- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यासोबतच बँक, पोस्ट ऑफिस, पेट्रोल पंप, पोलीस स्टेशन, ए.टी.एम., अग्निशमन यंत्रणा, इत्यादी सेवा सुविधा या बाजार समितीमध्ये शेतकरी आणि बाजार घटक यांच्याकरिता आवश्यक आहेत.

**• बाजार समितीच्या उत्पन्नाची साधने –**

बाजार समितीचा उत्पन्नाचा प्रमुख मार्ग हा बाजार फी आहे. तथापि बाजार फी वाढण्यासाठी म्हणजेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न वाढण्यासाठी सेवा सुविधा उपलब्ध होणे आणि शेतकऱ्यांना बाजार समिती मध्ये यावेसे वाटणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी बाजार समित्यांनी अधिकाधिक सेवा देणे तसेच सुविधा उभारणे आवश्यक आहे. बाजार समितीला बाजार फी बरोबरच इतर विविध बाबींमधून आर्थिक उत्पन्न मिळू शकते. यामध्ये

* परवाने फी, * गेट पास, * वाहनतळ, * साक्षांकन फी, * पेट्रोल पंप, * गाळेभाडे, * सामायिक सुविधा केंद्र, * गुंतवणुकीवरील व्याज, * स्थावर प्रॉपर्टी, * कचऱ्यापासून खत निर्मिती आणि विक्री, * सशुल्क स्वच्छतागृहे, * सोलर प्लांट * भुई काटा* थेट पणन परवानाधारकांकडून बाजार फी * ऑन लाइन प्लांटफॉर्म इत्यादी मार्फत बाजार समितीस अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते.

महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून सन २०१६ साली फळे आणि भाजीपाल्यावरील नियमन मुक्त केलेले आहे. यामुळे शेतकऱ्याला फळे आणि भाजीपाला बाजार समितीच्या आवाराच्या बाहेर विक्रीसाठी मुभा मिळालेली आहे. अर्थातच यामुळे बाजार समितीचे उत्पन्न कमी झाले आहे. त्याचबरोबर नियमनामधील बदलांमुळे बाजार समितीचे अधिकार मर्यादित होत आहेत. खाजगी बाजार, थेट पणन, कमोडिटी मार्केट, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, ऑनलाइन प्लॅटफॉर्म, शेतकरी उत्पादक कंपन्या इत्यादींमुळे बाजार समित्यांना मोठी स्पर्धा निर्माण होत असून यामुळे उत्पन्न वाढीसाठी भविष्यात मोठ्या प्रमाणात मर्यादा येणार आहेत. अशा परिस्थितीत बाजार समित्यानी फक्त नियमन न करता सेवा पुरवठादार होऊन शेतकरी आणि व्यापारी बाजार आवारात कसे येतील

पुढील पानावर...



# बाजार समितीची बदलती भूमिका...

तसेच बाजार घटक शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा कशा देतील यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

❊ बाजार घटकांसाठी बाजार समित्यांनी सेवा पुरवठादार होणे ❊ अधिकाधिक चांगल्या आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून आवक वाढवून उत्पन्नात वाढ करणे ❊ शेतकऱ्यांकरिता उघड लिलाव, ❊ तात्काळ वजन, ❊ लवकरात लवकर शेतमालाची रक्कम शेतकऱ्यांना अदा करणे, ❊ माल साठवणुकीची सुविधा.

या महत्त्वाच्या सुविधा उपलब्ध करून उत्पन्नात वाढ करणे, बाजार घटकांना बाजार समिती सेवा देणारी संस्था वाटणे अशा प्रकारे बाजार समित्यांनी कामकाजात बदल करणे आवश्यक आहे.

**● कोणत्या सुविधा बाजार समित्यांनी निर्माण करणे अपेक्षित?**

❊ बाजार आवार ❊ शीतगृह ❊ वाहतूकदारांसंदर्भात माहिती ❊ बँक ❊ ए. टी. एम. ❊ पेट्रोल पंप ❊ बाजार भाव माहिती फलक ❊ उघड लिलाव पद्धत ❊ सदोष वजन काटे ❊ नियमानुसार आडत ❊ नियामानुसार हमाली ❊ शेतमालाची वेळेत चढउताराची तत्पर व्यवस्था ❊ हमालीचे योग्य दर ❊ धान्य चाळणी यंत्र ❊ निर्यातीच्या सुविधा ❊ शेतमाल तारणाची व्यवस्था ❊ बाजार भाव माहिती वेबसाईटवर दररोज अपलोड करणे ❊ शेतमाल विक्रीनंतर २४ तासाच्या आत शेतकऱ्याला पैसे मिळणे ❊ लिलाव किंवा शेतकऱ्याचा माल उतरवून ठेवण्यासाठी पुरेशी जागा ❊ पावसापासून शेतमालाचे संरक्षण ❊ शेतकऱ्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या संदर्भात माहिती फलक ❊ शेतकऱ्यांना प्रशिक्षण ❊ बजेटमध्ये तरतूद केल्यानुसार प्रशिक्षणाचा खर्च करणे ❊ प्रशितकरण, ❊ रायापनिंग चेंबर यांची सुविधा ❊ शेतकऱ्यांची सुरक्षितता ❊ शेतमालाची सुरक्षितता ❊ बाजार आवार स्वच्छता ❊ शेतकरी तक्रार निवारण ❊ जनावरांचा सुस्थितीतील बाजार आवार ❊ जनावरांसाठी औषधोपचाराची व्यवस्था ❊ ग्रंथालय ❊ माती परीक्षण प्रयोगशाळा ❊ बाजार माहितीची एस.एम.एस. अथवा व्हाट्सअप द्वारे प्रसारण व्यवस्था ❊ किमान आधारभूत किंमत माहिती उपलब्धता ❊ किमान आधारभूत किमतीपेक्षा जास्त दराने शेतमालाची विक्री ❊ उपबाजारांचा विकास ❊ उत्पादनाच्या ठिकाणापासून विक्रीचे ठिकाण अंतर ❊ बाजारभावांचा अंदाज ❊ हवामानाचा अंदाज ❊ निर्यातीसाठी चालना ❊ प्रक्रियेसाठी चालना ❊ प्रशिक्षित प्रतवारीकार ❊ मॉइश्चर मीटर ❊ सुटसुटीत परवाना प्रक्रिया ❊ बाजार आवारातील शॉपचा सुयोग्य वापर ❊ सौदा पट्टी वेळेत मिळणे ❊ न विकल्या गेलेल्या मालाच्या साठवणुकीची सुविधा ❊ प्रतवारी प्रयोगशाळा ❊ मत्स्य विक्रीसाठी, साठवणुकीसाठी सुविधा ❊ अग्निशमन यंत्रणा ❊ पोलीस स्टेशन ❊ पोस्ट ऑफिस ❊ ड्रेनेज ❊ पार्किंग ❊ उपहारगृह ❊ सी. सी. टी. व्ही. ❊ अल्प दरात भोजन ❊ हमी भाव खरेदी केंद्र ❊ बाजार समिती संगणकीकरण ❊ Digitisation ❊ यांत्रिकीकरण ❊ कृषी निविष्ठांची बाजार आवारात उपलब्धता ❊ शेतकरी उत्पादक कंपन्या करिता राखीव गाळे.

**– भास्कर पाटील मो. नं. – ९४२३० ०४७९६ ❊❊❊❊❊**



# विदर्भ महिला क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि. वरोरा

नों.क्र.– CHD/WRA/RSR/CR/624/2015

मिश्राभवन पहिला माळा, नेहरू चौक, वरोरा, जि. चंद्रपूर




संस्थेचे संपूर्ण कामकाज कोअर बँकिंग प्रणालीत पेपरलेस

Email - vmccsw15@rediffmail.com

IFSC Code - ICIC0000104

NEFT/RTGS सुविधा



** व्यापारी कर्ज **

रू.५ लाखा पर्यंत व्यापारासाठी त्वरीत कर्जाची सुविधा

MAHAVITARAN विज बिल भरणा केंद्र

* प्रत्येक कर्ज खातेदारांना विमा संरक्षण लाभ
* कर्ज प्रकरण प्राप्त झाल्यानंतर एक आठवड्यात निर्णय
* महिलांसाठी आकर्षक व्याज दरात सुवर्ण खरेदी योजना.

**कर्जाच्या योजना :**

* एनएससी/एलआयसी तारण कर्ज
* व्यक्तीगत/कंज्युमर/व्यावसायिक कर्ज
* स्थावर तारणी कर्ज, गृह कर्ज
* सोने तारण कर्ज * वेअर हाऊस कर्ज
* वाहन तारण कर्ज * सि.सि. लोन

**बचत योजना :**

* बचत खाते
* मासीक आर.डी.
* दैनिक बचत
* मुदती ठेव
* विशेष ठेव योजना (कुबेर लक्ष्मी ठेव)

महिला बचत गटासाठी मायक्रोफायनान्स सुविधा उपलब्ध

विविध कर्ज योजनांचा लाभ घेवून आपले आर्थिक प्रश्न सहज सोडवा.

अधिक माहितीकरीता संपर्क – ८२७५२ ४४१९९

**सुविधा**

ATM



आपल्या डेबीट कार्ड द्वारे त्वरीत रोख रक्कम मिळेल.

• निशुल्क सुविधा • सर्व बँकेचे डेबीट कार्डस

सुवर्ण खरेदी/सुवर्ण तारण कर्ज उपलब्ध



सोने खरेदी व्याजदर

9% कालावधी – १८ महीने

सोने तारण व्याजदर

10% कालावधी – १२ महीने

फक्त ३०% रक्कम डाऊन पेमेंट भरून सोने खरेदी करा.

# कालिंदेश्वर अर्बन क्रेडिट को-ऑप सोसायटी लि.

Reg.No.YML/MGM/RSR/(CR)/686/2024-25

IFSC CODE :- ICIC0000106

काळी (दौ) ता.महागांव जि.यवतमाळ

## सहयोगातून समृद्धीकडे



सोने तारण कर्ज



व्यवसाय कर्ज



गृह कर्ज



वाहन कर्ज



वेतन कर्ज



एफ.डी. ठेव कर्ज

### * संस्थेच्या योजना व सुविधा *

- मासिक ठेव योजना
- मुदत ठेव योजना
- दैनिक ठेव योजना
- दामदुप्पट ठेव योजना
- आवर्त ठेव योजना
- आरटीजीएस
- एनईएफटी
- कोअर बँकिंग
- एस.एम.एस. बँकिंग
- क्युआर कोड
- युपीआय पेमेंट

- चालू खाते (CA)
- बचत खाते (SB)
- दैनिक संचयी खाते (DRD)
- मासिक आवर्त ठेव (RD)
- मुदत ठेव (FD)
- शिदोरी योजना (MIS)

९०११७०३७१२

## सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!






# दीपावली

निमित्त मंगलमय शुभेच्छा!

**श्री अनिल नारायणराव दंडे**
अध्यक्ष

**श्री रामदास भानुदास नाईक**
उपाध्यक्ष

रु.१ लाख १ वर्षासाठी गुंतवा
आणि प्रतिमाह रु.८३३ मिळवा.
दरमहा मिळवा आकर्षक व्याज !

८४ महिन्यात दाम दुप्पट योजना

| मुदत ठेव दिवस | व्याजदर |
|---|---|
| ३० दिवस ते ४५ दिवस | ५% |
| ४६ दिवस ते ९० दिवस | ६% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ७% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८% |
| ३६६ दिवस ते पुढे | १०.५०% |

**विविध कर्ज योजना**
- सोने तारण कर्ज
- वैयक्तीक कर्ज
- गृह तारण कर्ज
- वाहन कर्ज

**विविध योजना**
- मुदत ठेव (F.D.)
- दाम दुप्पट
- एम.आय.एस.(MIS)
- (R.D.)

* नियम व अटी लागू

DigiMark 860 551 3331

## जनता नागरी
**सहकारी पतसंस्था मर्यादित, यवतमाळ**

**मुख्य कार्यालयः शिवाजी मैदान, यवतमाळ**
शाखा : शिवाजी नगर, आर्णी रोड, दारव्हा रोड, यवतमाळ
संपर्क: +91 9822 232 486

# NUCC
NIRMAL UJJWAL CREDIT CO-OP. SO. LTD., NAGPUR (MULTI-STATE)

# निर्मल उज्वल
क्रेडिट को-ऑप. सोसा. लि. नागपूर (मल्टीस्टेट)

NUCC ESTD. 1989

## सुलभ कर्ज योजना

- सुवर्ण तारण कर्ज
- गृह तारण कर्ज
- वाहन कर्ज (2 व्हीलर / 4 व्हीलर)
- तारण कर्ज
- प्रोजेक्ट कर्ज
- सोलार कर्ज
- वैयक्तिक कर्ज

## इन्शुरन्स सुविधा उपलब्ध

जीवन विमा | सामान्य विमा

आरोग्य विमा

## ठेवी

- 46 ते 180 दिवसा करीता 6%
- 181 ते 364 दिवसा करीता 7%
- 24 महीने 9.5% | 10% (जेष्ठ नागरिक)
- 12 महीने ते 36 महीने 8% | 8.5% (जेष्ठ नागरिक)
- 36 महीने व अधिक 8.25% | 8.75% (जेष्ठ नागरिक)
- 13 महीने 9% | 9.5% (जेष्ठ नागरिक)
- 84 महिन्यात दाम दुप्पट



## विशेष ठेवी स्कीम

- 151 दिवसा करीता 8.5%
- 181 ते 364 दिवसा करीता 9%

☑ कमी व्याजदर ☑ सोपी कागदपत्रे

☑ जलद प्रक्रिया ☑ विश्वासार्ह सेवा

आजच संपर्क करा

अधिक माहितीसाठी भेट द्या

(अटी व शर्ती लागू)*

Add: 193, Nandanvan Main Road, Nagpur - 09 | Ph No. 0712-2740800

Email : nirmalujjwal@gmail.com | Website : www.nirmalujjwal.com



# घरोघरी सजले आनंदाचे ताट..
# नूतन वर्षाची चाहूल, आली दिवाळी पहाट!

दीपावली म्हणजे सुख, समृद्धी आणि आनंदाचा उत्सव. या उत्सवात प्रत्येकाच्या अंगणात प्रगती, समृद्धी आणि स्वप्नपूर्तीचे आकाशदीप उजळावे यासाठी 'जनता बँक' सदैव आपल्या सेवेत तत्पर असते. वैयक्तिक गरज असो की व्यावसायिक कारण, घराचे स्वप्न असो की शिक्षणाचे ध्येय... तुमच्या प्रत्येक गरजेला आम्ही तुमच्यासोबत आहोत. विश्वासाचे नाते अधिक मजबूत करत, आधुनिकतेची कास धरत ग्राहकाभिमुख सेवा देत तुमच्या आशा-आकांक्षाना पूर्णत्वाकडे नेण्यासाठी 'अर्थपूर्ण' सोबती बनून तुमच्या सोबत आहोत. चला, समृद्धीचा दीप लावूया.. दीपावलीला अर्थपूर्ण बनवूया.

**दीपावलीचा आनंद द्विगुणित करणाऱ्या बँकेच्या विविध कर्ज योजना**

जनता **वाहनकर्ज** कर्ज योजना | जनता **गृहकर्ज** कर्ज योजना | **लोन अगेन्स्ट प्रॉपर्टी** | जनता **ई-बाईक** कर्ज योजना

**बँकेचे सर्व सभासद, खातेदार व हितचिंतकांना दीपावलीच्या मंगलमय शुभेच्छा!!**

# जनता सहकारी बँक लि., पुणे
**(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)**

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. फोन : ०२०-२४४५३२५८ / ५९

टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 (बँकेच्या सुट्टीचे दिवस सोडून) www.janatabankpune.com



# राणी लक्ष्मीबाई महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, शेंदुर्णी

ता. जामनेर, जि. जळगाव

रजि नं.जे.जी.ए./जे.एम.आर./आर.एस. आर.(सी. आर.) १०६३/९१

**✻ संचालक मंडळ ✻**

अध्यक्षा – सौ. रेखा प्रकाश झंवर
उपाध्यक्षा – सौ.अनिता संतोष गुजर
संचालिका – सौ. साधना वामन फासे
संचालिका – सौ. वर्षा जयवंत पीसे
संचालिका – सौ. शितल अतुल जहागीरदार
संचालिका – सौ. ममता शितल जैन
संचालिका – सौ. जयश्री संजय चिंचोले
संचालिका – सौ. विमल विजय वानखेडे
संचालिका – श्रीमती दुर्गाबाई वर्जन चव्हाण
संचालिका – सौ. सुलोचना तुकाराम मापारी
व्यवस्थापक – रविंद्र प्रभाकर सुर्यवंशी

**सल्लागार मंडळ व कर्मचारी वर्ग**
**मार्गदर्शक व तज्ञ संचालक**
**मा.श्री.उत्तमराव राघो थोरात**
**डॉ. श्री. शरद राजमल झंवर**




# तिरुपती बालाजी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.पिंप्राळा जळगांव

रजि.नं.जेजीए/जेजीए/आरएसआर/सीआर/२८०/२००३

शिवाजी चौक,सोमाणी मार्केट समोर पिंप्राळा–जळगांव मो.नं. : ९४०३९३१३९१

**✻ २०२४ ते २०२९ संचालक मंडळ ✻**

| अ.क्र. | संचालकांचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. संजय भगिरथ सोमाणी | चेअरमन |
| २. | श्री. चंद्रकांत नथ्थु कहाणे | व्हा. चेअरमन |
| ३. | श्री. पंकज रविंद्र सोमाणी | सचिव |
| ४. | श्री. जगदीश ओंकारनाथ मुंदडा | संचालक |
| ५. | श्री. सतिष छोटुलाल साळी | संचालक |
| ६. | श्री. मनोज पुनमचंद छाबडा | संचालक |
| ७. | श्री. बिपीन बद्रिनाथ सोमाणी (कर्ज वसुली चेअरमन) | संचालक |
| ८. | श्री. मयुर महेश सोमाणी | संचालक |
| ९. | सौ. भारती संजय सोमाणी | संचालक |
| १०. | सौ. अश्विनी पद्माकर वाणी | संचालिका |
| ११. | सौ. सुनंदा अशोक पाटील | व्यवस्थापिका |





संस्थेच्या सर्व सभासदांना आणि ठेवीदारांना
य. जि. प. कर्मचारी पतसंस्थेची सदैव साथ...
दीपावली
आपल्या प्रगतीस मदतीचा हाथ...
निमित्त मंगलमय शुभेच्छा!
संस्थेची सापंत्तीक स्थिती
कर्ज २५२.६६ कोटी
गुंतवणुक १६६.७९ कोटी
स्थावर व जंगम मालमत्ता ६.९१ कोटी
सभासद भागभांडवल ३६.१३ कोटी
ठेवी ३३७.९१ कोटी
राखीव निधी ४४.२० कोटी
ठेवीवरील आकर्षक व्याज दर
३० ते ९० दिवस ५.००%
९१ दिवस ते १८० दिवस ६.००%
१८१ दिवस ते २७३ दिवस ७.००%
२७४ दिवस ते ३६५ दिवस ७.५०%
३६६ दिवस ते २ वर्ष ८.५०%
२ वर्ष ते ३ वर्ष ९.००%
३ वर्ष ते ४ वर्ष ९.५०%
४ वर्षावरील कालावधी करीता १०.००%
सहकारी संस्थेकरीता ८.५०%
आवर्ती ठेव (१ ते २ वर्षांकरीता) ७.५०%
सातत्याने ऑडीट वर्ग 'अ'
महाराष्ट्रातील नंबर १ ची पतसंस्था
AN ISO 9001-2008 Certified
संस्थेमध्ये वैयक्तिक लॉकर सुविधा
महेश लक्ष्मणराव सोनेकर
अध्यक्ष
संजय विश्वनाथजी गावंडे
उपाध्यक्ष
संजय गुलाबराव बिहाडे
सचिव
आणि समस्त संचालक मंडळ
यवतमाळ जिल्हा परिषद
कर्मचारी सहकारी पतसंस्था
मर्या. यवतमाळ. र. नं. १०९
DigiMark 860 551 3331
मुख्यालय: स्वस्तिक चौक, गोधणी रोड, यवतमाळ
शाखा: वणी, पुसद, दारव्हा, आर्णी, पांढरकवडा | www.yzecs.org

महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संस्था

सर्वोत्तम पुरस्कार प्राप्त संस्था

## "३८ वर्षांची विश्वसनिय परंपरा असलेली संस्था"

विश्वासाचं नांव ®

ज्योती सह. पतसंस्था मर्या. कोपरगांव

आपुलकीनं वागविणारी माणसं

स्थापना १९८८

# ज्योती

## सहकारी पतसंस्था मर्या.कोपरगांव.

ज्योती सर्कल, मेनरोड, कोपरगांव ४२३६०१

फोन नं.- ०२४२३-२२१०५५ / २२३०५५

**शाखा - कोपरगाव, शिर्डी, सुरेगांव (कोळपेवाडी), कोल्हार, राहुरी, श्रीरामपुर, येवला, अहिल्यानगर, पुणे**



अॅड.श्री.रविकाका बोरावके

चेअरमन




## * आर्थिक स्थिती *

* ठेवी - ३८१ कोटी
* कर्जे - २४४ कोटी
* गुंतवणूक - १७८ कोटी
* स्व.निधी - ३० कोटी
* एकुण व्यवसाय - ६२५ कोटी
* कायम मालमत्ता - २.५० कोटी
* ऑडिट वर्ग - सतत अ
* विनम्र व तत्पर सेवा

## उपलब्ध सुविधा

- लॉकर्स सुविधा
- सोने तारण कर्ज
- एस.एम.एस. सुविधा
- NEFT / RTGS सुविधा
- DD सुविधा
- ई चलन सुविधा
- सुलभ कर्ज वितरण
- ज्योती मोबाईल बँकीग
- कोअर बँकीग सुविधा
- ज्योती मोबाईल कलेक्शन सुविधा
- विनम्र व तत्पर सेवा

सोने तारण कर्ज, लॉकर्स सुविधा, NEFT / RTGS सुविधा, SMS सुविधा,मोबाईल कलेक्शन, सुलभ कर्ज वितरण सुविधा, ज्योती मोबाईल बँकींग, ई चलन सुविधा,कोअर बँकिग सुविधा


स्नेहाचा सुगंध दरवळला,
आनंदाचा सण आला,
विनंती आमची परमेश्वराला,
सौख्य, समृध्दी लाभो तुम्हाला
शुभ दीपावली
सर्व सभासद
ग्राहक व हितचिंतक
यांना मंगलमय शुभेच्छा
ESTD. 1918
बॅसीन कॅथॉलिक
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
कॉर्पोरेट कार्यालय : कॅथॉलिक बँक बिल्डिंग, पापडी नाका, वसई पश्चिम, जिल्हा पालघर 401207, महाराष्ट्र
बोर्ड लाईन : 9527441600 / 9527451600 / 9527461600 | टोल फ्री : 0806 942 0000| www.bccb.co.in


राधेसुमन अर्बन
क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी मर्या.यवतमाळ
नोंदणी क्र.वाय.एम.एल./जी.एन.एल./आर.एस.आर/(सि.आर.)४००
पुन्हा एक नवे वर्ष,
पुन्हा एक नवी आशा,
तुमच्या कर्तुत्वाला पुन्हा एक
नवी दिशा नवे स्वप्न,
नवे क्षितीज, सोबत माझ्या
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !
विविध सुविधा व योजना
दामदुप्पट योजना
संकल्प ठेव योजना
विविध कर्ज योजना
डी.डी. आर.टी.जी.एस. सुविधा
मोबाईल द्वारे डेली कलेक्शन
मुदत ठेव योजना
अत्याधुनिक मोबाईल बँकींग
एम.आय.एस. योजना
मुख्य शाखा कार्यालय : रविराज हाईटस, माई हॉटेलच्या बाजूला आर्णी रोड, यवतमाळ 7709173553, 8855999786 radhesumanurban400@gmail.com

# धनश्री नागरी सहकारी पतसंस्था मर्या. तळोधी (बा.)

रजि. नं. ११०१/१९९४ मुख्यालय तळोधी (बा.) ८३९०९८१०३०

## सर्व भागधारकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



| शाखा व्यवस्थापक | मोबाइल नंबर |
|---|---|
| तळोधी (बा.) | ८३०८०२७६४३ |
| नेरी | ९३७०३९४१९० |
| राजोली | ९४२०८६८१७९ |
| पोभूर्णा | ७९७२२०५११८ |
| नागभिड | ९५१८५४७७८५ |
| भिसि | ९५९५२६६५७४ |
| मुल | ९६७३४२०५६० |

### सुविधा व योजना

* आकर्षक ठेव व कर्ज योजना
* सुलभ सुवर्ण तारण कर्ज
* आरटीजीएस/एनईएफटी सुविधा
* लॉकर सुविधा



श्री. सुभाष पाकमोडे, अध्यक्ष



डॉ. विजय आकुलवार, उपाध्यक्ष



मा. मनोज हंबर्डे, मुख्य प्रवर्तक



डॉ. स्मिता हांडेकर, सचिव



श्री. सुखदेव भाकरे
संचालक



श्री. सुरेशजी सेलोकर
संचालक



श्री. सुनिल मदनकर
संचालक



श्री. सचिन चिंतावार
संचालक



श्री. गणेश तर्वेकर
संचालक



श्री. पियुष मंगले
संचालक



श्री. लोकेश कोकाटे
संचालक



सौ. पुष्पलता बोरकर
संचालिका



सौ. परिणीता खोबरागडे
संचालिका



श्री अरुण राऊळकर
तज्ञ संचालक


मागील २३ वर्षापासुन जनतेच्या अविरत सेवेत...
आपण ठेवलेला विश्वास...
हाच नेर अर्बनचा विकास...
नेर अर्बन
को-ऑप. क्रेडीट सोसायटी मर्या., नेर र.नं. 464
मुख्य कार्यालय : छत्रपती भवन, श्री शिवाजी हायस्कूल समोर, नेर परसोपंत जि. यवतमाळ
२००२ पासून सतत ऑडीट वर्ग अ
आपल्या शाखा
कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
नेर 07238-267777
यवतमाळ 07232-245000
लाडखेड 09403490241
वणी 07239-228000
आर्णी 07234-266000
अकोला बा. 07232-276777
दिग्रस 07234-222888
बुटीबोरी 07103-263333
कारंजा लाड 07256-299110
अमरावती राजकमल 0721-2990000
सिटीलॅन्ड/बिझीलॅन्ड नांदगाव पेठ, अमरावती 0721-2991000
संचालक मंडळ
श्री. नरेंद्रजी गढ्रे माजी अध्यक्ष
सौ. अनयाताई गढ्रे अध्यक्षा
श्री. सुनिलजी वरोई उपाध्यक्ष
श्री. प्रशांतजी काळे सचिव
श्री. पवनजी परळीकर संचालक
श्री. पुरुषोत्तमजी महिंद्रकर संचालक
श्री. चंद्रभानजी मानतुटे संचालक
सौ. बेबीकलाताई काळे संचालिका
सौ. सुनिताताई नखाते संचालिका
श्रीमती उज्वलाताई चिरडे संचालिका
कु. करुणाताई भंडारकर संचालिका
श्रीमती नंदाताई संगेवार संचालिका
श्री. प्रदीपजी झाडे व्यवस्थापकीय संचालक
आकर्षक सुविधा
मोबाईल बँकींग सुविधा
QR Code सुविधा
ECS
ATM सुविधा
RTGS/NEFT/IMPS
कर्ज सुविधा
वैयक्तीक कर्ज
गृह तारण कर्ज
सोने तारण कर्ज
फोर व्हिलर कर्ज
व्यापारी कर्ज
टू-व्हिलर कर्ज
कर्मचारी कर्ज
F.D. वर कर्ज
माल तारण कर्ज
दिपावली निमित्त सर्व जनतेस मनःपूर्वक शुभेच्छा

# दावा न केलेल्या ठेवी, ठेवीदारांना परत करणाऱ्या बँकांना, आरबीआय प्रोत्साहन रक्कम देणार!



**उदय पेंडसे**
**९८६९० ३४६६२**

भारतातील राष्ट्रीयकृत, खाजगी, सहकारी अशा सर्व प्रकारच्या बँकांनी, ३० जून २०२५ पर्यंत रिझर्व्ह बँकेच्या ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधी (DEAF) कडे ६७०००/- कोटींपेक्षा अधिक रक्कम जमा केली आहे. एवढी अवाढव्य रक्कम संबंधित ठेवीदारांना, खातेदारांना लवकरात लवकर परत मिळावी, या हेतूने सर्व बँकांसाठी प्रोत्साहन योजना जाहीर केली आहे.

दावा न केलेल्या १० वर्षांपर्यंतच्या ठेवी व निष्क्रिय खाती बँकांकडेच असतात. १० वर्ष पूर्ण झाल्यानंतर या ठेवी, खात्यांची सविस्तर माहिती व रक्कम रिझर्व्ह बँकेच्या ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधीकडे पाठवावी लागते. निष्क्रिय खाती व दावा न केलेल्या ठेवी जलदगतीने परतावा सुलभ करण्याची योजना तयार करण्यात आली आहे.

या योजनेचे उद्दिष्ट म्हणजे बँकांनी निष्क्रिय खाती पुन्हा सक्रिय करण्यासाठी तसेच ठेवीदार शिक्षण व जागरूकता (DEA) निधीकडे हस्तांतरित झालेल्या व दावा न केलेल्या ठेवी त्यांच्या योग्य दावेदारांना वेळेवर व कार्यक्षम पद्धतीने परत देण्यासाठी सक्रियपणे प्रयत्न करावेत, यासाठी ही योजना जाहीर केली आहे. दि. १ ऑक्टोबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ही योजना कार्यान्वित राहणार आहे. ही योजना DEA निधी योजनेअंतर्गत नोंदणीकृत असलेल्या सर्व प्रकारच्या बँकांना लागू असेल. बँकांतील सर्व निष्क्रिय खाती व DEA निधीकडे हस्तांतरित झालेल्या व अद्याप निकाली न निघालेल्या न मागितलेल्या ठेवी या योजनेअंतर्गत समाविष्ट असतील. योजनेच्या कालावधीत योग्य दावेदारांना बँकांकडून निष्क्रिय खाती पुन्हा सक्रिय करून दिली जाणारी रक्कम तसेच दावा न केलेल्या ठेवींचा झालेला निपटारा, यांचा समावेश प्रोत्साहनपर रक्कम अदा करताना विचारात घेतला जाणार आहे.

**※ प्रोत्साहन पर रक्कम देण्याची पद्धत –**

बँकांना वेगवेगळ्या टप्प्यानुसार खाते किती काळ निष्क्रिय होते व खात्यातील ठेवीची रक्कम यावर आधारित प्रोत्साहन पर रक्कम दिली जाईल. बँकेस देय प्रोत्साहन पर रक्कम पुढीलप्रमाणे असेल.

| |
|---|
| ४ वर्षांपर्यंत रकमेतून ५% किंवा ५,०००, जी कमी असेल ती. |
| ४-८ वर्षे रकमेतून ६% किंवा १०,०००, जी कमी असेल ती. |
| ८-१० वर्षे रकमेतून ७% किंवा १५,०००, जी कमी असेल ती. |
| १० वर्षे व त्याहून अधिक, रकमेतून ७.५% किंवा २५,०००, जी कमी असेल ती. |

कालावधी निश्चित करताना, मुदत संपल्यानंतर दावा न केलेल्या ठेवींची तारीख व खाते निष्क्रिय झाल्याची तारीख लक्षात घेतली जाईल.

**※ दाव्यांचे सादरीकरण –**

बँकांनी तिमाही आधारावर निर्धारित स्वरूपात, तिमाही संपल्यानंतर एका महिन्याच्या आत, दावा रिझर्व्ह बँकेकडे सादर करावा. दावा फॉर्मवर बँकेच्या उच्च व्यवस्थापनाने प्राधिकृत केलेल्या वरिष्ठ कार्यकारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. ई-मेलद्वारे dea.fundrbi.org.in वर पाठवलेला दावा पोस्टाद्वारे ही पाठवावा. रिझर्व्ह बँकेकडे सादर केलेले दावे बँकेच्या विद्यमान अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वांनुसार अंतर्गत लेखापरीक्षण/तपासणीस अधीन राहतील. सादर केलेला दावा रिझर्व्ह बँकेकडून ३० दिवसांच्या आत निकाली काढला जाईल.

**– उदय पेंडसे** *****

# दत्तच्या सभासदांना बारा टक्के लाभांश - प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी




**शिराळा, सांगली** – श्री दत्त नागरी पतसंस्थेच्या वतीने सदस्यांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. संस्थेची ३४वी सर्वसाधारण सभा झाली. त्यामध्ये संस्थेचे संस्थापक व विद्यमान संचालक प्राचार्य डॉ. पी. बी. कुलकर्णी यांनी लाभांश जाहीर केला. अध्यक्षस्थानी उपाध्यक्ष बी. टी. निकम होते.

संचालक दिनेश हसबनीस यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संचालक व अधिकाऱ्यांनी सतरा विषय मांडले. सर्व विषय सभासदांनी मंजूर केले. शिराळा शाखा प्रमुख सुखदा महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थापक प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनी नफा विभागणी विषय मांडला. ते म्हणाले, संस्थेने चांगला नफा मिळवला आहे. उपलब्ध निधीची केलेली पर्याप्त व फायदेशीर गुंतवणूक, कर्जात झालेली वाढ आणि प्रभावीपणे झालेली वसुली यामुळे नफा क्षमतेत वाढ झालेली आहे.

अध्यक्षस्थावरून बोलताना निकम म्हणाले, संस्थेने अहवालसालात प्रगती केली असून वसूल भागभांडवल, एकूण ठेवी, कर्जे यांमध्ये भरघोस वाढ झाली आहे. आर्थिक व्यवहारात विक्रमी वाढ झाली आहे. सूत्रसंचलन श्वेता जाधव व उपकार्यकारी संचालक संजय विभूते यांनी आभार मानले.

वार्षिक बैठकीला संस्थेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी तसेच खातेदार आणि ग्राहक उपस्थित होते.

# धनादेश आणि त्याची नवी कार्यप्रणाली

भारतीय रिझर्व्ह बँकेने घोषित केले आहे की, ४ ऑक्टोबर, २०२५ पासून चेक क्लिअरिंग प्रणालीमध्ये मोठा बदल लागू होणार आहे. चेक बँकेत जमा केल्यावर काही तासांतच त्याचे पैसे खात्यात जमा होतील. यासाठीची योजना सतत क्लिअरिंग प्रणाली - Continuous Cheque Clearing System आहे. आधी चेक पास व्हायला किमान दोन दिवस लागायचेच. तेच दिवस आता काही तासांवर चेकचे भवितव्य कळविणारे असे होणार आहे. काही तासांच्या कालावधीत चेक पास झाला किंवा नाही हे समजणार आहे. प्रगत तंत्रज्ञान, नाविन्याचा शोध, ग्राहकांना अधिकाधिक सोयी देणे, असा सर्व सकारात्मक विचार यामागे आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून नेहमीच समाजहिताचा विचार केला जातो.



**वंदना धर्माधिकारी**
९८९०६ २३९१५

नवीन गोष्टीची सुरुवात होण्यापूर्वी चेक म्हणजे नक्की, चेक छापायचा विशेष अधिकार फक्त आणि फक्त बँकांना दिलेला आहे. विशिष्ट ठराविक प्रतीच्या कागदावर ठराविक पद्धतीने चेक्स छापले जातात. बचत, चालू व कॅश क्रेडिट खात्यात चेकबुक दिले जाते. चेक म्हणजेच धनादेश एक दस्तऐवज आहे. बँकिंग संपूर्णत: कायदे कानून यावर आधारलेले आहे. इथे, चेक संबंधीचा महत्त्वाचा NIA - Negotiable Instrument Act - १८८१ होय. यामध्ये चेक, प्रॉमिसरी नोट, बिल ऑफ एक्स्चेंज आणि डिमांड ड्राफ्ट यांचा समावेश येतो. एप्रिल २०२१ पासून चेकची आधीची ६ महिन्याची कालमर्यादा कमी करून ती ३ महिने करण्यात आली. चेकवरील १.५ सेंटिमीटर पांढरी पट्टी म्हणजे मायकर बँड होय. MICR - Magnetic Ink Character Recognition Band त्यावरील नंबर्समध्ये सुरुवातीला ६ आकडी ओळीने येणारा सीरियल नंबर असतो. पुढील ९ आकडी नंबर हा बँक शाखेचा मायकर कोड नंबर असतो. त्यात सुरुवातीला शाखेच्या गावाचा ३ आकडी पिन नंबर (उदा.: पुणे ४११), त्यापुढील ३ नंबर म्हणजे बँकेला दिलेला ठराविक विशिष्ट नंबर (उदा. बँक ऑफ इंडिया -०१३) असतो आणि उरलेले तीन नंबर हे ठराविक शाखा दर्शवतात.

त्या पुढील ६ आकडी नंबर चेकबुक नंबर दर्शवितो. तो चेकबुकवर व प्रत्येक चेकवर असतो. पुढे असलेले दोन नंबर खात्याचा प्रकार सांगत असतो. याच चेकवर आणखीन एक ४ अक्षरी नंबर आयएफएससी असतो. हा नंबर आरबीआयने प्रत्येक बँकेच्या प्रत्येक शाखेला दिलेला महत्त्वपूर्ण विशिष्ट कोड नंबर असतो. साधारणपणे बँकेचे नाव-पत्ता असेल, त्याचे खाली नंबर दिलेला असतो. सन २०१० साली चेक पेमेंटमध्ये मोठा बदल करण्यात आला तो आहे - चेक पेमेंट करताना कार्यरत असलेल्या क्लिअरिंग पद्धतीमध्ये बदल करण्यात आला. तोपर्यंत एका बँकेच्या गावातील सर्व शाखांमधील चेक एका शाखेत गोळा केले जायचे आणि एखाद्या व्यक्तीमार्फत ते क्लिअरिंग हाउसमध्ये पोचविले जायचे. त्यामध्ये बदल केला त्यास चेक ट्रंकेशन संबोधतात. CTS 2010 - Cheque Truncation System 2010 - आणि तशा चेकला चेक ट्रंकेटेड चेक असे संबोधले जाते. यामध्ये कलेक्टिंग बँक फक्त सर्व चेकच्या प्रतिमा इमेज फाईल्स Drawee ड्रॉई बँकेकडे पाठवते. चेक जिथे भरला तिथेच राहतो, कुठेही पाठवला जात नाही. इमेजवरून चेक तपासणी चेक खात्यात डेबिट टाकला जातो. चेक परत पाठवताना कारण देऊन इमेज पाठवली जाते.

*** चेकच्या प्रमुख ३ पार्टीज असतात.** (१) आदेशिती बँक - Drawee bank - चेक ज्या बँकेचा आहे, ती बँक. (२) Drawer - खातेदार - जो चेकवर सही करून त्याच्या खात्यातले पैसे देऊ इच्छितो आणि (३) Payee - म्हणजे ज्या व्यक्तीच्या नावे चेक काढला आहे अशी व्यक्ती. आणि त्याचे ज्या बँकेत खाते आहे ती असते पेई - पेमेंट करणारी बँक. रुपये ५००००. - (पन्नास हजार फक्त) अथवा त्यापेक्षा अधिक रकमेचा चेक देताना एक काळजी घ्यावी लागते. तो चेक पेईला दिल्यावर पेमेंटसाठी खातेदाराने एक विशिष्ट फॉर्मवर चेकचे सर्व डीटेल्स भरुन आपल्या शाखेत द्यावा लागतो. जेव्हा चेक पेमेंटसाठी प्रेझेंट केला जातो तेव्हा हा फॉर्म व चेक इमेज तपासली जाते. सगळे व्यवस्थित असेल तरच चेक पास करून पेमेंट केले जाते. हा एक बदल लक्षात ठेवायला हवा.

*** चेक क्लिअरिंग नवीन पद्धत** - आता, नवीन नियम लागू करून महत्त्वाचे बदल होत आहेत. चेक क्लिअरिंग सिस्टिम अतिशय गतिमान करून काही तासाचे आतच चेक पास होणार आहेत. ऑक्टोबर, २०२५ पासून नवीन नियम लागू होत आहेत. या नव्या कार्यप्रणालीमध्ये चेक क्लिअरिंगसाठीचा वेळ जाणवण्याइतका कमी केला आहे. प्रत्येक बँकेच्या सर्वच शाखांमधून त्यांच्या खातेदारांनी खात्यात भरलेले चेक्स त्वरितच पुढील प्रक्रियेसाठी पाठवायची तरतूद करणे होय. बँकेत सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत सदर केलेले चेक्स स्कॅन केले जातील आणि त्वरित क्लिअरिंग हाऊसमध्ये इमेज रूपात पाठवले जातील. रिझर्व्ह बँकेने पुढील प्रक्रिया अधिक वेगवान केलेली आहे. त्यामुळे चेकची इलेक्ट्रॉनिक प्रतिमा वेगाने तपासली जाणार आहे. चेक मंजूर झाला, पास झाला, की एखाद्या तासाच्या आत रक्कम त्या त्या खात्यात जमा होणार आहे. सकाळी बँकेत भरला आणि संध्याकाळपर्यंत पैसे मिळाले देखील संध्याकाळीपर्यंत चेकची स्थिती काय आहे हे निश्चित होणे आवश्यक आहे. त्या एका दिवसातील चेकचे क्लिअरिंग काम त्याच दिवशी परिपूर्ण होणार आहे. वेळेची संध्याकाळची ७ ही मर्यादा या कामास दिलेली आहे. त्यानंतर काही केले जाणार आहे. ४ ऑक्टोबरमध्ये या पद्धतीने झटपट भराभर एकेक चेक क्लिअरिंग हाउसकडे जाणार आणि संध्याकाळी ७ चे आत पेयी - ज्याच्या नावे चेक दिला आहे, त्या व्यक्तीच्या खात्यात ते पैसे जमा झालेले असणार.

पूर्वी क्लिअरिंग पद्धतीने चेक पास होऊन पैसे काढता यायला यास किमान दोनतीन दिवस लागत होते. खात्यात जमा क्रेडिट लगेचच होत असले तरी ती रक्कम काढता येत नव्हती, तसेच त्यातून दिलेला चेक पास करणे शक्य नसायचे. याचा अर्थ असा की, सोमवारी भरलेला चेक मंगळवारी खात्यात जमा दिसेल. पण पैसे काढता येणार नाहीत, तसेच त्याच्या जोरावर एखादा चेक पास केला जाणार नाही. ते आणखी एका दिवसाने म्हणजे बुधवारी पास झाला असे समजून मगच ती रक्कम काढता येणार अथवा त्यातून चेक पास केला जाणार. ही पद्धत बहुतांशी बँक ग्राहकांच्या परिचयाची झालेली आहे.

ग्राहकसेवा सुधारणा करताना धनदेश लवकरात लवकर पास करून त्याचा उपभोग ग्राहकास देणे हा उद्देश नक्कीच आहे. चेक पेमेंट सिस्टिमचे आधुनिकीकरण करण्यात आलेले आहे. आता खातेदार तेही दोन्ही पैसे देणारा व घेणारा यांचे हित जपणूक आहे. सर्वसामान्यांना फारसे हे जाणवेल असे नाही, परंतु व्यावसायिकांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची ही पद्धत सुरू होत आहे. रिझर्व्ह बँकेच्या कामात आमूलाग्र बदल झपाट्याने होत आहेत, त्यामध्ये यास एक महत्त्वाचा बदल म्हणता येते. तो तसाच उपयुक्त बदल आहे. आत्ता नजीकच्या काळात याला सुरुवात होत आहे.

**- वंदना धर्माधिकारी मो.नं. - ९८९०६ २३९१५**

******

## संस्थेच्या व्यवसायात लक्षणीय वाढ

**मुंबई** – सहकारी संस्था सुरू ठेवणे हे अवघड असले तरी ज्ञानदीप सहकारी संस्थेने ६५०० कोटींपेक्षा अधिक व्यवसाय केला असून ही गौरवास्पद बाब आहे, असे मत मुंबई बँक अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी सांगितले. संस्थेची ४६वी सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यावेळी ते बोलत होते. संस्थेचे संस्थापक संचालक विश्वनाथ पवार यांनी अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार सभेत करण्यात आला.

इतिवृत्ताचे वाचन संचालक बाळकृष्ण पवार यांनी तर अहवाल वाचन उपाध्यक्ष चंद्रकांत ढमाळ यांनी केले. सभेत मांडण्यात आलेले ठराव सर्वानुमते संमत करण्यात आले. संस्था अध्यक्ष पवार यांनी संस्थेच्या वाटचालीचा आणि आर्थिक घडामोडीचा आढावा घेतला संचालक रवींद्र केंजळे यांनी सूत्रसंचालन आणि संचालिका दुर्गा वाघ यांनी आभार मानले.

### महेश नागरी सहकारी बँकेचा १० टक्के लाभांश जाहीर

**पुणे** – महेश नागरी सहकारी बँकेने सदस्यांसाठी १० टक्के लाभांश जाहीर केला आहे. बँकेची ५३ वी वार्षिक सभा नुकतीच झाली. त्यामध्ये लाभांश जाहीर करण्यात आला. बँकेचे अध्यक्ष जुगलकिशोर पुंगलिया होते.बँकेकडे सध्या ९४० कोटी ठेवी असून ६२३ कोटीचे कर्ज वाटप केले आहे तर एनपीए शून्य टक्के ठेवण्यात बँकेने यश मिळविले आहे. ठेवीमध्ये आणि एकूण व्यवसायात वाढ करण्याचा निर्धार करण्यात आला.

# शेतमाल निर्यात वाढीसाठी निर्यात सुविधा केंद्र सक्षम करा – पणन मंत्री रावल

**पुणे** – राज्यातील फळे, भाजीपाला व इतर शेतमाल निर्यात वृद्धी करून शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील असून, शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. भाजीपाला व फळे निर्यात करण्यासाठी जगात ज्या बाजारपेठेत मागणी त्याचा अभ्यास करून तेथे निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे, असे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

राज्य कृषी पणन मंडळ संचालक मंडळाच्या बैठकीत ते बोलत होते. राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती प्रविण नहाटा, दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, सहकार आयुक्त दीपक तावरे, विपणन अधिकारी व्ही. एस. यादव, कृषी पणन संचालक विकास रसाळ, नाबार्ड उप महाप्रबंधक हेमंत कुंभारे उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक दर देण्यासाठी जागतिक बाजार व्यवस्थेचा अभ्यास करावा. राज्यात उत्पादित होणाऱ्या फळे व भाजीपाला उत्पादनाला जगाच्या बाजारपेठेत जेथे मागणी असेल तेथे निर्यात करण्यासाठी सुविधा केंद्रांनी तत्परतेने काम करावे. बाजार समितीच्या क्षेत्रीय पीकपद्धती, त्यादृष्टीने पायाभूत सुविधा, आधुनिकीकरणाची गरज, भविष्यात आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधांचा अभ्यास करून आगामी १० वर्षांचा व्यवसाय विकास आराखडा तयार करावा. बाजार समितीने ५, १० आणि १५ एकर जागेत बाजारपेठ निर्मितीकरिता विविध पायाभूत सुविधांचा समावेश करून आदर्श पायाभूत आराखडा तयार करा आणि सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीचे १०० टक्के संगणकीकरण करण्यात यावे, असे त्यांनी सांगितले.

बैठकीत कर्ज मागणी प्रस्ताव, अंशदान आणि कर्ज वसुली, एकरकमी परतफेड योजना, प्रशिक्षण योजना, देशांतर्गत व्यापार विकास, स्मार्ट प्रकल्प, बाजार समिती बळकटीकरण, काजू फळबाग प्रक्रिया प्रकल्प आदी विषयांबाबत चर्चा करण्यात आली.


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) – ९४०३० ८०७५१**

**श्री. माधवेंद्र कोरडे – (फक्त मेसेजसाठी) ९८५०५ ७१४०५**

✻ **प्रशिक्षण कार्यालय** – फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com




# देशाच्या विकासात सहकारी बँकांची भूमिका महत्त्वपूर्ण -मुख्यमंत्री भजनलाल शर्मा

## सहकार भारती आयोजित राष्ट्रीय सहकारी बँकांचे अधिवेशन यशस्वी

**जयपूर, राजस्थान –** देशाच्या एकूणच विकासाच्या प्रक्रियेत विविध राज्यातील सहकारी आणि शहरी बँकेची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी येथे सांगितले. देशातील शहरी सहकारी बँकांच्या १३ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. सहकार भारती आणि राजस्थान सहकार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी राजस्थान सहकारमंत्री गौतम डाक आरबीआय संचालक सतीश मराठे, एनयूसीएफडीसी अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता, सहकार भारती राष्ट्रीय महासचिव दीपक चौरसिया, राष्ट्रीय संघटन प्रमुख संजय पाचपोर, रा. स्व. संघाचे प्रादेशिक प्रचारक निंबरम, राष्ट्रीय बँक प्रकोष्ठ प्रमुख अभय माटे आणि २१ राज्यांमधील २१२ बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शर्मा यांनी भारताच्या विकासाच्या प्रक्रियेत सहकारी बँकांची भूमिकेचे उल्लेखनीय भूमिका म्हणून कौतुक केले. बँका संस्था स्थानिक समुदायांच्या अगदी जवळ आहेत आणि लघु उद्योजक, दुकानदार, कारागीर आणि मध्यमवर्गीयांना सुलभ कर्जे प्रदान करतात. सध्याच्या स्थितीत राजस्थानमध्ये बँकेच्या २३६ शाखा आहेत, ज्यामुळे सुमारे साडेचार लाखांहून अधिक सदस्यांना सेवा देतात.

**※ सहकार हे स्वावलंबन आणि सक्षमीकरणाचे प्रवेशद्वार –** सहकार हे स्वावलंबन आणि सक्षमीकरणाचे प्रवेशद्वार आहे. राजस्थान शासन सामान्य लोकांना सहकार चळवळीशी जोडण्यासाठी त्यांचे राहणीमान बदलण्यासाठी प्रयत्नशील आहे, असे नमूद केले. ते म्हणाले, प्रत्येक पंचायतीत सहकारी समित्या (ग्रामीण सहकारी संस्था) स्थापन करण्याची योजनादेखील जाहीर केली, ज्यामुळे शेतकऱ्यांना बियाणे आणि खते अधिक सहजपणे उपलब्ध होतील. राज्याने सहकारी बँकांद्वारे ४२,३९४ कोटी रुपयांचे व्याजमुक्त अल्पकालीन पीक कर्ज आणि ४०४ कोटी रुपयांचे पीक कर्ज दिले आहे. इतर उपक्रमांमध्ये पीएसीएसमध्ये विकेंद्रित अन्नधान्य साठवणूक, गोदामे, प्रक्रिया युनिट, कस्टम हायरिंग सेंटर आणि पशुपालकांसाठी राजस्थान गोपाल क्रेडिट कार्ड योजना यांचा समावेश आहे. मात्र मागील सरकारने सहकारी संस्थांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल टीका केली, ज्यामुळे एनपीए प्रमाण वाढले आणि शेतकऱ्यांना वेळेवर मदत मिळाली नाही, असे त्यांनी सांगितले.

**सहकार भारती आणि राजस्थान सहकार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने देशातील शहरी, सहकारी बँकांच्या दोन दिवसांच्या १३ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये देशातील २१ राज्यातील सहकारी बँक प्रतिनिधी सहभागी झाले होते.**

**※ अत्याधुनिक तंत्रज्ञानावर भर देण्याची गरज –** सहकार भारतीचे अध्यक्ष डॉ. जोशी यांनी मनोगतात बँकासाठी प्रशासन सुधारणा, डिजिटायझेशन, सायबर सुरक्षा आणि एचआर धोरणांवर भर दिला. तसेच बँकेच्या वाढीसाठी, भविष्यातील उद्दिष्टांसाठी स्पष्ट रोडमॅप तयार करण्याचे आवाहन भारतीय रिझर्व्ह बँकेला केले. सन २००२ पासून कोणतेही नवीन बँक स्थापन झाली नाही. नवीन परवाने दिले पाहिजेत आणि मोठ्या पतसंस्थांना सहकारी बँकांमध्ये रूपांतरित करण्याची परवानगी दिली पाहिजे, असे ते म्हणाले.

**※ सहकार क्षेत्र विविध उपक्रमात आघाडीवर –** एनएएफसीयूबीने स्थापन केलेल्या टास्क फोर्सने संबंधित अधिकाऱ्यांना अहवाल सादर केला आहे. सहकार राज्यमंत्री गौतम डाक म्हणाले की, मुख्यमंत्री शर्मा यांच्या नेतृत्वाखाली राजस्थान सहकार क्षेत्र विविध उपक्रमांमध्ये आघाडीवर आहे. आरबीआय संचालक मराठे यांनी सांगितले की, सहकारी बँका आर्थिक समावेशनाचे महत्त्वाचे साधन आहेत. विशेषतः लहान व्यापारी, मध्यमवर्गीय



पुढील पानावर...




# समाजातील शेवटच्या घटकाचा विकास समोर ठेवून सहकारी बँकांनी काम करावे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची अपेक्षा



**जयपूर –** समाजातील शेवटच्या घटकाचा विकास हे ध्येय समोर ठेवून सहकारी बँकांनी कार्यरत राहिले पाहिजे तरच सब का साथ, सब का विकास ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यास हातभार लागणार आहे. या प्रक्रियेत सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या बँकेची भूमिका महत्त्वाची असणार आहे, असे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी सांगितले.

सहकार भारती आणि राजस्थान सहकार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेचा समारोप करताना ते बोलत होते. ते म्हणाले, समाजातील आर्थिकदृष्ट्या अडचणीत असणाऱ्या घटकांना विकासाच्या मार्गावर नेण्याची जबाबदारी केवळ सरकारची नाही तर सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक घटकाची आहे. ही भूमिका सर्वांनी कर्तव्याच्या जाणीवेतून पूर्ण करणे आवश्यक आहे. यामध्ये सहकारी बँकेचा सहभाग हा देखील तितकाच महत्त्वपूर्ण असणार आहे. यामुळे देशाच्या प्रगतीला मदत होणार आहे. सहकार क्षेत्राचा मूलभूत विचार आहे तो म्हणजे सब का साथ, सब का विकास होय. यासाठी जी माध्यमे आहेत ती अधिक सक्षम, बळकट करायला हवी आणि हे काम सहकाराच्या माध्यमातून करता येणार आहे. सहकारी बँकांनी केवळ नफा कसा वाढेल यावर अधिक लक्ष न देता समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यावर भर देण्याची गरज आहे. यामधून राष्ट्र बळकट होण्यास मदत होणार आहे, असे ते म्हणाले.

**※ प्रशिक्षणाची आवश्यकता –** ब्रिटिश राजवटीत शिक्षण पद्धतीमध्ये बदल झाले त्याचा परिणाम झाला असे नमूद करून ते म्हणाले, आपल्याला परंपरा, संस्कृती, प्राचीन ज्ञान याचा विसर पडला. गावागावात सुरू असणारे अनेक लहान व्यवसाय बंद पडले त्यानंतर स्थिती हळुहळू बदलत गेली. सध्याच्या स्थितीत बँक अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याची नितांत गरज आहे. नवीन कायदे आले आहेत, त्याची माहिती देण्याची गरज आहे. सहकारी बँका या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून अनेक कुटुंबाचा मुख्य स्रोत आहे. म्हणून सहकार क्षेत्रात काम करताना सर्वांच्या विकासाचा विषय असायला हवा. लघु, मध्यम उद्योग व्यवसायाला कर्जाची उपलब्धता बँकेच्या माध्यमातून करायला हवी. यासाठी सहकारी बँकांचे जाळे अधिक व्यापक करायला हवे. तसेच सहकार क्षेत्रातील अन्य घटकांचा विकास डोळ्यासमोर ठेवून काम करण्याची गरज आहे तरच प्रगतीचा मार्ग अधिक व्यापक आणि प्रशस्त होणार आहे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

---

**मागील पानावरून...**

आणि उद्योजकांसाठी कार्यरत असल्याचे स्पष्ट केले.

**※ सहकार भारती मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन –** मुख्यमंत्री शर्मा यांच्या हस्ते सहकार भारती मार्गदर्शक पुस्तिकेचे प्रकाशन लारण्यात आले. तसेच सदस्य म्हणून स्वतःची नोंदणी करून त्याचे नवीन सदस्यत्त्व ॲप लाँच केले. सहकार भारतीचे राष्ट्रीय सरचिटणीस दीपक चौरसिया यांनी आभार मानले.

**※ सहकार चळवळीची भूमिका महत्त्वाची –** सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांनी सांगितले की, सहकारी बँकेत सहकाराची विचारधारा जोपासली जात आहे आणि नेमके उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून त्या कार्यरत आहेत. या माध्यमातून आगामी काळात नवे नेतृत्व तयार होण्यास हातभार लागणार आहे. केवळ फायदा मिळविणे हे उद्दिष्ट नाही तर समाजातील दुर्बल घटकांना प्रगतीच्या दिशेने घेऊन जाण्याची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. सहकार क्षेत्रातून विकासाचा मार्ग सापडणार आहे. त्या दृष्टीने यापुढील काळात काम करण्याची गरज आहे. त्यासाठी सहकार चळवळीची भूमिका महत्त्वाची आहे. सहकाराच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांची आर्थिक प्रगती, तसेच आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी, निवासांची उपलब्धता, हे उद्दिष्ट साध्य करणे आवश्यक आहे. विविध समस्यांवर एकच उपाय आहे, तो म्हणजे सहकाराचा विचार होय, असे ते म्हणाले.









**सहकारी बँक राष्ट्रीय अधिवेशन क्षणचित्रे**

# नाबार्ड संचालक सतीश मराठे अपना सहकारी बँकेकडून सन्मानित



**मुंबई** – रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या सेंट्रल बोर्डचे संचालक सतीश मराठे यांची नाबार्ड या शिखर बँकेवर संचालक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल अपना सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके यांच्या हस्ते मराठे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी बँक उपाध्यक्ष विकासकुमार फाटक, ज्येष्ठ संचालक शांताराम दिवेकर, संचालक विजय माने, अनिल ठाकूर, रवींद्र कुवेस्कर राजेंद्र घाडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी रंगनाथन, उपप्रमुख व्यवस्थापक राहुल मेस्त्री, स्वाती माने आणि बँकेचा सेवक वर्ग उपस्थित होता. अपना बँकेला मार्गदर्शन करणारे मराठे यांची नाबार्ड संस्थेवर झालेली नियुक्ती म्हणजे गेली चार दशके सहकार क्षेत्राच्या उन्नतीसाठी करीत असलेल्या त्यागाचा, तळमळीचा सन्मान होय असे गौरवोद्‌गार बँकेचे अध्यक्ष चाळके यांनी काढले.

नाबार्ड संस्था पूर्णपणे भारत सरकारच्या मालकीची असून वित्त मंत्रालयाच्या अंतर्गत कार्य करीत आहे. कृषी, लघुउद्योग तसेच ग्रामीण विभाग तसेच सहकारी बँकांना संपूर्ण सहकार्य करून विकसित करण्याचे कार्य नाबार्ड करीत असते. सहकारातून समृद्धीसाठीचा ध्यास घेऊन कार्यरत असलेल्या मराठे यांच्या नियुक्तीमुळे सहकारी बँकाच्या प्रगतीची पताका आणखी उंच जाईल यात शंकाच नाही, असे ते म्हणाले.



# राज्यातील शेतीनुकसानीचा अहवाल शासनाने त्वरित पाठवावा केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचे आवाहन

**अहिल्यानगर –** राज्याच्या विविध भागात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे शेतकऱ्यांना मदत करण्याची सरकारची भावना आहे म्हणून राज्य सरकारने एक सविस्तर अहवाल पाठवावा, पंतप्रधान मोदी महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना मदत करायला विलंब करणार नाहीत, असे केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी सांगितले.

अहिल्यानगर येथे प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या विस्तारित क्षमतेचे लोकार्पण केले. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या पुतळ्यांचे अनावरणप्रसंगी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार तसेच केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**अहिल्यानगर येथे पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पुतळ्याचे अनावरण नुकतेच करण्यात आले. केंद्रीय सहकार मंत्री शहा यांनी विखे पाटील यांच्या कार्याचा आणि साखर उद्योगाचा आढावा घेतला**

**※ राज्यातील शेतजमिनीचे मोठे नुकसान –**

यावर्षी महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची ६० लाख हेक्टरहून अधिक जमीन आणि पिकांचे नुकसान झाले आहे तर २५-२६ या आर्थिक वर्षामध्ये केंद्राच्या वाट्याअंतर्गत महाराष्ट्राला ३.१३२ कोटी रुपये देण्यात आले आहेत. त्यापैकी १६३१ कोटी रुपये केंद्र सरकारने एप्रिल महिन्यातच दिले होते. महाराष्ट्रात शासनाने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी २२१५ कोटी रुपयांचे मदत पॅकेज दिले. त्यामुळे ३१ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना मदत मिळाली. १० हजार रुपये रोख आणि ३५ किलो धान्य देण्याचा उपक्रमही राबवला. अल्पमुदतीच्या कर्जाच्या वसुलीला स्थगिती, भूराजस्वमधेही सूट देण्यात आली, असे ते म्हणाले.

पद्मश्री विखे पाटील यांनी आपले संपूर्ण आयुष्य या भागातल्या आणि संपूर्ण महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी समर्पित केले. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील हे भारतातल्या सहकार चळवळीच्या आद्यप्रवर्तकांपैकी एक होते. असे नमूद करून ते म्हणाले, महाराष्ट्राच्या सहकाराच्या इतिहासात पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, धनंजयराव गाडगीळ आणि वैकुंठभाई मेहता या त्रिमूर्तीने राज्यात सहकाराचा पाया रचला. पद्मश्री पाटील यांनी एक प्रकारे जगातला पहिला सहकारी साखर कारखाना सुरू केला. त्यामुळे केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर गुजरात, कर्नाटक आणि उत्तर प्रदेशासह अनेक राज्यांतले शेतकरी समृद्ध झाले. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील हे साखर कारखान्यांचा नफा व्यापाऱ्यांच्या घरी जाण्याऐवजी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जाण्याची व्यवस्था करणारे प्रणेते होते, असे त्यांनी सांगितले.

**※ सहकारातून सर्वांगीण विकासाचा दृष्टीकोन –**

डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी केवळ सहकार चळवळीला बळकटी दिली नाही, तर सहकारी संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात सहकारातून निर्माण झालेल्या नफ्याचा उपयोग विकासासाठी करण्याची नवी परंपरा सुरू केली. डॉ. विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे नूतनीकरणही करण्यात आले आहे. या कारखान्याची स्थापना झाली, तेव्हा त्याची गाळप क्षमता प्रतिदिन ५०० टन ऊस प्रक्रिया करण्याची होती. आज ती वाढून प्रतिदिन ७२०० टनांपर्यंत पोहोचली आहे. आगामी काळात ही क्षमता ७२०० टनांवरून वाढवून १५ हजार टन प्रतिदिन करण्यात येणार आहे. सहकार मंत्रालयाची स्थापना झाली तेव्हा सहकारी साखर कारखान्यांना बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ (एनसीडीसी) योजना सुरू करण्यात आली आणि उत्तम कामगिरी करणाऱ्या युनिट्सना आर्थिक सहाय्य देण्यात आले. त्यामधूनच आज डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचा विस्तार होत आहे, असे ते म्हणाले

**※ देशातील साखर कारखान्यांची संख्या वाढली –**

देशातील साखर कारखान्यांची संख्या ६७ ने वाढली आहे. साखर उत्पादनात १० लाख मेट्रिक टनांची वाढ झाली असे नमूद करून ते म्हणाले, डिस्टिलरींची संख्या दुपटीने वाढली आहे. इथेनॉल उत्पादन क्षमता पाचपट वाढली असून त्याचा पुरवठा दहापट वाढला आहे. याशिवाय पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण २० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. सरकारने शेतकऱ्यांचा १० हजार कोटी रुपयांहून अधिक प्राप्तीकर माफ करून सर्वात मोठे काम केले आहे. तसेच कर सेटलमेंटमध्ये सहकारी क्षेत्राला कंपन्याप्रमाणे समान स्थान दिले. या उपक्रमामुळे आता सहकारी साखर कारखान्यांवर दरवर्षी आर्थिक ओझे येणार नाही. इथेनॉल प्रकल्पांना मल्टीफीड इथेनॉल प्रकल्पांमध्ये रूपांतरित करावे आणि त्यात भाजीपाला अवशेष, मका आणि तांदुळापासून इथेनॉल तयार करण्याची व्यवस्था करावी. यासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य एनसीडीसीकडून उपलब्ध करून दिले जाईल. इथेनॉल खरेदीत सर्व सहकारी संस्थांना प्राधान्य दिले आहे, असे त्यांनी सांगितले.



# उत्तम नेतृत्वामुळेच महाराष्ट्रात सहकारी चळवळीला यश - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

## लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीचा ३० वर्षांचा प्रवासाचा टप्पा पूर्ण



**पुणे** – उत्तर भारतात सहकार चळवळ यशस्वी होऊ शकली नाही. मात्र, महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक या तीन राज्यात सहकारी चळवळ मोठ्या प्रमाणात वाढली. उत्तम नेतृत्व, प्रामाणिकपणे काम करण्याची वृत्ती, विश्वस्त म्हणून काम करण्याचा संस्कार आणि विश्वासार्हतेमुळेच महाराष्ट्रासारख्या राज्याने सहकारी क्षेत्रात मोठे यश मिळविले आहे. 'लोकमान्य'सारख्या संस्थांनी हीच चतु:सूत्री घेऊन नवा आदर्श उभा केला असे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.

लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी'ने ३० वर्षांचा प्रवासाचा टप्पा पूर्ण केला असून, ३१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यानिमित्त आयोजित स्नेहमेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून गडकरी बोलत होते. सोसायटीचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. किरण ठाकुर, उपाध्यक्ष अजित गरगट्टी तसेच संचालक प्रसाद ठाकुर, गजानन धामणेकर, पंढरी परब आदी उपस्थित होते. 'लोकमान्य'च्या ३० वर्षाच्या कामगिरीचा आढावा घेणाऱ्या कॉफीटेबल बुकचेही प्रकाशन करण्यात आले.

**✻ सहकारी चळवळीच्या वाढीला चालना मिळाली –**

गडकरी म्हणाले, लोकमान्य सोसायटीने ३० वर्षे यशस्वीरीत्या पूर्ण केली आहेत. ही साधी गोष्ट नाही. महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटकमधील सहकारी संस्था अतिशय उत्तम काम करत आहेत. उत्तर भारतात मात्र ही चळवळ म्हणावी तितकी यशस्वी झालेली नाही. उत्तर भारत, दिल्ली, हरियाणा किंवा आजूबाजूच्या राज्यांमध्ये सहकार कधी वाढला नाही. महाराष्ट्रासारख्या राज्यात ही चळवळ इतकी का यशस्वी झाली, याचा शोध घेतला, तर त्याचे उत्तर सापडते. राज्यात सहकार चळवळीला उत्तम व चांगले नेतृत्व लाभले. प्रामाणिकपणे काम करण्याची वृत्ती तसेच विश्वस्त म्हणून काम करण्याचा संस्कार यामुळेही येथील सहकारी चळवळीच्या वाढीला चालना मिळाली. 'लोकमान्य' संस्थेनेही आपल्या कृतीतून हाच आदर्श उभा केला आहे. महाराष्ट्राच्या कृषी व ग्रामीण क्षेत्रात सहकारी सोसायट्यांचा मोठा वाटा आहे. याच सहकारी बँकांनी ग्रामीण भागात तळागाळातल्या लोकांना सहजपणे कर्ज उपलब्ध करून दिले. त्यांच्या कर्जामुळे अनेकांची आर्थिक प्रगती झाली. रोजगार मिळाला. गरीब घटक, छोट्या लोकांना कुणी कर्ज देत नाही. परंतु, हीच माणसे प्रामाणिकपणे कर्ज फेडतात. सहकारी संस्थांनी अशा छोट्या लोकांना कर्ज दिल्याने अर्थकारणाला गती आली. बेळगावात २८ साखर कारखाने आहेत. सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूरमध्येही मोठ्या प्रमाणात साखर कारखाने आहेत. या भागाचा विकास दूध आणि ऊस पीक यातून प्रामुख्याने झाल्याचे दिसून येते. किंबहुना या विकास प्रक्रियेत सहकारी सोसायट्यांची भूमिका अतिशय महत्त्वाची भूमीका राहिली असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**✻ कमी भांडवलात संस्था सुरू –**

डॉ. किरण ठाकुर यांनीही कमी भांडवलात संस्था सुरू केली. 'तरुण भारत'च्या माध्यमातून त्यांनी पत्रकारितेचा आवाज बुलंद ठेवला. त्यांच्यावर हक्कभंग प्रस्ताव आला तेव्हा मी भाजपाचा अध्यक्ष होतो. कर्नाटकमध्ये तेव्हा भाजपचे शासन होते व अधिवेशन सुरू होते. कन्नड, मराठी वादामुळे आमदारही आक्रमक होते. मात्र, विरोधात लिहिले म्हणून संपादकाला जेलमध्ये पाठवणे योग्य नाही, असे सांगितले.

प्रास्ताविक करताना डॉ. ठाकुर म्हणाले, की संकटे आली, तेव्हा गडकरी यांनी मदत केली. हक्कभंग असो वा संस्थेच्या अडचणी. ते नेहमी धावून आले. त्यांचे नेतृत्व संकटमोचक आहे. समाज आर्थिकदृष्ट्या संपन्न हवा, हे मॉडेल ठेवून काम करीत आहोत. आगामी काळात लोकमान्य कल्चरल युनिव्हर्सिटी स्थापन करणार असल्याचेही डॉ. ठाकुर यांनी सांगितले. राजेश दामले यांनी सूत्रसंचालन तर विभागीय व्यवस्थापक सुशील जाधव यांनी आभार मानले.

# देशातील सहकारी बँकांना डिजिटल वित्त सेवा वाढविण्याची संधी

**नवी दिल्ली** – देशातील ग्रामीण आणि निमशहरी भागामध्ये डिजिटल वित्तसेवेचा विस्तार व्हावा, यासाठी आता सहकारी बँकांना देखील आधार सक्षम पेमेंट सेवा देता येणार आहे, असे भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या नवीन धोरणामुळे सहकारी बँकांना अधिक सक्षम आणि आत्मनिर्भर वित्तसंस्था होण्यास मदत होणार आहे.



केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव आशिशकुमार भूतानी यांनी सांगितले की, या धोरणामुळे ग्रामीण आणि निमशहरी भागात वित्तीय समावेशनाचे जाळे वेगाने वाढण्यास मदत होणार आहे. आधार सक्षम सेवा देण्यामुळे ही प्रणाली अधिक सोपी आणि सुटसुटीत होणार आहे. त्यानुसार सुरूवातीला देशातील ३४ राज्यामध्ये सहकारी बँका या प्रमाणीकरण वापरकर्ता संस्था आणि इ-केवायसी वापरकर्ता म्हणून निंदणी करतील. त्यानंतर ३५१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका त्या त्या संबंधित राज्य बँकाच्या आधार प्रमाणीकरण पायाभूत सुविधांचा वापर करू शकणार आहे. या नवीन आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी सहकारी बँकांना पूर्ण सहकार्य करणार आहेत.

# सहकार भारती संस्थापक स्व. लक्ष्मणराव इनामदार यांना अभिवादन

**सांगली –** सहकार भारतीचे संस्थापक स्व. लक्ष्मणराव इनामदार यांना जयंती निमित्त सहकार भारती सांगली महानगर शाखेतर्फे अभिवादन करण्यात आले. सांगली अर्बन बँकेचे संचालक संजय धामणगावकर रा. स्व. संघाचे महानगर सहकार्यवाह योगेश शिरगुरकर, किरण जाबशेट्टी उपस्थित होते.

प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. धामणगावकर म्हणाले, रा. स्व. संघाचे प्रचारक असलेले स्व. लक्ष्मणराव इनामदार आणि सांगली अर्बन बँकेचे संस्थापक स्व. अण्णा गोडबोले आणि अन्य सहकारी यांनी सन १९७८ साली सहकार भारतीच्या कार्याची सुरवात केली. विना संस्कार नही सहकार... विना सहकार नही उद्धार हे ब्रीदवाक्य घेवून सहकार भारतीचे कार्य संपूर्ण



भारतात विस्तारले आहे.

महानगर महामंत्री शैलेश पवार यांनी सहकार गीत सांगितले. पाहुण्यांचा परिचय आणि सूत्रसंचालन सहकार भारतीचे महानगर संघटन प्रमुख संदीप कुलकर्णी यांनी केले. सहकार भारतीचे प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, महानगर उपाध्यक्ष किशोर शहा, महानगर बँक प्रकोष्ठ प्रमुख व बँकेचे संचालक सागर घोंगडे, पदाधिकारी अमोल बोळाज, सुषमा कुलकर्णी, धीरज नसलापुरे, अवधूत ठोके, स्वाती सावळवाडे, श्रुती जोशी सुनेत्रा रजपूत, सुरेश कोरे, अशोक जाधव, मोहित डुबल आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# संस्कारक्षम सहकार हेच स्व. लक्ष्मणराव इनामदार यांचे ध्येय - वसंत यादव



**शिराळा, सांगली –** संस्कारक्षम, स्वच्छ आणि पारदर्शक सहकार हेच स्व. लक्ष्मणराव इनामदार यांचे उद्दिष्ट होते. यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले, असे भारतीय मजदूर संघाचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंत यादव यांनी सांगितले. शिराळा सहकार भारती शाखा बैठकीत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष सुमंत महाजन होते.

सांगली अर्बन बँक सहाव्यवस्थापक प्रकाश जोशी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. स्व. लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहिली. सहकार भारतीचे नूतन उपाध्यक्ष चंद्रकांत गुरव यांचा किसन भाष्टे यांच्या हस्ते पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. सचिव जोतिबा जोशी यांनी तालुक्याची महिन्यात बैठक घेऊन सहकार भारतीची ध्येयधोरणे सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवहन केले.

यादव यांनी लक्ष्मणराव इनामदार यांच्या कार्याचा आढावा घेतला. रा. स्व. संघाचे तालुका सहकार्यवाह प्रितम हसबनीस म्हणाले, विजयादशमीला रा. स्व. संघाला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. देशभरात विविध कार्यक्रम होणार आहेत. संघाने यासाठी आठ कार्यक्रम घेण्याचे नियोजन केले आहे. घराघरात संघ विचार पोहोचले पाहिजेत. यासाठी सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवावा, असे सांगून आठ कार्यक्रम, हिंदु संमेलन, घरघर संपर्क इत्यादीची माहिती सांगितली.

जिल्हाध्यक्ष महाजन म्हणाले, सहकार म्हणजे स्वाहाकार असे म्हटले जात असे. पण स्व. लक्ष्मणराव इनामदार यांनी सन १९७८ साली सहकार भारतीची स्थापना करून बिना संस्कार नही सहकार, बिना सहकार नही उद्धार या तत्त्वानुसार काम सुरू केले. आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. देशातील ६०० पेक्षा जिल्ह्यात सहकार भारतीचे काम सुरू असुन लाखो कार्यकर्ते यामध्ये जोडले गेले आहेत. आणखी काम करण्याची गरज असून प्रत्येक सहकार संस्थेत सहकार भारतीचे काम पोहोचवून सहकार क्षेत्र सुसंस्कारीत करणे, हीच त्यांना आदरांजली आहे. आगामी काळात सर्वांनी सहकार भारतीच्या कामाबरोबर संघ शताब्दी निमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमात सक्रिय काम करूया.

तालुका अध्यक्ष डॉ. पंकज पाटील, बी. टी. निकम, बँकेचे व्यवस्थापक राजेंद्र काटकर दत्तात्रय पाटील, सतिश सुतार, विष्णु माने, बाबासो पाटील, गणेश पाटील, मनोज सातपुते, प्रकाश नवांगुळ इत्यादी उपस्थित होते. बी. टी. निकम यांनी आभार मानले.

# इंद्रायणी को-ऑप. बँकेचा सभासदांसाठी लाभांश जाहीर

**पुणे –** पिंपरी चिंचवड परिसरातील इंद्रायणी को-ऑप. बँकेने सभासदांसाठी गेल्या दोन वर्षाचा लाभांश जाहीर केला आहे. बँक अध्यक्ष सी.ए. मनोजकुमार आगरवाल यांनी ही माहिती सभेत सांगितली. दोन वर्षाचा मिळून एकूण १४ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे.

बँकेकडे सध्या २१९ कोटी ६४ लाख ठेवी असून १३२ कोटी १३ लाख कर्ज वाटप करण्यात आले आहे. भाग भांडवल ३८३.९८ लाख इतके आहे. बँकेला १ कोटी ३३ लाख इतका नफा झाला आहे आणि लेखापरीक्षणात अ वर्ग मिळाला आहे. बँकेच्या सध्या ७ शाखा कार्यरत असून येत्या आर्थिक वर्षात आणखी शाखा विस्तार करण्यात येणार आहे. तसेच बँकेचा एकूण व्यवसाय आर्थिक वर्षात ५०० कोटी पर्यंत नेण्याचा प्रयत्न असल्याचे सांगण्यात आले. माजी संचालक रामहरी कसबे यांनी सूत्रसंचालन केले.

सभेला बँकेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी तसेच बँकेचे सभासद उपस्थित होते.

# नागपूर नागरिक सहकारी बँकेच्या वतीने ग्रामीण भागासाठी रुग्णवाहिका भेट



**नागपूर –** येथील नागपूर नागरिक सहकारी बँकेच्या वतीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ लोककल्याण समितीला दुर्गम भागात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अद्ययावत रुग्णवाहिका भेट देण्यात आली. आमदार कृष्णा खोपडे, बँक अध्यक्ष संजय भेंडे, समितीचे अध्यक्ष डॉ. दिलीप गुप्ता उपस्थित होते.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशुतोष पाठक यांनी सूत्रसंचालन तर बँक अध्यक्ष भेंडे यांनी प्रास्ताविक करताना बँकेच्या विविध उपक्रमांची माहिती सांगितली. आमदार खोपडे यांनी बँकेच्या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. समिती अध्यक्ष गुप्ता यांनी समितीच्या कार्याची आणि उपक्रमाची माहिती सांगितली. बँकेचे संचालक, अधिकारी, समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# चिंतामणी ग्रामीण सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभेमध्ये सर्व विषयांना मान्यता

**वर्धा –** चिंतामणी ग्रामीण सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभा झाली. संस्थेचे संस्थापक सुरेश खेडकर अध्यक्षस्थानी होते. चालू वर्षाचे अहवाल वाचन, जमाखर्च पत्रक, ताळेबंद पत्रक, अंदाज पत्रक वाचन व्यवस्थापक सुनील भांदककर यांनी केले.

संस्थेचे अध्यक्ष मंगेश खेडकर, उपाध्यक्ष अशोक बोरसरे, गुलजारखा पठाण, गणेश कोठे, संस्थेचे संचालक रमेश दुर्गे, सुलोचना सतीबावणे, शिला घुमडे, गजेंद्र ठाकरे, पद्माकर देशमुख, शंकर लांडगे, प्रकाश ताल्हन, मोबीन शेख सभेला उपस्थित होते. संस्थेच्या प्रगतीवर आणि भविष्यकालीन योजनांवर साधकबाधक चर्चा झाली. कर्ज वाटप झालेल्या गावपरिसरातील महिला बचत गटांपैकी उत्तमरीतीने आणि नियमितपणे कर्ज हप्त्याची परतफेड करणाऱ्या गटांचा आणि संस्थेच्या उत्कर्षाचा केंद्रबिंदू असलेल्या सर्व ठेव प्रतिनिधींचासुद्धा सन्मान करण्यात आला. नव्याने सुरू झालेल्या सोने तारण कर्ज योजनेचा शुभारंभ झाल्याचे जाहीर करण्यात आले. संस्थेच्या सद्यस्थितीतील कार्यक्षेत्राच्या बाहेर जाऊन संस्थेच्या शाखा विस्ताराच्या दिशेने प्रयत्न व्हावा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कशा प्रकारे संस्थेचे उत्पन्न वाढवता येईल, यावर विचारमंथन झाले.

महेंद्र महाजन यांनी आभार मानले. सभेच्या यशस्स्वितेसाठी पतसंस्थेचे कर्मचारी आणि प्रतिनिधी सुभाष खेडकर, रोशन ढाले, सुनील मोहिजे, अरुण भावरकर, नीरज संचारिया, महेंद्र महाजन, विलास बोबडे, विवेक नागपुरे, भूषण दुर्गे यांनी सहकार्य केले.

# समर्थ नागरी सहकारी प्रत्यय संस्थेच्या व्यवसायात वाढ

**वर्धा –** येथील समर्थ नागरी सहकारी प्रत्यय संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये संस्थेला ३ लाख ११ हजार रुपये नफा झाला असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष सुधाकर घवघवे यांनी सांगितली तर एकूण व्यवसाय ११ कोटी ९० लाख रुपये झाला असल्याची माहिती सांगण्यात आली. लेखा परीक्षक मनोज बोथडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे भाग भांडवल ६२ लाख ६२ हजार असून ४ कोटी ३२ लाख रुपये ठेवी आहेत. व्यवस्थापक विनोद भुसे यांनी सभेला अहवाल सादर केला. दहावी बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सभेत करण्यात आला. संचालक चंद्रशेखर डाखोडे यांनी आभार मानले.

# सहकार भारती व उपनिबंधक सहकारी संस्था आयोजित सहकार परिषद यशस्वी

**वर्धा –** जिल्हा सहकार भारती, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार परिषद आयोजित करण्यात आले होते. परिषदेला आरबीआय संचालक सतीश मराठे, यांनी जागतिक स्तरावर सहकारातून विकासात भर पडते याबाबत सविस्तर विवेचन केले.

महामंत्री विवेक जुगादे यांनी सहकार राज्यमंत्री पंकज भोयर यांचे संदेश वाचून दाखविले. विभाग सहनिबंधक सदानंद उईके जिल्हा उपनिबंधक, गौतम वालदे, यांचा परिचय करून दिला. दुसऱ्या सत्रात अमरावती विभाग प्रमुख अमित भिसे, संजय रोकडे, सहप्रमुख विजय गोटे उपस्थित होते. उईके यांनी पीपीटीच्या सहाय्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियम याची माहिती सांगितली. सहकारी बँक व सहकारी पतसंस्था यांच्यासाठी गुण तालिका किती महत्त्वाची आहे, हे पटवून दिले.

पल्लवी पुरोहित यांनी सूत्रसंचालन आणि प्रभाकर कोळसे प्रास्ताविक तर श्रीकांत दौड यांनी आभार मानले परिषदेसाठी श्यामकुमार खत्री, मनोज पाचखेडे, प्रशांत मुळे, गजानन खाडे, भास्कर थोटे, सुभाष सुरजुसे, शेखर मेढेवार, किशोर शोभवत, चंद्रकांत अग्निहोत्री, विशाल खगन, मंजिरी देशकर, अपर्णा अग्निहोत्री यांनी परिश्रम घेतले.

# व्यवसाय वाढीसाठी समृद्धी नागरी, ग्रामीण सहकारी पतसंस्थेचा निर्धार

**वाशिम –** येथील समृद्धी नागरी आणि ग्रामीण सहकारी पतसंस्थेची आमसभा नुकतीच होऊन त्यामध्ये पतसंस्थेच्या व्यवसाय वाढीवर सर्वांनी लक्ष द्यावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रकाश बागडे यांनी केले आहे. संस्थेचे संचालक, अधिकारी आणि खातेदार उपस्थित होते.

संस्थेच्या ठेवी वाढीसाठी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज त्यांनी सांगितली. तसेच संस्थेच्या विविध योजनाची माहिती सांगितली. कर्जाची परतफेड करणारे तसेच ठेवीदार आणि चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. जीवन विद्या मिशनचे प्रशांत पाटणकर यांनी मनोगत व्यक्त केले. हिरल चौहान यांनी सूत्रसंचालन तर मुख्य कार्यकारी अधिकारी मुरलीधर होले यांनी आभार मानले.

पतसंस्थेच्या आमसभेत सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना संबंधित अधिकाऱ्यांनी समाधानकारक उत्तरे दिली. तसेच संस्थेच्या आगामी यशस्वी वाटचालीसाठी सामुहिक प्रयत्न करण्यावर सर्वांनी भर दिला. आमसभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

# राज्य सहकारी बँकेकडून मुख्यमंत्री सहायता निधीसाठी १० कोटीचा धनादेश




पुणे – राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना राज्य सहकारी बँकेने आर्थिक मदतीचा हात पुढे केला आहे. बँकेच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे १० कोटींचा धनादेश बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी नुकताच सुपूर्द केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार एकनाथ शिंदे उपस्थित होते. यावेळी प्रशासक अनास्कर यांनी सांगितले की, आरबीआयने सामाजिक कार्यासाठीच्या मदत रकमेच्या मर्यादेत वाढ करावी. कंपनी कायद्याखाली स्थापन झालेल्या बँका आणि अन्य कंपन्यांना जसा सीएसआर निधी असतो, त्याप्रमाणे बँकांना अशी सुविधा नाही. याबाबत आरबीआयने विचार करावा. बँकेच्या वतीने शेतकऱ्यांना विविध माध्यमातून आर्थिक मदत देण्यात येत असते. त्यामध्ये कर्ज पुरवठ्याचा समावेश आहे.

# राज्य सहकारी बँकेचा सलग अकराव्या वर्षी १० टक्के लाभांश जाहीर

**मुंबई –** राज्य सहकारी बँकेने सलग अकराव्या वर्षी १० टक्के लाभांश जाहीर केला असून नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला ६५१ कोटी रुपये नफा झाला असल्याची माहिती बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितली. बँकेची ११४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच येथे पार पडली.

सलग गेली १३ वर्ष बँकेला लेखा परीक्षणात अ वर्ग मिळत आहे. तसेच बँकेला आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयएसओ सुरक्षा प्रमाणपत्र मिळाले आहे. बँकेचा स्वनिधी ७ हजार ७०६ कोटी आणि एकूण व्यवसाय ६१ हजार ९४७ कोटी इतका झाला आहे. तसेच कर्ज वाटप ३५ हजार ५८८ कोटी रुपये आणि निव्वळ एनपीए १.७९ टक्के इतका आहे. तसेच ठेवी २६ हजार ३५९ कोटी इतक्या आहेत अशी माहिती सांगण्यात आली. बँकेच्या व्यवसायात तिपटीपेक्षा अधिक वाढ प्रती कर्मचारी इतकी झाली आहे.

# कल्पद्रुम ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेला पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर –** जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आदर्श पतसंस्था पुरस्कार ५ ते ५० कोटी ठेवींमध्ये कल्पद्रुम ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेला आदर्श पतसंस्था प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

जिल्ह्याचे पालकमंत्री आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर व राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष नेमगोंडा पाटील तसेच संचालक मलगोंडा पाटील महावीर पाटील, अमोल कुमटाळे, अभय पाटील सुहाग कोळी, नेमगौडा पाटील, शांतिनाथ पाटील संस्थेचे व्यवस्थापक संजय पाटील उपस्थित होते.

# पुणे जिल्हा परिषदेला आदर्श पतसंस्था पुरस्कार प्रदान

**पुणे –** पुणे जिल्हा परिषद सेवक सहकारी पतसंस्थेने लक्षणीय कामगिरी केल्याबद्दल पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने स्व. शिवाजीराव भोसले आदर्श पतसंस्था पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.

पतसंस्था अध्यक्ष योगेश नांदखिले, उपाध्यक्ष राजेश आवटे, सचिव सुरेंद्र सौदागर आणि शाखा अभियंता बाळासाहेब मखरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात पतसंस्थेला १ कोटी ६४ लाख रुपये नफा झाला असून संस्थेने सलग तीन वर्ष पुरस्कार संपादन केला आहे.



# श्री सिध्दीविनायक पतसंस्थेच्या वतीने रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन



**श्रीरामपूर** – श्री सिध्दीविनायक पतसंस्थेच्या श्री सिध्दीविनायक फाऊंडेशनच्या वतीने रोजगार मेळावा आयोजित केला होता. उदघाटन रेझोनन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक सिनारे यांच्या हस्ते करण्यात आले.

मेळाव्यात इंन्ड्युरन्स टेक्नॉलॉजी, स्पेरोनी इ-वाहन, बँकिंग, लॉजिस्टिक सेक्टरमधील कंपन्यांमध्ये मेळाव्यात सहभागी झालेल्या तरुण-तरुणींपैकी २५ मुलांची निवड झाली, अशी भावना सहकार भारतीचे जिल्हा अध्यक्ष वासुदेव काळे यांनी व्यक्त केली. जिल्ह्यातील विविध भागातून मोठ्या संख्येने तरुण-तरुणी रोजगार मेळाव्यात सहभागी झाले होते.

मेळावा यशस्वी झाल्यामुळे दर तीन महिन्यांतून एकदा श्रीरामपूर येथे तर संपूर्ण राज्यभरातील पतसंस्थांच्या माध्यमातून असे मेळावे आयोजित करून सामाजिक दायित्व पार पाडण्याच्या पतसंस्थाच्या प्रयत्नांना मदत करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संचालक वासुदेव काळे यांनी सांगितले.

पतसंस्थेचे उपाध्यक्ष सुनिल बोलके, संचालक. सोमनाथ लोखंडे, अजय चौधरी, विनायक जोशी, किशोर कुलकर्णी उपस्थित होते. स्वागत अजय चौधरी यांनी व सूत्रसंचालन दिगंबर कुलकर्णी यांनी केले.

## पुणे पीपल्स को-ऑप. बँकेच्या एकूण व्यवसायात वाढ

**पुणे** – पुणे पीपल्स को-ऑप. बँकेच्या एकूण व्यवसायात वाढ झाली असून एकूण व्यवसाय २७०६ कोटी इतका झाला आहे. बँकेच्या सदस्यांना १५ टक्के लाभांश देण्याचा प्रस्ताव बँकेच्या ७४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर करण्यात आला. सीए जनार्दन रणदिवे अध्यक्षस्थानी होते.

बँकेकडे एकूण ठेवी १६३३ कोटी असून १०७३ कोटी कर्ज देण्यात आली आहेत. निव्वळ एनपीए शून्य टक्के, सीडी रेशो ६५.७० टक्के तर निव्वळ नफा १७.४६ कोटी झाला. आगामी काळात नफ्यात वाढ करण्याचा प्रयत्न असेल असे अध्यक्ष रणदिवे यांनी सांगितले. जिल्ह्यात शाखा विस्तार करण्यावर भर दिला जाणार असून त्याबाबतचा प्रस्ताव आरबीआयकडे पाठविण्यात येणार आहे. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी बँकेच्या वतीने आर्थिक मदत देण्याचे प्रस्तावित आहे, असे ज्येष्ठ संचालक सुभाष मोहिते यांनी सांगितले.

## पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा दोन पुरस्कारांनी गौरव

**पुणे** – पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला बँकिंग फ्रंटियर्स संस्थेच्या वतीने दोन पुरस्काराने एका कार्यक्रमात गौरविण्यात आले आहे. बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांनी पुरस्कार स्वीकारले. गोवा येथे झालेल्या कार्यक्रमात गोव्याचे सहकार मंत्री सुभाष शिरोडकर, नाबार्डचे संचालक सतीश मराठे उपस्थित होते.

बँकेच्या ठेवी १५ हजार ३०० कोटी असून १३ हजार ५०० कोटीचे कर्ज वितरण करण्यात आले आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला ४३९ कोटी नफा झाला असून नेट एनपीए शून्य टक्के ठेवण्यात यश मिळविले आहे. वर्षभरात बँकेने २६ हजार कोटीचा व्यवसाय केला आहे, अशी माहिती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई यांनी सांगितली.

## आदर्श माता, वैद्यकीय सेवा क्षेत्रातील महिला, बचत गट अध्यक्ष यांचा सन्मान

**मावळ, पुणे** – हिरकणी मावळ महिला नागरी सहकारी पतसंस्थेची दुसरी वार्षिक सर्व साधारण सभा नुकतीच झाली. माजी सभापती ज्ञानेश्वर दळवी, जनता बँक व्यवस्थापक भास्कर भेगडे, सहकार तज्ञ महेंद्र खरात आदी उपस्थित होते. यावेळी आदर्श माता, वैद्यकीय सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या महिला, महिला बचत गट अध्यक्ष, स्वच्छता कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.

अध्यक्ष मीनाक्षी तिकोणे यांनी मनोगत तर मुख्य लिपिक भक्ती फडके यांनी अहवाल वचन केले. विद्या तिकोणे यांनी सूत्रसंचालन तर संचालिका वैष्णवी दळवी यांनी आभार मानले.

## प्रगती पतसंस्था पूरग्रस्तांसाठी २ लाखांपेक्षा अधिक मदत देणार

**धाराशीव** – संस्थेचा एकूण निधी आणि भागभांडवल पाहता प्रगती पतसंस्थेने भांडवल पर्याप्तता प्रमाण उच्च पातळीवर असून संस्था मजबूत पायावर उभी आहे, असे सेवानिवृत्त जिल्हा उपनिबंधक एस. आर. नायकवडी यांनी सांगितले. पतसंस्थेच्या २३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. संस्थेच्या वतीने पूरग्रस्तांना २ लाख रुपयांची मदत देण्याचे सभेत जाहीर करण्यात आले.

सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनिल पेंडसे, संचालक अमोल कळसे, माजी नगराध्यक्ष मकरंद राजे निंबाळकर, माजी पंचायत समिती सभापती बालाजी गावडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जनता बँकेचे अध्यक्ष पेंडसे यांनी संस्थेच्या वाटचालीबद्दल व कामाकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. सचिव डॉ. हर्षल डंबळ यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेतला व नवीन योजना विशद केल्या. संस्थेने भूम, परंडा, कळंब, उमरगा, लोहारा, तुळजापूर येथे शाखा विस्तार केला.

अध्यक्ष पाटील यांनी अहवाल वाचन केले. ३१ मार्च २०२५ अखेर संस्थेचे भागभांडवल ५ कोटी २६ लाख ७८ हजार असून वेळोवेळी नफ्यातून तरतुदी करून मार्च अखेर संस्थेकडे १५ कोटी १२ लाख ९६ हजार इतका स्वनिधी जमा आहे. एकूण ७५ कोटी ८० लाख ३ हजार इतक्या ठेवी असून ४९ कोटी ९८ लाख ७७ हजार कर्जवाटप केले. संस्थेला १ कोटी ७५ लाख नफा झाला असून सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याची घोषणा केली. संस्थेला ऑडीट वर्ग 'अ' मिळाल्याचे सांगितले.

सूत्रसंचालन मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन सावंत व पाहुण्यांचा परिचय संचालक शशिकांत वैराळे, नंदकुमार भुतेकर, सुधाकर कुलकर्णी, रमाकांत घोडके, व्यंकटेश राजे, सविता थोरात यांनी करून दिला.




# खातेदारांचा विश्वास हे अनुराधा बँकेच्या प्रगतीचे यश - काका कोयटे

**चिखली, बुलढाणा** – कर्मयोगी तात्यासाहेब बोंद्रे यांनी स्थापन केलेल्या अनुराधा बँकेने यशस्वी पंचवीस वर्षाचा टप्पा ओलांडला आहे. शून्य टक्के थकित शंभर टक्के विश्वास हे ब्रीद घेऊन बँकेने रिझर्व बँक आणि सहकार खात्याने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे तंतोतन पालन केले आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या फायनान्शियली साऊंड अँड वेल मॅनेज बँकेमध्ये अनुराधा अर्बनचा समावेश असणे, ही राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या चळवळीसाठी अभिमानाची बाब आहे, असे राज्य सहकारी संस्था फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे यांनी सांगितले.

अनुराधा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने ऋषितुल्य कर्मयोगी सिद्धीविनायक उपाख्य तात्यासाहेब बोंद्रे यांच्या जयंती व वार्षिक आमसभेनिमित्त आयोजित सहकार संमेलन व ग्राहक मेळाव्याचे उद्घाटन कोयटे यांच्या हस्ते झाले यावेळी ते बोलत होते.

सत्यजीत अर्बनचे अध्यक्ष शाम उमाळकर, राजर्षी शाहू अर्बनचे अध्यक्ष संदीप शेळके, स्वाती वाकेकर, सुदर्शन भालेराव, सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष दिपक देशमाने, उपाध्यक्ष डॉ. विश्वनाथ यादव, सीईओ नितीन गायके, संचालक उपस्थित होते.

सहकार आणि राजकारण या दोन्ही घटकांना न्याय देत राहुल भाऊंनी बँकेला सक्षम आणि आर्थिक स्थैर्य दिले. बँक आणि पतसंस्था कशा यशस्वी होऊ शकतात याचे अनुराधा आणि हिरकणी उदाहरण आहे. अनुराधा बँकेमध्ये एक कोटीची ठेव ठेवली असून चिखली परिसरातील नागरिकांनी व पतसंस्थांनी बँकेत ठेवी ठेवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

सुधाभाऊ धमक, कुणाल भाऊ बोंद्रे, रामभाऊ जाधव, अशोकराव पडघन, डॉ. सत्येंद्र भुसारी, प्राचार्य निलेश गावंडे, सचिन बोंद्रे, हरकलाल शेठ, मनोज लाहूडकर, समाधान सुपेकर विष्णू पाटील कुलसंदर यांच्यासह चिखलीतील पतसंस्थांचे अध्यक्ष, संचालक, सहकारातील मान्यवर, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, सोसायटी अध्यक्ष, संचालक, विविध सेलचे पदाधिकारी, बँकेचे सभासद, ग्राहक उपस्थित होते.

कमी व्याजदर असतानाही बँकेचे डिपॉझिट १२२ कोटींपर्यंत पोहोचले आणि सातत्याने वाढत आहे, यावरून ग्राहकांचा बँकेवरचा विश्वास अधोरेखित होतो, असे बँकेचे अध्यक्ष राहुल बोंद्रे यांनी सांगितले. बँकेची पहिली शाखा मेहकर येथे सुरू होत असून आगामी काळात पाच जिल्ह्याच्या कार्यक्षेत्राने बँक अधिक उंच भरारी घेईल, असा विश्वास व्यक्त केला.

## बुलढाणा अर्बनच्या वतीने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी निधी

**बुलढाणा** – राज्याच्या विविध भागात गेल्या काही दिवसात पावसाने झालेल्या नुकसानीमुळे जनजीवन विस्कळित झाले असून बुलढाणा अर्बनच्या वतीने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दिला आहे.

अर्बनच्या वतीने रुपये पांच लाखाचा धनादेश जिल्हा उपनिबंधक डॉ. महेद्र चव्हाण यांच्याकडे अर्बनचे संस्थापक राधेशाम चांडक तसेच अध्यक्ष सुकेश झंवर आणि संचालक यांनी सुपूर्द केला.

तसेच बुलढाणा जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने एक लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

संस्थेच्या वतीने अनेकविध समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणाने राबविण्यात येतात. याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो.

## नफ्यामध्ये होणारी वाढ म्हणजे संस्कार सहकारी पतसंस्था - मेंढे

**गडचिरोली** – नफ्यामध्ये होत असणारी वाढ म्हणजे संस्कार सहकारी पतसंस्थेच्या सक्षमतेचे लक्षण आहे, असे मत लोकमंगल समूहाचे अध्यक्ष अनिल मेंढे यांनी व्यक्त केले आहे. संस्थेची आमसभा, ग्राहक मेळावा झाला. त्यावेळी ते बोलत होते. राज्य सहकार परिषद माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर, व्यासपीठावर होते.

संस्थापक अध्यक्ष मनीष फाये, संस्था अध्यक्ष गुणवंत फाये, उपाध्यक्ष पौर्णिमा फाये तसेच अन्य पदाधिकारी, संचालक, खातेदार, ग्राहक, ठेवीदार उपस्थित होते. सभेत विविध विषय मंजूर करण्यात आले. सदस्यांना ५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

यावेळी मेंढे यांनी मनोगत व्यक्त केले. व्यवस्थापक जांभूळकर यांनी सूत्रसंचालन तर मुख्य कार्यकारी अधिकारी धीरज बांगरे यांनी प्रास्ताविक आणि व्यवस्थापक दिवाकर यांनी आभार मानले.

## सभासदांचा विश्वास हीच पतसंस्थेची खरी ताकद - देविदास काळे

**यवतमाळ** – आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ च्या निमित्ताने श्री रंगनाथ स्वामी नागरी सहकारी पतसंस्थेचा सभासद मेळावा येथे झाला. मेळाव्यास सभासदांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अध्यक्ष ॲड. देविदास काळे सांगितले की, सहकार केवळ आर्थिक देवाण-घेवाणीची पद्धत नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देणारे सामर्थ्य आहे.

मेळाव्याचे उद्घाटन सचिनकुमार कुळमेथे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संजय देरकर, माजी जि. पं. सदस्य अरुणा खंडाळकर, माजी सहाय्यक निबंधक सुरेश इंगोले, बाजार समितीचे संचालक वसंत आसुटकर, सहाय्यक निबंधक कुळमेथे उपस्थित होते.

संचालक अरविंद ठाकरे यांनी सहकार क्षेत्राला बळ देण्याचे तर संचालक उदय रायपुरे यांनी सहकार चळवळीत आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याचे महत्त्व सांगितले. उपाध्यक्ष विवेकानंद मांडवकर, संचालक व संचालिका उपस्थित होते. प्रास्ताविक सुरेश बरडे, आभार विलास होलगीलवार, सूत्रसंचालन अशोक कोरडे यांनी केले.

# विकास सोसायट्या वाढल्यास कर्जपुरवठा वाढेल - आरबीआय संचालक सतीश मराठे



**पुणे** – राज्यातील प्रत्येक गावात विकास सोसायटींची संख्या वाढल्यास अडीच लाख कोटींचा कर्जपुरवठा वाढून तो ८ लाख कोटींपर्यंत जाणे शक्य आहे, असे नाबार्डचे आणि आरबीआय संचालक तसेच सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे यांनी सांगितले. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १०८व्या वर्धापनदिन कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, सहकार आयुक्त दीपक तावरे, बँक अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, सहकार भारतीचे माजी प्रदेशाध्यक्ष डॉ. मुकुंद तापकीर, बँकेचे संचालक, अधिकारी, खातेदार उपस्थित होते.

प्रत्येक गावात एक विकास सोसायटी असावी, असा निर्णय केंद्र आणि राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे प्रत्येक गावात सोसायटींची संख्या वाढल्यास कर्ज पुरवठा वाढण्यास हातभार लागणार आहे आणि देशाच्या अर्थव्यवस्थेमधील विकासाच्या प्रक्रियेमध्ये ग्रामीण भागाचा वाटा अधिक वाढणार आहे, असे मराठे यांनी सांगितले.

बँक अध्यक्ष दुर्गाडे यांनी बँकेच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेतला. उपाध्यक्ष चांदेरे यांनी प्रास्ताविक तर मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई यांनी आभार मानले. सरव्यवस्थापक संजय शितोळे यांनी सूत्रसंचालन केले.

# एनसाई मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी सदस्यांना १८ टक्के लाभांश

**लातूर** – येथील एनसाई मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या सदस्यांना १८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी लाभांशाची घोषणा सभेमध्ये केली.

नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात सोसायटीला ७ कोटी ३९ लाख रुपये इतका नफा झाला आहे तर एकूण भाग भांडवल ४ कोटी ५९ लाख आहे. सदस्यांसाठी सोसायटीच्या वतीने अनेकविध योजना राबविण्यात येत आहेत. सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून सोसायटीच्या वतीने आवश्यक ती आर्थिक मदत करण्यात येत आहे. सोसायटीचा राखीव निधी ३२ कोटी ४२ लाख रुपये इतका असून शैक्षणिक तसेच लहान उद्योगासाठी कर्जाची उपलब्धता करण्यात येते अशी माहिती त्यांनी सांगितली.

# सहकारी बँकांना सॉफ्टवेअर उपलब्धतेसाठी असोसिएशनचे सहकार्य

पुणे - नागरी सहकारी बँकांना रोजच्या वापरात जे सॉफ्टवेअर आवश्यक असते, ते कमीतकमी किमतीमध्ये उपलब्ध व्हावे, यासाठी असोसिएशनच्या वतीने सहकार्य करण्यात येणार आहे, असे पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएन अध्यक्ष निलेश ढमढेरे यांनी सांगितले. असोसिएशनची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्यावेळी ते बोलत होते.

असोसिएशनचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी यावेळी उपस्थित होते. सहकारी बँक क्षेत्रात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या राजर्षि शाहू सहकारी बँक संचालिका आणि माजी महापौर कमल व्यवहारे आणि इंदापूर अर्बन बँकेच्या संचालिका डॉ. अश्विनी ठोंबरे यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. राजर्षी शाहू सहकारी बँक अध्यक्ष सुधाकर पन्हाळे, पुणे अर्बन बँक उपाध्यक्ष बाबासाहेब वीर, पुणे पीपल्स बँकेचे जनार्दन रणदिवे, श्री स्वामी समर्थ सहकारी बँक अध्यक्ष अशोक शेळके आदी यावेळी उपस्थित होते.

असोसिएशन मानद सचिव सुभाष मोहिते यांनी प्रास्ताविक केले आणि वर्षभरातील असोसिएशनच्या कामाचा आढावा घेतला. असोसिएशनच्या वतीने सीईओ डिप्लोमा तयार करण्यात आला असून नागरी सहकारी बँकेतील अधिकारी आणि कर्मचारी यांना उपयुक्त ठरणार असल्याचे स्पष्ट केले. असोसिएशन उपाध्यक्ष रमेश वाणी यांनी आभार मानले.

# श्री गजानन सहकारी बँकेचा ७ टक्के लाभांश जाहीर

**पुणे** – येथील श्री गजानन सहकारी बँकेने सदस्यांसाठी ७ टक्के लाभांश जाहीर केला आहे. बँकेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील घोषणा करण्यात आली. अध्यक्षस्थानी योगेश बाबर होते. ते म्हणाले, ग्राहकांना सर्व स्वरूपाच्या डिजिटल सेवा देण्यासाठी बँक प्रयत्न करीत आहे.

बँकेने मोबाईल ॲप तयार केले असून नजीकच्या काळात ते रोजच्या व्यवहारात आणले जाणार आहे तसेच बँकेच्या एकूण व्यवसायात वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. दरवर्षी यामध्ये वाढ होत आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात व्यवसाय १०५ कोटी इतका झाला आहे तर नफा ३४.५१ लाख झाला आहे.

# साखर कारखान्यांनी उसाला अधिकाधिक दर देण्याचा प्रयत्न करावा

## शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई देण्यात येईल – कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

**पुणे –** ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या ऊसाला उच्चांकी दर देणाऱ्या साखर कारखान्यांच्या कामकाजाची माहिती घेऊन इतर ऊसाला भाव, कामगारांना वेळेत वेतन, बोनस देणाऱ्या साखर कारखान्यांना राज्य शासनाच्या वतीने सहकार्य येईल, असे राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. अतिवृष्टीमुळे शेतीचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाई देण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले.

दि डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या ७० व्या वार्षिक अधिवेशन आणि साखर प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार अभिजित पाटील, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, सहकार आयुक्त दीपक तावरे, यशदाचे अतिरिक्त महासंचालक डॉ. शेखर गायकवाड, द वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन अध्यक्ष एस. बी. भड, उपस्थित होते.

